# श्री साईलीला

या अंकांत—


- श्रीशंकराचार्यांचें जीवन-कार्य
- अशोकवनांत सीतेचा शोध
- श्रीरामभक्त हनुमान
- पुराणांतील आक्षेपाचें खंडन
- माझें कर्तव्य कोणतें ?
- पूर्ण योगाची साधना
- अवघें विश्वची माझें घर
- सर्वगुणसंपन्न रामचंद्र
- आत्मनिरीक्षणाचें महत्त्व
- रावणाला सीतामाईचा सदुपदेश
- श्रीराम सर्व बाबतींत आदर्श
- लक्ष्मण, भरत व सीता


रामनवमी- एप्रिल १९६७ -विशेषांक

स्थापना १९१६



साईबाबांच्या मूर्ती,
पूजेचीं भांडीं
व
चांदीचे
सोन्याचे
मोत्यांचे

सर्व प्रकारचे दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासू
सुप्रसिद्ध पेढी

# ई. आर. मालपेकर,

जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २

टे. नं. ३५५७३१

# प्रिय वाचक—

दर वर्षाप्रमाणें साईलीलेचा श्रीरामनवमी विशेषांक आमच्या वाचकांच्या सेवेस सादर करतांना आम्हांला सहाजिकच आनंद होत आहे. शिर्डी क्षेत्रांत प्रतिवर्षी जे महोत्सव साजरे केले जात असतात, त्यांत रामनवमीस अर्थात् राम—जन्मोत्सवास आगळें स्थान आहे.

बाबांच्या हयातींत, त्यांच्याच प्रेरणेनें ह्या महोत्सवाची सुरुवात सुमारें पंचावन वर्षांपूर्वी ( शके १८३३ ) झाली व तेथपासून तो आज तागायत हा महोत्सव मोठ्या भक्तिभावानें व वाढत्या उत्साहानें साजरा केला जात आहे.

श्रीरामाचें चरित्र इतकें सुंदर व सर्वांना सर्वकाळीं आदर्शभूत व मार्गदर्शक होऊन रहाणारें आहे कीं, त्याची तुलनाच करतां येणार नाहीं. आदर्श पुत्र, आदर्श बंधू, आदर्श पति, आदर्श राज्यकर्ता व आदर्श वीर ह्या सर्व नात्यांनीं रामाचें स्थान अत्यंत महत्त्वाचें नि अतुलनीय आहे. या जगांत पुण्यपावन होऊन राहिलेलें व भक्तांचें कोडकौतुक पुरवून त्यांच्या जीवनाचें सार्थक करणारें जर कोणतें नांव असेल तर तें श्रीरामचंद्राचें.

वाल्मिकी महर्षीनीं रामायण काव्याची रचना करून हजारो वर्षांचा काळ लोटला तरी रामायणांतील रामचंद्र सर्व हिंदवासीयांच्या अंतःकरणांत जें ठाण मांडून बसले आहेत ते अजरामर आहेत. रामनामानें तरला नाहीं असा मानव विरळा. जेथें राम आहे तेथें सर्व कांहीं आहे आणि जेथें राम नाहीं तेथें कांहीं नाहीं. रामनाम हें समाधानाचें, आनंदाचें, दुःखसर्वस्व विसरण्याचें व कोणत्याहि बिकट परिस्थितीवर विजय मिळविण्याचें अमोघ साधन आहे.

श्रीसाईबाबांना रामनामाची किमया माहीत होती. त्यांना कां माहीत असणार नाहीं ! जनमनाची पकड त्या नामानें कशी घेतली आहे याचीहि बरोबर कल्पना होती; त्यामुळें रामनामाचें पारायण जितकें होईल तितकें त्यांना हवें होतें. त्यासाठी श्रीराम जन्मोत्सवासारखी अमोलिक संधी दुसरी कोणती असूं शकणार हें त्यांनीं अचूक हेरलें व त्या महोत्सवाचा त्यांनीं कोणाला ना कोणाला निमित्तमात्र करून आरंभ करविला.

आज या उत्सवाला उन्नत स्वरूप प्राप्त झालें आहे. जवळपासचे व दूरदूरच्या भागांत रहाणारे असंख्य भक्त या उत्सवानिमित्त शिर्डीत एकत्र जमा होतात व सतत ३।४ दिवस रामनामाचा आनंद लुटतात.

ह्या महोत्सवाचा प्रारंभ कसा, कोणत्या परिस्थितींत नि कोणाकडून झाला हें समजून घेण्यासारखें आहे. त्याचें असें झालें. गोपाळ गुंड या नांवाचे बाबांचे एक परम भक्त होते. ते मोजणी खात्यांत सर्व्हेअर होते. आपलें काम चोख करायचे. त्यामुळें वरिष्ठांची त्यांच्यावर मर्जी होती. त्यांना बाबांच्या भक्तीचे



# श्री साई वाक्सुधा

श्रीभगवत्गीता हा आमचा अमोलिक धर्मग्रंथ आहे. जे जे मला अनन्यभावें भजतात व माझी भक्तिभावानें आठवण करितात त्यांचा योग-क्षेम चालविण्याची जबाबदारी मी स्वतःच्या शिरावर घेत असतों. असें श्रीकृष्ण परमात्म्यानें आपल्या परमभक्तांस उद्देशून आश्वासन दिलें आहे. बाबा आपल्या भक्तांना म्हणतात कीं, तेंच आश्वासन मी माझ्या भक्तांना देत आहें. 'हेंचि भगवत्गीतावचन। साई म्हणती माना प्रमाण। नाहीं अन्नवस्त्राची वाण। तदर्थ प्राण वेंचूं नका॥'

—श्रीसाईसच्चरित्

---


श्रीरामनवमी— **श्रीसाईलीला** —विशेषांक

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४५ वें ] एप्रिल १९६७ [ अंक १२ वा

: संपादक :

श्री. बी. जी. पोतनीस

वार्षिक वर्गणी रु. ५ (ट. ख. सह)

टे. नं. ४४३२६१

: कार्यालय :

साई निकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ,
प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई १४.

काय वेड लागलें होतें. सदासर्वकाळ बाबांचें चिंतन. भक्तांकडे बाबांचें लक्ष कां बरें नाहीं वळणार? त्यांनीं आपल्या भक्तांना आश्वासन देऊन ठेविलें कीं, 'मज भजती जे अनन्यपणें। नित्याभियुक्तमनें। तयांचा योगक्षेम चालविणें। ब्रीद हें जाणें मी माझें॥'

भक्तांवरील संकट दूर करणें व त्यांची इच्छा परिपूर्ण करणें हें माझें पवित्र त्र आहे असें बाबा मानीत आले आहेत.

पुढें काय झालें? बाबांचे भक्त गोपाळ गुंड ह्यांना पुत्रसंतान नव्हतें. त्यामुळें ीकष्टी असत. कितीही सात्वीक वृत्तीचा व देवभक्तींत आनंद मानणारा मनुष्य तरी त्याला संततीसुखाचा ह्व्यास असतोच. घरांत मूलबाळ खेळावें, आपण डकौतुक करावें व त्याच्यासाठीं जीव आटवावा असें कोणाला वाटत नाहीं? गोपाळरावांचें तसेंच होतें. पुत्रसंतान नाहीं ही गोष्ट त्यांना खटकत असे. ते दुःखीकष्टी असत. बाबांनीं हें ओळखलें व त्यांची इच्छा पूर्ण केली.

ज्यासाठीं मन निराश होत असे, त्यांची प्राप्ति बाबांच्या कृपाप्रसादानें झाली त्री! गोपाळरावांना किती आनंद झालाय त्या घटनेमुळें!

त्यांना मनापासून वाटूं लागलें कीं, आपल्या आनंदाचे वांटेकरी आपण स करावें. सर्वांनीं एकत्र यावें व आनंदोल्हास प्रगट करावा. तो कसा करायचा? ति कोणत्या ना कोणत्या निमित्तानें जत्रा भरवावी. जत्रेंत लोक एकत्र जमतात. की आनंदाचीं साधनेंही आपोआप जमा होतात. परंतु जत्रा किंवा उत्सव साजरा वा म्हणजे अनेक गोष्टींचा विचार करावा लागतो. शेंकडो हजारो माणसें एकत्र र. त्यांच्या जेवणा खाण्यांची, रहाण्यासवरण्याची, आरोग्याची, पाण्याची वगैरे ा दोन किती तरी सुखसोयी केल्या पाहिजेत. नाहीं तर भलताच प्रसंग वयाचा!

त्यासाठीं प्रथम जिल्हाधिकारी जे कोणी असतील त्यांची परवानगी मिळ-पाहिजे. आणि मग इतर साधनें निर्माण करायचीं. त्यासाठीं गोपाळराव नि सहकारी उद्योगास लागले.

तुम्हीं उद्योगास लागलां तरी सभोंवारचें जग तुम्हांला अनुकूल असलें जे ना? परवानगीचा प्रश्न सुलभ रीतीनें सुटण्याचें लक्षण दिसेना. त्या गांवचे र्णींच ह्या बेतास विरुद्ध गेले. त्यासाठीं त्यांनीं नाना कारणें पुढें केलीं.

आतां काय करणार? पहिल्याच प्रयत्नास माशी शिंकली! परंतु गोपाळराव चे नव्हते. शिवाय त्यांच्या पाठीशीं बाबांची अदृश्य प्रेरणा होतीच. त्यांनीं वा प्रयत्न केला. सर्व गांवचें लोकमत त्यांच्या प्रयत्नास अनुकूल होतें. शेवटीं धिकाऱ्यापर्यंत हें प्रकरण जाऊन यात्रा भरविण्याचा हुकूम मिळविण्यांत आला. आनंदी आनंद झाला.

जत्रा किंवा यात्रा भरावयाची ती रामनवमीच्या निमित्तानें भरावयाची असे त्यासाठीं जरूर ती तयारी सुरू झाली.

शके १८३३ सालीं म्हणजे वर सांगितल्याप्रमाणें, पंचावन वर्षापूर्वी प्रतिवा
उरुस उत्सव व रामनवमी एकाचवेळीं आली. त्याकाळीं भीष्म या नांवाचें एक म
शिरडींत होते. त्यांनींहि या उत्सवाच्या बाबतींत कंबर बांधिली. एखादें सत्कृत्य
पाडायचें असलें म्हणजे ईश्वर तशींच एकमेकांस सहाय्यभूत होणारीं माणसें व सा
एकत्र जुळवून आणीत असतो. त्याकाळीं काका महाजनी या नांवाचे बाबांचे
भक्त होते. ते उरुसासाठीं शिर्डीत आले होते. बाबांची त्यांच्यावर भारी कृपा. भी
यांनीं आपला बेत त्यांना सांगितला. त्यांनाहि तो आवडला.

रामजन्म साजरा करावयाचा तर कीर्तन नको का ? कीर्तनकार कुठून आ
ही चिंता पडली. त्याकाळीं खेड्यांत इमखास कीर्तनकार मिळणें कठीणच होतें.
अडचण दूर करण्यासाठीं भीष्म महाशय पुढें सरसावले. काकांनीं पेटी वाज
असें ठरलें.

रामनवमीचा पुण्यकारक दिवस उजाडला. रामजन्मासाठीं पाळणा टांग
आला. बाबापर्यंत ही खबर गेली. बाबांनीं मोठ्या आनंदानें या कार्यीत जरूर
सहकार नि आशीर्वाद दिला व एक सत्कार्य त्यांच्या कृपेनें मार्गीस लागले.

रामजन्मोत्सव ही शिरडींत प्रतिवर्षीं घडून येणारी एक मोठ्यांत मोठी घ
आहे. त्यानंतरच्या काळांत या उत्सवासाठीं बाबांच्या प्रेरणेनें ठिकाठिकाणाहून
ना कोणी कीर्तनकार येऊन रामनवमी उत्सव साजरा करण्यांत भाग घेत असत.

परंतु या उत्सवाच्या इतिहासांतील सर्वांत महत्त्वाची घटना म्हणजे सा
ह. भ. प. श्रीदासगणू महाराज यांचा लाभलेला अनन्य साधारण सहकार
त्यांच्या कीर्तनाचा महिमा आम्हीं कोणत्या शब्दांनीं वर्णावा ? त्यांच्यासारखे कीर्तन
तेच ! यापेक्षां अधिक काय सांगायचें ? ज्या वर्षापासून त्यांनीं रामनवमी उत्स
सक्रिय भाग घेण्याचें ठरविलें त्यावेळेपासून या प्रतिवार्षिक महोत्सवाला एकप्रका
आगळेंच स्वरूप प्राप्त झालें आहे.

त्यांच्यानंतर त्यांचे पट्टशिष्य ह. भ. प. अनंतराव आठवले यांनीं त्यांची
अखंड व अत्यंत परिणामकारक रीतीनें चालविली आहे.

शिर्डी संस्थानांतील श्रीरामनवमी उत्सवाचीं आकर्षणें अनेकविध अस
परंतु त्यांतील एक महत्त्वाचें आकर्षण म्हणजे ह. भ. प. अनंतराव आठवले
त्या दिवसांत होणारीं सुरस व श्रवणीय कीर्तनें होत.

या उत्सवाचा आनंद त्या निमित्तानें शिर्डीत एकत्र जमणाऱ्या असंख्य
भक्तांनीं लुटावा. रामनामाचा आनंद काय वर्णावा ? त्या आनंदाचा लाभ बाबांच्या
कृपेनें तुम्हां आम्हां सर्वांना अखंड लाभो हीच त्यांच्या चरणीं अनन्यभावें प्रार्थना.

—संपादक

---

# श्रीशंकराचार्यांचें जीवन–कार्य

## चांडाळानें दृष्टि दिली !

ंकराचार्यांच्या वडिलांना दीर्घायु पण मूर्ख, अथवा अल्पायु पण ज्ञानी असा पुत्र लाभेल असा वर मिळालेला होता. त्यांनीं अल्पायु पुत्र पसंत केला. ाचार्य बालपणींच संन्यास घेऊं इच्छित होते. परंतु त्यांची आई परवानगी देत नव्हती. एके दिवशीं शंकराचार्य स्नान करीत असतांना नें त्यांना धरलें. त्यावेळीं त्यांचें वय आठ वर्षांचें होतें. ते आईला म्हणाले, ई, आतां तरी देशील कीं नाहीं संन्यासाची परवानगी ?"

आईनें प्रसंग ओळखून तत्काळ संन्यास घेण्याची आपल्याकडून त्याला नगी दिली.

तेव्हां परमेश्वर म्हणाला, "शंकर, आतां संन्यास घेतल्यामुळें तुझें पूर्वीचें न संपलें आहे. आणि तुझें आठ वर्षांचें ठरलेलें आयुष्य दुप्पट झालें आहे."

सुसरीच्या तावडींतून शंकर सुटले ! ते म्हणाले, "आतां मी सोळा वर्षें जगेन !"

त्यानंतर ते बाराव्या वर्षापर्यंत नर्मदेच्या काठीं गोविंदगुरुकडे राहिले. अध्ययन न तिथनं बद्रीकेदारला गेले. तिथें त्यांनीं प्रस्थानत्रयीवर सोळाव्या वर्षापर्यंत य रचून तें सारें भगवंताला अर्पण केलें.

इथें त्यांना व्यासांचें दर्शन झालें. व्यास त्यांना म्हणाले "माझ्या मुला, मी जें ुष्य दिलें त्याचें तूं सार्थक केलें आहेस. आतां मी तुला पुन्हां सोळा वर्षें देत ह्यापुढें तूं हें ज्ञान भारतभर फिरून लोकांच्या कानीं घाल."

असा भगवंताचा आदेश मिळतांच सोळा वर्षें ते हिंडत राहिले. ानांशीं वाद करून त्यानी त्याना जिंकले. सामान्य जनांसाठी लोकांच्या भाषेंत च्या पातळीवर उतरून त्यांनीं स्तोत्रें रचलीं. त्यांना त्यांच्या भाषेंत ज्ञान दिलें. ालयांत गेले. तिथें माणसाचा बळी देणारे लोक त्यांना आढळले ! बलिदानाचा असा अर्थ होत नाहीं, हा धर्म नव्हे, हें त्यांनीं त्यांना पटवून दिलें. नरबलीची ल बंद झाली !

भारताच्या चार कोपऱ्यांत चार पीठें स्थापन करून ह्या महापुरुषानें शेवटीं ालयांत बदरिकाश्रमीं जाऊन समाधि घेतली !

### ाचे तुकडे करणारे शंकराचार्य !

भगवद्गीतेवर अनेकांनीं भाष्यें लिहिलीं आहेत. त्या सर्वांत जुनें भाष्य आहे शंकराचार्यांचें !

शंकराचार्य मलबारकडचे रहाणारे. ते जातीनें नंबुद्रि ब्राह्मण होते. नंबुद्रि ब्रा श्रेष्ठ ब्राह्मण जातींपैकीं एक जात आहे.

त्याकाळीं कुणाला संन्यास घ्यायचा झाल्यास गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम क्रमानें संन्यास घ्यावा लागे. शंकराचार्यांनीं ब्रह्मचर्यांतूनच संन्यास घेतला. त्या नंबुद्रि ब्राह्मण चिडले. ब्रह्मचर्यांतून संन्यास 'कलिवर्ज्य' आहे असें ते म्हणूं ला कलिवर्ज्य म्हणजे निषेध.

शंकराचार्यांनीं त्यांना दाद दिली नाहीं. जें बुद्धीला पटलें तसें त्यांनीं केलं आ 'कां केलें?' या विषयीं ते समोरच्याशीं चर्चा करायला तयार राहिले.

शंकराचार्य फार बुद्धिमान् होते. त्यांच्याबरोबर चर्चा करायला, त्यांना प द्यायला, कुणी तयार होईना. परंतु इतर ब्राह्मणांना एवढें मात्र वाटत होतें कीं, ह्यांनीं केलें आहे तें कांहीं योग्य केलेलें नाहीं.

संन्यास घेतल्यानंतरहि शंकराचार्यांनीं आपल्या आईला 'एकदां भेटा येईन' म्हणून सांगून ठेवलें होतें. पुढें यात्रेंतून ते आईला भेटण्यासाठीं म्हणून मलबारला आले. त्यावेळीं त्यांची आई शेवटच्या आजारांत होती. त्यांनीं आईसा श्रीकृष्णस्तोत्र रचलें. तें आईकडून म्हणवून घेतलें. आईला ईश्वरदर्शन घडलें आ आई गेली.

आतां आईच्या दहनक्रियेची व्यवस्था करावयाची होती. त्यासाठीं प्रेत स्म नांत न्यायला निदान चार माणसें तरी हवींत!

नंबुद्रि ब्राह्मणांनीं विचार केला कीं, हा शंकर आतां आहे अडचणींत. चर्चेत आपण ह्याच्यासमोर टिकत नाहीं. परंतु ह्या व्यावहारिक अडचणींमुळें तो जर ह्यावे नमला तर पहावें. त्या ब्राह्मणांनीं शंकराला कोणत्याच प्रकारची मदत केली नाहीं!

शंकर नमणारे नव्हतेच. व्यावहारिक अडचणीमुळें सिद्धांत थोडाच सोडाय असतो! त्यांनी काळ ओळखला. एक तलवार आणली आणि आईचे तीन तुक केले. एक तुकडा उचलून त्यांनीं स्मशानांत नेला. त्याचें दहन केलें. दुसरा नेला त्याचें दहन केलें. अशा प्रकारें प्रत्येक तुकडा अलग अलग जाळला!

महापुरुषांना त्यांच्या जीवनकाळांत कसेंकसें सहन करावें लागतें त्याचा न नमूना आहे. पुढें शंकराचार्य महान झाले. आज नंबुद्रि ब्राह्मणांत शवावर लाल रेश ओढण्याचा रिवाज आहे. शंकराचार्यांना आपल्या आईचे तीन तुकडे करावे लागले त्याच्या स्मरणार्थ, आदर दाखविण्यासाठीं हा रिवाज पडला आहे!

आज शंकराचार्यांविषयीं सर्वत्र पूज्य बुद्धि दिसत असली तरी सुधारकाल आपल्या सुधारणेपायीं किती भोगावें लागतें याचें हें उदारण आहे. परंतु शंकरा चार्यांची नम्रता इतकी कीं, ह्या प्रसंगाचा त्यांनी आपल्या ग्रंथांतून कुठेंहि ओझरता उल्लेख सुद्धां केलेला नाहीं.

## डाळानें दृष्टि दिली !

शंकराचार्यांच्या चरित्रांतली चांडाळाची गोष्ट अशी आहे :—

आचार्य एकदां काशीला जात असतांना त्यांच्या वाटेवरून एक 'चांडाळ' होता. त्याला आचार्यांनीं दूर होण्याविषयीं सांगितलें. तेव्हां तो चांडाळ म्हणतो, महाराज, आपल्या अन्नमयशरीरापासून माझ्या अन्नमय शरीराला आपण दूर करूं च्छितां कीं आपल्यांतील चैतन्यापासून माझ्यांतील चैतन्याला दूर करूं इच्छितां ? णाचा झाला तरी देह बोलून चालून 'विटाळाचा गोळा' आहे. आणि आत्मा सर्वत्र एक—अत्यंत शुद्ध आहे. अशा स्थितींत अस्पृश्यता कोणाची आणि णाला ?"

असा त्याच्या प्रश्नाचा भाव. पण इतका भाव सुचवून तो चांडाळ स्वस्थ ला नाहीं. त्यानें पुढें आणखी कानउघाडणी चालविली. तो म्हणाला, गंगाजळांतील चंद्र आणि आमच्या तळ्याच्या पाण्यांतला चांदोबा ह्यांत कांहीं क आहे काय ? सुवर्ण—कलशांतलें आकाश आणि मातीच्या मडक्यांतील पोकळी त अंतर आहे काय ? सगळीकडे आत्मा एकच आहे ना ? मग हा ब्राह्मण आणि अंत्यज असला भेदभ्रम तुम्ही कोठून काढला ?"

इतकी कानउघाडणी झाल्यावर आचार्यांचे कानच नव्हे पण डोळेहि साफ घडले. त्यांनीं नम्रभावानें त्याला नमस्कार करून ते म्हणाले, —"आपल्यासारखा नुष्य, मग तो चांडाळ असो किंवा ब्राह्मण असो, मला गुरूच्या ठिकाणीं आहे."

× × ×

## अजामिळाचा नारायण

पुष्कळांची अशी समजूत आहे कीं, माणूस केवढाहि का पापी असेना हरिनामानें त्याचा उद्धार होऊं शकतो. आणि त्याच्या आधारासाठीं ते अजामिळाची कथा सांगतात.

अजामिळ जन्मभर पाप करीत होता. परंतु मरतांना त्यानें आपल्या मुलाला 'नारायण ! नारायण !' म्हणून हांक मारली तेवढ्या त्या परमेश्वराच्या स्मरणानें अजामिळाचा उद्धार झाला.

लोक म्हणतात, "अजामिळासारखा अजामिळ जर उद्धरला तर आम्हांला अडचण कसली !" थोडक्यांत अजामिळानें आपल्यासाठीं पाप करण्याचा परवानाच काढून ठेवला आहे असें त्यांना वाटत असतें !


पण अजामिळासारखीं अनेक उदाहरणें असतीं तर त्याची कथा भागवतांत आली नसती. पण ती कथा म्हणजे सामान्य घटना नव्हे, असामान्य घटना आहे; म्हणूनच ती भागवतांत आली आहे.

अजामिळ पापी होता हें खरें. पण जेव्हां त्याला आपल्या मुलाचें नांव ठेव-

ण्याची पाळी आली तेव्हां त्यानें 'हिरालाल, मोतीलाल, गुलाब, ताराचंद दगडू' असलें नांव न ठेवतां 'नारायण' ठेवलें. मुलाचें नांव नारायण ठेवण्याची त्याला इच्छा झाली याचा अर्थच त्याच्या महापापी जीवनांत सुद्धां एक सद्भावनेचा प्रवाह कुठून तरी वाहात होताच. आणि म्हणूनच त्याला मुलाचें नांव 'नारायण' ठेवण्याची इच्छा झाली!

मरतांना त्यानें मुलाला हांक मारली. आणि ज्या मुलाचें त्यानें जन्मभर लालनपालन केले, खुशामत केली, तो मुलगा कांहीं आला नाहीं. तेव्हां त्याला 'ह्या' नारायणाची नाहीं, पण 'त्या' नारायणाची आठवण झाली! हा नारायण गैरहजर असला तरी सदासर्वदा हजर असणारा तो नारायण आठवला! आणि ह्या त्याच्या स्मरणानें अजामिळाचीं पापें दग्ध झालीं असतील हें संभवनीय आहे.

पण हें न समजतां आपण आपला पापाचा कार्यक्रम चालू ठेवूं तर तें योग्य होणार नाहीं. बाकी एखाद्याला मरतांना जरी पश्चात्ताप झाला व त्यानें कळवळून हरि-स्मरण केलें तरी त्याचा उद्धार होतो. हिंदुधर्मानें एवढी उदारता ठेवली आहे.



## गीतेचें सार काय?

रामकृष्ण परमहंस लहान मुलांना समजावून सांगावें तसें समजावून सांगत असत. घरगुतीं उदाहरणें द्यावींत, परिचयांतल्या उपमा द्याव्यात आणि गोष्ट सहज गळीं उतरेल अशा पद्धतीने सांगावी. वेदांतहि समजावून सांगतांना ते अशाच रीतीनें सांगत.

एकदां रामकृष्णांना कुणी विचारलें, "गीतेचें सार काय?"

रामकृष्णांनीं मोठ्या गमतीच्या पद्धतीनें समजावून सांगितलें. ते म्हणाले, "गीता, गीता, गीता असा सारखा जलद जलद उच्चार करीत जप करा. गीता गीता याप्रमाणें तुम्ही वेगानें म्हणूं लागला म्हणजे गीऽऽता गीऽता गीऽतागीऽतागी होईल. 'तागी' हें गीतेचें सार आहे."

बंगाली भाषेंत तागी याचा अर्थ त्यागी आहे. गीता त्याग करायला सांगते, त्याग हेंच गीतेचें तात्पर्य आहे. त्यालाच कुणी अनासक्ति म्हणतात, तर कुणी फल-त्याग म्हणतात. पण मुख्य वस्तु त्यागच आहे.

# अशोकवनांत सीतेचा शोध

रावणाच्या प्रासादाचे सर्व महाल धुंडाळून झाले तरी सीता मारुतीला कोठेंहि दिसेना. अंतःपुर, संगीतशाळा, इत्यादि शोधली. मग महिला–महालांतून बाहेर पडून तो बागेंत आला आणि तेथें त्यानें पाहिलें. बागेंत लहान लहान मंदिरें होती. तेंथें त्यानें शोध केला. लतापर्णांनीं झांकलेले मांडव त्यानें धुंडाळले, पण कोठेंच... कोठेंच सीता त्याला दिसली नाहीं.

असह्य झालेला, दुःखावेग मनांतल्या मनांत दाबीत तो स्वतःशींच म्हणाला, 'सगळी लंका उलथीपालथी केली. रावणाच्या प्रासादाचा कानाकोपरा शोधून पाहिला. आतां आणखी मी तरी काय करूं ? मग काय सीतामाईचा शोध केल्याशिवायच परतायचं आपण ? अं हं. त्यापेक्षां इथेंच मी प्राणत्याग करीन. मला दुसरी गतीच नाहीं.'

एव्हांना तो अगदी उद्विग्न होऊन गेला होता. पण आपण असे हतबुद्ध झालों हा विचारच त्याच्या मनास रुचला नाहीं. 'छे, असे हातपाय गाळणं आपणाला शोभत नाहीं. अखेरपर्यंत धीर सोडतां कामा नये,' असा विचार करून त्यानें पुन्हां एकदां उभा प्रासाद पायांखालीं घातला. कोठें शोधायचें म्हणून त्यानें ठेवलें नाहीं. महालामहालांतून अनेक स्त्रिया त्याच्या दृष्टीस पडल्या. कुरूप...सुंदर...नागकन्या... सगळ्या इथून तिथून पकडून आणलेल्या !

पण सीता ?... सीता यांत कोठेंच नव्हती.

पुन्हा त्याचा धीर खचला. काय करावें हें त्याला कळेनासें झालें. पुन्हा तो विचार करीत बसला, 'किष्किंधेला असाच हात हालवीत गेलों तर माझ्या मित्रांना तोंड तरी कसं दाखवूं ? सीतेचा शोध कुठेंच लागत नाहीं हे ऐकल्यावर रामाची स्थिति काय होईल ? त्याचे प्राण त्यानंतर क्षणभर तरी कुडींत राहातील काय ? नि रामाच्या पश्चात् इतरांचं काय होईल ? सुग्रीवाकडे परत जाऊन त्याला आपण अपेशी ठरलों हें सांगण्यापेक्षां किनाऱ्यावरील अरण्यांत आपण वास करून राहावं हेंच बरं, पण जगायचं तरी कशासाठीं ? त्यापेक्षां मरण बरं नाहीं का ?

'मग संपातीनें सीता लंकेंत आहे, हें आपणांस सांगितलं तें कसं ? संपातीनें तिला पाहिल्यानंतर तर रावणानें सीतेला मारून टाकलं नसेल ? कदाचित् इथल्या राक्षसिणींच्या भक्ष्यस्थानीहि ती पडली असेल ! खरा प्रकार काय घडला असेल कुणास ठाऊक ? आपल्याला तर कांहीं कळेनासंच झालं आहे. माझं मनच संशयग्रस्त बनलं आहे. करूं तरी काय मी ?'

असाच कितीतरी वेळ तो विचारमग्न अवस्थेंत बसून होता. थोड्या वेळानें अकस्मात् त्याची नजर एका उपवनाकडे गेली. या उपवनांत अजून तो गेला नव्हता, मध्यें एक लहानसें देऊळ आणि भोंवती भल्यामोठ्या भिंती !

रामाचें ध्यान करून वायुपुत्र पुन्हा उठून उभा राहिला आणि त्या उंच भिंतींकडे दृष्टिक्षेप करीत स्वतःशींच म्हणाला, 'सीतामाई इथेंच असली पाहिजे.'

देवाचें स्मरण करून त्यानें एक उडी घेतली आणि अशोकवनाच्या तटबंदीवर बसून तें सुंदर उपवन तो न्याहाळूं लागला.

उंच भिंताडावर चढून हनुमानानें आंत पाहिलें आणि तत्क्षणींच त्याच्या अंगावर आनंदाचे रोमांच उभे राहिले. अखेर सीतेचा शोध आपण लावला या विचारानें तो सुखावला.

वसंतऋतूंतील ती रात्र. झाडें आणि वेली फुलांनीं डंवरलेल्या होत्या. कांहीं झाडे अगदीं जवळजवळ उभीं होतीं, त्यांचा आधार घेऊन हनुमान लपून राहिला. त्याची चाहूल लागतांच पाखरांचा थवा त्या झाडांवरून उडाला. हरणें आणि इतर प्राणी बावरून सैरावैरा पळूं लागले. झाडांवरून फुलांचा सडा पडला आणि त्या वर्षावांत हनुमान अक्षरशः बुडून गेला.

अशोक वनांतील जनावरांना फुलांनीं माखलेली हनुमानाची मूर्ति पाहून वाटलें कीं, प्रत्यक्ष मदनच त्या पंचपंच उषःकालीं अशोवनांत उतरला आहे !

डोळ्यांचें पारणें फिटावें असें अशोकवनाचें सौंदर्य होतें. सुंदर सुंदर हौद, सोनें, रुपें, हस्तिदंत, माणिकमोतीं यांचें नक्षीकाम केलेले सौध, स्फटिकाचे सोपान, मुद्दाम उभारलेल्या टेकड्या आणि कृत्रिम रीत्या बनविलेले धबधबे, हें सारें सौंदर्य हृदयांत कोठें आणि किती सांठवूं असें हनुमानाला होऊन गेलें. कित्येक वृक्षांच्या भोंवतीं सोन्यारुप्याचे चौथरे होते. वृक्षांना बांधलेले घुंगुर वाऱ्याची झुळूक आली म्हणजे छुमछुम् वाजत असत.

पानांनीं गच्च भरलेला एक अति विशाल वृक्ष पाहून हनुमान त्यावर चढून बसला आणि आजूबाजूला सीता कोठें दिसते का याचा शोध घेत तो स्वतःशींच म्हणाला, 'सीतेच्या जिवाला कांहीं दगाफटका झाला नसेल आणि ती जर का लंकेंत असेल, तर रामाचं चिंतन करण्यासाठीं ती अशा प्रसन्न ठिकाणीं आल्याशिवाय राहाणार नाहीं. तिला अशी निःस्तब्ध आणि सुंदर उपवनं आवडत असत हें मला माहीत आहे. उषःकालीं विश्वदेवतेचं पूजन करण्यासाठीं ती या ठिकाणीं आल्याशिवाय राहाणार नाहीं.'

त्यानें पुन्हा आजूबाजूला दृष्टिक्षेप केला आणि एका वृक्षाखालीं चौथऱ्यावर अतिशय सुंदर आणि देदीप्यमान कांति असलेली एक स्त्री त्याला दिसली.

शुक्लपक्षांतील चंद्रिकेसारखी ती मंद आणि नाजूक दिसत होती. शेवाळांतून डोकें वर काढून आकाशाकडे लुकलुक पाहाणाऱ्या कमलपुष्पासारखें तिचें लावण्य होतें. तिचे डोळे अश्रूंनीं डबडबलेले होते आणि अन्नपाणी वर्ज्य केल्यामुळें ती कांहींशी कृशहि झाली होती. तिच्या मुखकमलावर निराशेचें सांवट दिसत होतें. भोंवतीं राक्षसींचा गराडा असल्यामुळें, शिकारी कुत्रीं मागें लागलेल्या हरिणी-सारखी तिची स्थिति झाली होती. एखाद्या सर्पिणीसारखी तिची वेणी सुंदर होती, पण तिचें कौतुक करण्याच्या मनस्थितींत ती थोडीच होती! शब्दब्रह्म असुरांच्या हातीं पडावें, समृद्धीचे दिवस संपून कांहींहि कारण नसतांना विपन्नवस्था यावी, स्वप्नांचा चुराडा व्हावा, श्रद्धेला तडा जावा, हातीं घेतलेल्या कामांत यश आलें तरी अपयशाच्या खड्यानें त्या साफल्यावर विरजण पडावें, बुद्धिवैभवानें तळपणाऱ्या सूर्याला वेडाचें चंद्रग्रहण लागावें, निष्कलंक शुचित्वाला लोकापवादाचा डाग लागावा तशी हनुमानाच्या मनाची स्थिती झाली. एकाच वेळीं आदर आणि दया या भावना त्या स्त्रीविषयीं त्याच्या मनांत उफाळून आल्या.

तो स्वतःशींच विचार करूं लागला, ‘ विमनस्कतेची ही सुंदर मूर्ति निश्चितच सीतेची असली पाहिजे. ते पाहा आपल्या अंगावरचे राहिलेले सर्व अलंकार काढून तिनें वृक्षाच्या शाखांवर ठेवले आहेत. रावणानें तिचें अपहरण केलें तेव्हां तिनें वाटेंत टाकलेले सर्व अलंकार आपणास मिळाले आहेत. प्रत्यक्ष रामानें या दागिन्यांचं वर्णन आपल्याजवळ केलं असल्यामुळें आपण हे दागिने या क्षणीं ओळखूं शकतों. तिचा हा शेला आणि आपल्याला मिळालेला शेला दोन्हीं अगदीं जोडीचेच आहेत. रामाची सीता ती हीच असली पाहिजे. हिच्याच दुःखाच्या वेदनेनें रामाचं हृदय व्याकुळ झालं आहे. हिला जे अपमान सोसावे लागले, त्याचं शल्य रामाचं मन सोलून काढीत आहे. हिच्याच विरहाच्या यातना रामाला असह्य झाल्या आहेत. सीतेच्या मनांत राम आहे आणि रामाच्या मनांत सीता, नव्हे, या दोघांत तेवढंहि अंतर नाहीं. सीता आणि राम सीताराम आहेत.’

तिच्याकडे तो निश्चल नजरेनें पाहात असतांनाच साता समुद्रांवरून उड्डाण करून त्याचें मन रामाच्या चरणांपाशीं जाऊन पोंहोंचलेंही होतें. रामाविषयीं त्याच्या मनांत अपार कौतुक होतें. पुन्हां एकदा त्यानें सीतेकडे पाहिलें आणि तो स्वतःशींच म्हणाला, ‘रावणाशीं सहजपणें बरोबरी करूं शकणाऱ्या सामर्थ्यशाली वालीला आपल्या प्राणास मुकावं लागलं तें याच देवतेच्या शोधांत असतांना. कबंध आणि विराध धारातीर्थीं पडले ते हिच्याच मुक्तीसाठीं. खर, दूषण नि त्रिशिरस यांच्या नेतृत्वाखालीं आलेल्या चौदा सहस्र राक्षसांच्या सैन्यानें जन्मस्थानाची पंचक्रोशी रक्ताच्या सड्यांनीं शिंपून टाकली ती हिच्याचसाठीं. वानरांचं सार्वभौमत्व पराक्रमी वालीकडून सुग्रीवाकडे आलं तें हिच्याचसाठीं. महासागर पार करून मी

इथें लंकेंत आलों तो ह्या सीतामाईच्या सेवेसाठींच. हिच्या मुक्तीसाठीं उभं विश्व उध्वस्त करावं असं रामाला वाटलं तरी त्याचं कांहीं चुकलं असं मला वाटणार नाहीं. त्रिभुवनापेक्षां सीतेचं मोल खचितच अधिक आहे!'

आणि पुन्हा हनुमानाचें चित्त महासागर पार करून रामाप्रत गेलें.

तेवढ्यांत स्फटिकासारख्या नितळ तळ्यांत हंस पोहत असावा तसें चंद्रबिंब आभाळांत तरंगूं लागलें. जणूं वायुपुत्राला आपल्या परीनें साहाय्य करण्यासाठींच तें ढगांचा पडदा बाजुला करून तेथें प्रगट झालें होतें.

पानांच्या झरोक्यांतून हनुमान पाहात होता. काय करावें आणि काय करूं नये हेंच त्याला कळेनासें झालें होतें. त्यानें पुन्हां एकदां सीतेच्या म्लान मुखकमलाकडे सावचितपणें दृष्टिक्षेप केला. वादळांत सांपडलेल्या अवजड नौकेसारखें तें असहाय दिसत होतें. तिला वेढा घालून बसलेल्या राक्षसिणींच्या त्या विद्रूप चेहेऱ्यांकडे त्याला पाहावत नव्हतें. एकीला एकच डोळा होता, तर दुसरीला एकच कान. कोणाकोणाला तर डोळेसुद्धां नव्हते. कोणी बिननाकाच्या होत्या. कांहींचीं नाकें आकाशाकडे वळलीं होतीं. कांहींच्या डोक्यावर एकहि केंस नव्हता. कोणी आपले केंस हिडीस तऱ्हेनें विंचरले होते. कोणाचे ओंठ उंटाच्या ओंठासारखे किळसवाणे होते, तर कोणाच्या पाठींना पोकें आलीं होतीं. कांहीं अगदींच बुटक्या होत्या, तर कांहीं तालवृक्षाएवढ्या उंच! कोणाचीं थोबाडें डुकरांच्या थोबाडासारखीं, तर कोणाचीं शेळ्या—म्हशींसारखीं! हातांत भाले व इतर शस्त्रास्त्रें धरून त्यांनीं सीतेभोंवतीं डोळ्यांत तेल घालून पहारा ठेवला होता.

त्यांच्या घोळक्यांत फिकट चेहऱ्याची ती राजकन्या बसली होती. आधाराविना जमिनीवर कोसळून पडलेल्या लतिकेसारखी ती अगदीं एकटी होती. सोबत होती तिला ती तिच्या शीलाचीच.

अजून पहांट व्हावयाला अवकाश होता. वेदमंत्रांच्या घोषानें आणि भाटांच्या गायनाच्या आवाजांत रावण झोंपेंतून जागा होऊन उठून बसला होता. जागा आल्याबरोबर पहिल्यांदा त्याला आठवण झाली ती सीतेची. तसाच शयनमहालांतून बाहेर पडून तो आपल्या दासदासींसह अशोकवनाकडे निघाला. बरोबर सुगंधी मशाली होत्या. डोक्यावर राजछत्र. भोंवतीं दासींचा दासी मेळावा. अलंकारांनीं मढलेल्या, पांढरींशुभ्र वस्त्रें परिधान केलेल्या. त्या घोळक्यांतून चाललेला रावण मन्मथासारखा सुंदर दिसत होता.

ही मिरवणूक अशोकवनाच्या प्रवेशद्वाराशीं आली तेव्हांच हनुमानाला तिची चाहूल लागली. रावणाला येतांना त्यानें पाहिलें. तत्क्षणींच तो दाट पानांचा आधार घेऊन दडून राहिला.

त्या वेळीं रावण इतका सुंदर व सामर्थ्यवान् दिसत होता कीं, कोणाचीहि त्याला दृष्ट लागली असती. त्याला येतांना पाहातांच सीता भयभीत होऊन वादळांत सांपडलेल्या केळीसारखी थरथर कांपूं लागली.

यावेळचें सीतेचें चित्र मनःचक्षूंपुढें आणण्यासारखें आहे. कामांध झालेल्या एका उन्मत्त पुरुषाच्या कचाट्यांत सांपडल्यामुळें एखाद्या असहाय्य अबलेला किती मनस्वी दुःख होत असेल याची कल्पना कोणालाही करतां येण्यासारखी आहे. जनककन्येच्या मनाची स्थिति त्यावेळीं काय झाली असेल? रामपत्नी सीतेला त्यावेळीं काय वाटत असेल? या संदर्भांत वाल्मीकींनीं योजिलेल्या उपमा उत्प्रेक्षा नीट समजाव्यात अशी ज्यांची इच्छा असेल त्यांनीं त्या शुचिर्भूत मनानें वाचाव्यात.

या सुंदर उपमांचा अनुवाद दुसऱ्या भाषेंत करणें ही केवळ अशक्यप्राय गोष्ट आहे. असें असूनहि यांतल्या कांहींचा निर्देश येथें केल्यावांचून राहवत नाहीं.

आज ना उद्यां सीता आपल्याला होकार देईल अशी आशा अजूनहि रावणाच्या मनांत होती. सीतेचें सर्वांग धुळीनें माखलें होतें व तिनें एकहि अलंकार परिधान केला नव्हता. तरीहि दागिन्यांनीं मढवलेल्या एखाद्या राजकन्येसारखी ती तळपत होती. उन्मळून पडलेल्या एखाद्या वृक्षासारखी ती दिसत होती. चिखलानें डागळलेल्या पंकजासारखें तिचें मुखकमल छायाप्रकाशानें माखलें होतें. गानलुब्ध नागिणीसारखी ती डुलत होती. चहूं दिशांना आग लागावी, युद्धाच्या ऐन धुमश्चक्रींत सेनापति धारातीर्थी पडल्यामुळें उभी सेना अनाथ व्हावी, वाहत्या नदीचें पात्र अकस्मात कोरडें ठणठणात पडावें, मध्येंच विघ्न आल्यामुळें अपुऱ्या राहिलेल्या यज्ञाचें होमकुंड रितें व्हावें, कमलपुष्पांनीं गच्च भरलेल्या तलायांत उन्मत्त हत्तीनें शिरून नासधूस करावी, आपल्या कळपापासून एखादी हत्तीण दूर जावी, एखाद्या कैद्याच्या मुसक्या बांधाव्यात, तशी तिची स्थिति होऊन गेली होती.

ती थरथर कांपत होती. रावणाला येतांना पाहातांच तिचा मनोरथ वेगानें निघाला आणि तिनें आपल्या चित्तवृत्ति रामावर एकाग्र केल्या. दूर असलेल्या प्रभु रामचंद्राची ती करुणा भाकूं लागली. 'कधीं येणार ते?' तिनें सारखा याचाच ध्यास घेतला.

रावण तिच्याजवळ येऊन बोलूं लागला. वृक्षाआड लपून बसलेला हनुमान पुढें काय होतें याची आतुरतेनें प्रतीक्षा करीत राहिला.

सीता त्याला कशी वळणार? तिनें रावणाला त्याप्रसंगीं सदुपदेश केला व हनुमानानें तो ऐकिला.

---

# श्रीरामभक्त हनुमान

लेखक : वि. के. छत्रेशास्त्री

राज्यावर बसल्यावर श्रीरामांनीं स्वमुखानें हनुमानाबद्दल ऋषिवृंदापुढें प्रशंसोद्गार काढले आहेत —

**शौर्यं दाक्ष्यं बलं धैर्यं प्राज्ञता नयसाधनम् ।**
**विक्रमश्च प्रभावश्च हनूमति कृतालयाः ॥**

'शौर्य, दक्षता, सामर्थ्य, धैर्य, चातुर्य व राजनीतिज्ञता या श्रेष्ठ गुणांनीं माझ्या हनुमानाचे शरीरांत एकत्र वस्तव्य केलें आहे. व—

**एतस्य बाहुवीर्येण लंका सीता च लक्ष्मणः ।**
**प्राप्ता मया जयश्चैव राज्यं मित्राणि बांधवाः ॥**

'याच्या साहाय्यामुळेंच मला सीता परत मिळाली, लक्ष्मणाला पुनर्जन्मच जणुं मिळाला, लंका जिंकता आली व त्यामुळें मी घरीं येऊन मित्र व बांधवांसह राज्याचा धनी झालों. धन्याचे मुखांतून अशी तोंड भरून केलेली स्तुति ऐकण्याचें भाग्य किती सेवकांस मिळत असेल ?

श्रीराम पुढें म्हणतात-'तुझ्या उपकारांची फेड माझ्याकडून होणें अशक्यच आहे व ती शक्य असेल तितकी करणेंहि योग्य नाहीं. तर हे हनुमंता—

**मदंगे जीर्णतां यातु यत्त्वयोपकृतं कपे ।**
**नरः प्रत्युपकाराणामापत्स्वायाति पात्रताम् ॥**

तुझे हे उपकार माझ्या अंगांतच जिरून जावोत कारण उपकार फेडण्याच्या प्रयत्नांत ज्याचे उपकार फेडावयाचे तो संकटांत सांपडण्याची शक्यता असते. म्हणून माझ्या कंठांतला हा रत्नहार तुझ्या गळ्यांत घालतों असें म्हणून श्रीरामांनीं हनुमंताच्या गळ्यांत हार घालून त्याचा गौरव केला.

सीतेचा शोध लावून परत आल्यावर आपली कृतज्ञता व्यक्त करतांना वानरगणांचे समोर श्रीराम म्हणतात—

**तन्नियोगे नियुक्तेन कृतं कृत्यं हनूमता ।**
**न चात्मा लघुतां नीतः सुग्रीवश्चापि तोषितः ॥**
**अहं च रघुवंशश्च लक्ष्मणश्च महाबलः ।**
**वैदेह्या दर्शनेनाद्य धर्मतः परिरक्षिताः ॥**

उत्तम सेवक कसा असावा हें हनुमंतानें आपल्या आचरणानें दाखविलें आहे. स्वतःची इभ्रत कमी करून न घेतां सांगितलेलें काम त्यानें उत्तम प्रकारें करून सुग्रीवाला संतुष्ट केलें आहे. सीतेला प्रत्यक्ष भेटून मी, लक्ष्मण व रघुवंश यांचें आज रक्षण केलें आहे. सांगकाम्यासारखा सीता अमुक ठिकाणीं आहे म्हणून केवळ पाहून आला नाहीं तर (१) तिला ओळख देऊन धीर दिला. श्रीरामांचा निरोप तिला सांगितला. तिचा निरोप श्रीरामासाठीं परत आणला. (२) अशोकवनाचा विध्वंस करून शत्रूला आव्हान दिलें. (३) रावणाची सभा कैद पत्करून प्रत्यक्ष पाहिली. (४) लंकादहनानें आपल्या सामर्थ्याची चुणुक दाखवून राक्षसाचा आपल्या सामर्थ्या-विषयींचा विश्वास नष्ट केला.

सीतेला ओळख देतांना हनुमंताचें चातुर्य प्रगट झालें आहे.

रावण तिची मनधरणी करण्याचा प्रयत्न करून परत गेल्यावर सीता वैतागून आत्महत्त्या करण्याच्या इच्छेनें गळफांस लावून घेण्याच्या तयारींत झाडावर बसलेल्या हनुमंतास दिसली. तेव्हां तो मनाशीं म्हणाला—

**यदि ह्यहं सतीमेनां शोकोपहतचेतनाम् ।**<br>
**अनाश्वस्य गमिष्यामि दोषवद्गमनं भवेत् ॥**<br>
**गते हि मयि तत्रेयं राजपुत्री यशास्विनी ॥**<br>
**परित्राणमपश्यंती जानकी जीवितं त्यजेत् )**

'हिला आतां मी धीर दिल्याशिवाय गेलों तर कर्तव्यांत हेळसांड केल्यासारखें होईल. कारण इकडे आपल्या शोधास व सुटकेस कोणीच येत नाहीं अशी खात्री पटून ही बिचारी राजकन्या जीव देईल, व मग मी सीतेचा शोध घेऊन आलों ही केवळ बातमी श्रीरामांकडे नेण्यानें काय फळ पदरांत पडणार आहे ? पण हिच्याशीं बोलावें कसें ? संस्कृतांत बोलावें तर ती वानररूपी रावणच मला समजेल व माझ्याशीं मुळीच भाषण करणार नाहीं. श्रीरामांची मुद्रिकाहि तिला मायावीच वाटेल.' असा बराच विचार करून शेवटीं राजा दशरथाचे वर्णनापासून श्रीरामकथा मधुर स्वरांत गायला त्यानें सुरवात केली—

**राजा दशरथो नाम रथकुंजरवाजिनाम् ।**<br>
**पुण्यशीलो महाकीर्तिरिक्ष्वाकूणां महायशाः ॥**

आपल्या श्वशुरकुलाचें मधुर स्वरांतील गुणगान कानीं पडतांच सीतेची कळी उमलली ! तिनें आत्महत्त्येचा बेत टाकून दिला व कोण गात आहे म्हणून इकडे तिकडे बघत असतां फांदीवर हनुमान् तिला दिसला ! लगेच त्यानें खालीं उडी मारून तिला वंदन केलें व श्रीरामांची मुद्रिका ओळखीसाठीं तिच्या हातांत टाकली ! नाजूक कामें अशीं युक्तीनें पार पाडावीं लागतात. अयोध्येजवळ वनवासांतून आल्यावर

भरताचें मनोगत ओळखण्यासाठींहि श्रीरामांनीं हनुमंतासच पाठविलें. त्यावेळेस ते म्हणाले—

**ज्ञेयाः सर्वे च वृत्तांता भरतस्येंगितानि च ।**
**तत्त्वेन मुखवर्णेन दृष्ट्या व्याभिषितेन च ॥**

भरताच्या मुखचर्येवरून, बोलण्याच्या स्वरावरून व नजरेवरून त्याच्या मनांत काय आहे. मी राज्यावर बसावें कीं नाहीं–हें ओळखून मगच त्याला मी आल्याची खबर दे !

रावणाच्या अंतःपुरांतील अस्ताव्यस्त निजलेल्या स्त्रिया रात्रीं पाहिल्यावर हनुमताला शंका आली कीं 'आपल्या हातून हें पाप तर घडलें नाहीं ? पण स्त्रीचा शोध अंतःपुरावांचून मी अंतःपुरांत कोठें करावयाचा होता ? नाहीं-मला हें पाप लागणार नाहीं. कारण—


**मनो हि हेतुः सर्वेषामिंद्रियाणां प्रवर्तने ।**
**शुभाशुभास्ववस्थासु तच्च मे सुव्यवस्थितम् ॥**

शुद्ध बुद्धीनेंच, सीता यांच्यांत आहे कां हें शोधण्यासाठींच मी या स्त्रियांकडे पाहिलें असल्यामुळें मला हें पाप लागणार नाहीं. मन हेंच सर्व पापाचें मूळ आहे. त्यांत विकार उत्पन्न झाला नव्हता म्हणून मला पाप लागणार नाहीं असें त्यानें आपलें समाधान करून सुटकेचा एक दीर्घ निःश्वास सोडला.

हनुमानानें आपली इच्छा व्यक्त केली त्याप्रमाणें श्रीरामांनीं त्याच्या स्वामिभक्तीबद्दल प्रसन्न होऊन—

**मत्कथाः प्रचरिष्यंति यावल्लोके हरीश्वर ।**
**तावद्रमस्व सुप्रीतो मद्वाक्यमनुपालयन् ॥**

'माझी कथा जोंपर्यंत या भूतलावर गायली जात राहील तोंपर्यंत ती श्रवण करीत आनंदानें रहा–चिरंजीव–हो' असा वर दिला. म्हणूनच सात चिरंजीवांत आज हनुमान् मानाचें एक स्थान मिळवून बसले आहेत,



# पुराणावरील आक्षेपाचें खंडन

**सुमारें शंभर वर्षांपूर्वीच्या काळांत गोपाळ हरी देशमुख लोकहितवादी, हे एक द्रष्टे व सडेतोड विचारसरणीचे गृहस्थ होऊन गेले. त्यांनी पुराण-ग्रंथास उद्देशून काढलेल्या उद्गारांस डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर यानीं दिलेलें पुढील उत्तर खरोखर मननीय आहे.**

"ग्रंथ" या विषयावर रा. ब. गोपाळराव हरि देशमुख यांनीं (सन १८७८) एक व्याख्यान दिलें. रावबहादुरांस आमच्या पुरातन ग्रंथांविषयीं माहिती पुष्कळ, व त्यांतील सत्य आणि हितावह गोष्टी सध्यां प्रचारांत याव्या अशी पूर्ण इच्छा, यामुळें त्यांचीं असल्या विषयावरचीं व्याख्यानें रसभरित व त्यांपासून बोध होणारीं अशीं असतात.

आपणांमध्यें जे अनेक विषयांवर जुने ग्रंथ आहेत ते बहुतेक फार चांगले आहेत, व ते ज्ञानप्राप्तीचीं साधनें आहेत. रावबहादुर असें म्हणतात कीं, पुराणें उत्पन्न झालीं तेव्हां लोकांत अनेक प्रकारचें अज्ञान शिरलें. यावरून आमच्या सणांत जसा शिमगा तशीं ग्रंथांत पुराणें होत, असें म्हणून त्याच्या स्पष्टीकरणार्थ रावबहादुरांनीं केलेल्या भाषणाचा सारांश 'इंदुप्रकाशां'त दिला आहे. तो येणेंप्रमाणें—

शिमग्यांतील सोरट जशी कोणाची मर्यादा किंवा अभिमान ठेवीत नाहींत, तद्वत् या पुराणांतील एकाही देवतेस छळल्यावांचून, नांवें ठेवल्यावांचून आणि त्याची फजिती केल्यावांचून ठेविलें नाहीं! वेदांतील आदिदैवत जो इंद्र, ज्याच्या स्तवनानें मेघ, अग्नि आदिकरून आपणांस प्राप्त होतात असें वेदांनीं गाइलें, त्या इंद्राची या कुटाळ पुराणांनीं किती हो फजिती केली! शिव शिव! त्यास अहिल्येकडे गेला असें म्हणून छिनाल तर ठरविलें! त्याच्या अंगास गौतमाच्या शापेंकरून हजार भगें तर पाडलीं! आणि ह्याप्रमाणें त्याची किती विटंबना केली! चंद्र घेतला; त्यास गुरुपत्नीगामी कलंकी ठरविला. सर्व सृष्टीचा उत्पत्तिकर्ता प्रजापति जो ब्रह्म त्यास कन्यागामी ठरवून सर्व देवतांचे पूर्वीं जी त्याची अग्रपूजा व्हावयाची, ती तर अगदींच उडवून तो सर्वथैव पूजार्ह नव्हे असें प्रतिपादन केलें! शंकर घेतला; तो एका भिल्लिणीवर आसक्त झाला असें वर्णन करून त्याकडे कमी-

पणा आणला, व त्याचें लिंग गळालें असें म्हटलें! कृष्ण तर साऱ्या मुलुखाचा जार, चोर ठरवून त्याची अशी नाहीं नाहीं ती विटंबना केली! काय गोंधळ व मूर्खपणाचा बाजार हा! एकाही देवाचा अभिमान धरून ह्या भडभड्या पुराणग्रंथांनीं त्यास आपल्या निंदारूप जालांतून सोडिलें नाहीं. ह्यावरून पुराणांस लवमात्र तरी धर्माभिमान आहे काय? जिकडे तिकडे सर्वांची फटफजिती! काय अनर्थ हा! आणि ह्या योगानें त्या देवांची नाटकांत सोंगें येऊं लागून अगदीं हलकट लोकांकडून त्यांचा उपमर्द होण्यास चुकेनासा झाला! आमच्या लोकांतून धर्माभिमानाचें नांव देखील उठलें. इतर लोकांचा धर्मावेश किती आहे, हें नुकत्याच संपलेल्या तुर्क व रूस ह्या मुसलमान व ख्रिस्ती लोकांच्या युद्धावरून सहज कळून येईल. तुर्कीच्या सुलतानानें सर्वांस आवेश यावा म्हणून जिहाद (धर्मयुद्ध) सुरू केलें. ह्या अघोर धर्मयुद्धांत कोट्यावधि प्राण्यांचा संहार झाला! कोण हा धर्माभिमान! आम्ही लोक तर धर्मविषयांत अगदीं निरभिमान व निर्लज्ज झाले आहों! आणि ह्या सर्वांस हीं अप्रबुद्ध पुराणेंच कारण होत. पंचवीस वर्षांपूर्वी मुंबईस जो पारशी व मुसलमानांचा बडा दंगा झाला ह्याचें कारण काय बरें? एका पारशानें महंमद पैगंबराचें चित्र काढून तें मुसलमानांच्या प्रख्यात जुम्मा मशिदीस लाविलें, व त्यावर पैगंबरास हलकटपणा आणणारे दुसरे कांहीं शब्द लिहिले; परंतु त्यावरून सर्व मुंबईचे लाखों मुसलमान अभिमानानें धर्मवेडे झाले व पंधरा दिवस सारखा पारशांवर हल्ला करून रस्त्यांतून एकही पारशी फिरेनासें केलें! त्याच चित्र लावणाऱ्या पारशानें मुसलमानांविरुद्ध केलेलीं धर्मपुस्तकें सरकारकडून त्याच पारशाच्या डोक्यावर देऊन त्याच्याच हातानें जाळविलीं! ह्यावरून त्यांच्या जातींत धर्म किती जागृतावस्थेंत आहे, हें तेव्हांच कळून येतें. ह्याचा लेश तरी आम्हांत सांपडेल काय? नाहीं. कारण आमचे सर्वच देव जार, चोर आदिकरून दुष्कृतींत हलके! ख्रिस्ती लोकांतही कमी धर्माभिमान आहे असें नाहीं. त्यांनीं धर्मसंबंधीं क्रूसेड्स् नांवाची केवढालीं धर्मयुद्धें केलीं हें इतिहासज्ञात्यांस पूर्ण विदित आहेच. सारांशानें पाहिलें तर आमच्यासाठीं अनेक उपयुक्त ग्रंथ आपल्या पूर्वजांनीं करून ठेविले आहेत; परंतु त्यांत धर्मसंबंधानें आम्हांस निर्लज्ज व निरभिमान असें या पुराणांनीं केलें व सर्वत्र शिमगा माजविला! हें फार अयोग्य केलें. आतां भागवता-सारख्या ग्रंथांतून वेदांत वगैरे फार उत्तम गोष्टी आहेत, त्या आपणांस घेण्यासारख्या आहेत; परंतु लोकांचें तिकडे लक्ष न जातां पौराणिक कथांवरच विशेषेंकरून अवलंबून असतें, हें चांगलें नव्हे. आम्हांस आमच्या ग्रंथांविषयीं मोठा अभिमान आहे आणि असणें हें योग्य आहे, परंतु पुराणापर्यंत आलों म्हणजे सर्व ग्रंथांची त्यांनीं घाण केलेली पाहून फार वाईट वाटतें. आतां माझ्या मतें आपण

माधान करून घेऊं कीं, हा शिमगा होऊन सर्व बजबज झाली
ी व फार अमंगळ व्यापार चालले आहेत खरे, तरी थोड्याच दिवसांनीं वद्य
ला कीं, गुढीचा पाडवा लौकरच येणार आहे. आतां कांहीं फार दिवस
चें सुख भोगणें नको. तद्वत् ह्या पुराणांनीं जो आमच्या धर्मांत व्यामोह उत्पन्न
वांस भ्रांत व धर्मच्युत केलें आहे, हा काल लौकरच जाऊन आपण आपल्या
दिक धर्मावर येऊं ही आशा पूर्ण आहे. सुशिक्षणाच्या प्रभावानें पुराणांतील
गप्पा लोकांचे अंतःकरणांतून जात आहेत व कांहीं दिवसांनीं लौकरच
न केल्याप्रमाणें आपण त्या वर्षप्रतिपदेच्या सणास पोहोंचूं. ईश्वर तो सुदिन
ल तेव्हां खरें."


आम्हांस वाटतें कीं, ह्या वर्णनांत पुराणांचा वाजवीपेक्षां जास्ती विचका करून
र आहे. पुराणांतील चांगल्या अंशापैकीं केवळ भागवतांतील वेदांताचा मात्र
दुरांनीं थोडासा उल्लेख केला आहे. परंतु सर्वच पुराणें वाईट नव्हत,
एकच पुराण सर्वांशीं वाईट नव्हे. भक्तिमार्गाचें मुख्य प्रतिपादन पुराणांमध्यें
आणि त्या भक्तीच्या दृष्टांतभूत अशा प्रल्हाद व ध्रुव यांच्यासारख्या
ऱ्या कथा पुराणांतच आहेत, त्यांकडे रावबहादुरांची दृष्टि गेली नाहीं. रामायण
भारत यांची गणना रावबहादुर कशांत करतात ते समजत नाहीं. ह्या ग्रंथांस
ह असें नांव आहे, परंतु त्यांचा उल्लेख व्याख्यानांत कोठेंच दिसत नाहीं. तर
त जर त्यांची ते गणना करीत असतील तर हें वर्णन फारच अप्रयोजक म्हटलें
. महाभारत हें भगवद्गीतेसारख्या अनेक रत्नांचें भांडार आहे. आतां पुराणां-
वाईट प्रकार पुष्कळ आहेत यांत कांहीं संशय नाहीं. परंतु सर्वच पुराणसमूहाची
नकारें विदारणा करणें ठीक नव्हे. वाईट अंश स्मृतींमध्येंही पुष्कळ आहेत.
र्दै आपल्या देशांत असें झालें कीं, जो उठला तो आपल्या मतास पुष्टीकरण
ास स्मृति व पुराण रचूं लागला; त्यामुळें पुराणांत जसा निंद्य आणि त्याज्य अंश
तसाच स्मृतींतही आहे. पुराणें टाकून वैदिक धर्मावर आपण जाऊं अशी श्रोत्यांची
हादुर विनवणी करतरत, तो वैदिक धर्म कोणता? नाना प्रकारच्या देवतांस उद्देशून
व हवन करणें हाच कीं नाहीं? आणि त्या वैदिक देवता तरी सर्व प्रकारें अदुष्ट
आहेत काय? सूर्यास आपली बहीण जी उषा तिचा जार व आपल्या मातेचा
सु म्हणजे दुसरा पति असें ऋग्वेदसंहितेंत म्हटलें आहे. इंद्रास अहल्याजार म्हटलें
, आणि ब्राह्मणांत तर बऱ्याच विचकट आणि पोरकट गोष्टी आहेत. आपणांस
कांहीं कर्तव्य तें हें नव्हे कीं, असुक एक ग्रंथसमूह सर्वथा टाकावा, आणि असुक
त. बरें वाईट सर्वांत आहे. वेदांत आहे. पुराणांतही आहे. तर वाईटाचा त्याग
प बरें आहे त्याचें ग्रहण करणें हा आमचा उद्देश असावा; आणि बरा अंश

वेदांतही आहे, पुराणांत आहे. वेदांतही स्पष्ट रीतीनें सांपडत नाहींत अशा
गोष्टी पुराणांत आहेत. आणि ह्या प्रकारें बारा अंश सर्व ग्रंथांतून काढून
केला असतां जो शुद्ध केलेला हिंदुधर्म निघेल तो अनुपम होईल. शुद्ध केलेला
हा एकांतिक अथवा एकेश्वर धर्म होय, आणि ह्याच्या ठायीं जे उत्तम विचार
ते इतर देशांतील लोकांसही ग्राह्य होतील. ज्या धर्माभिमानाचें रावबहादुरांनीं
केलें आहे तो रक्तस्राव करणारा, नरकाप्रत नेणारा धर्माभिमान; तसा आम्हांस
हिंदुजातीमध्यें अशा प्रकारचा अभिमान कधींच नव्हता. इतर लोकांचा
बाळगून, सत्याचा उपदेश त्यांस करून, त्यांचा मोह दूर करणें व त्या गोष्टींत
प्राणव्ययही करण्याविषयीं मागेंपुढें न पहाणें, ह्यांत जो धर्माभिमान आहे तो
त्याचीं विलक्षण उदाहरणें बौद्धधर्मांच्या इतिहासांत सांपडतात.

---


## जनतेचें आरोग्य म्हणजेच राष्ट्राचें सामर्थ्य

**राष्ट्र सामर्थ्यवान करण्यासाठीं बलवान व्हा..** यासाठीं नि
व्यायाम आणि खेळ खेळणें जरूर आहे. यासाठीं लागणारी उपकरणें
डबेल्स, लेझीम...यासारखा सर्वश्रेष्ठ माल आम्ही बनवितो. नगरपालि
जिल्हा परिषदा, ग्रामपंचायती, व्यायाम शाळा, विकास केंद्रें यांना
पुरवितो.



**लक्ष्मीविजय वुडन आर्टिकल वर्क्स,** ८५ बापू खोटे
जांभळी मोहोला,

प्रोप्रायटर—डी. एच्. साखरकर

# माझें कर्तव्य कोणतें ?

नीं लहान असतां शाळेंत जावें; पुढें वरिष्ठ प्रतीचें शिक्षण मिळवून आपलें न संस्कृत करून परीक्षा द्याव्या, कामकऱ्यानें सकाळीं उठून कामावर जावें; संपल्यावर संध्याकाळीं परत यावें; देशभक्तांनीं डिसेंबरचा महिना आला अत्यंत उद्योगीपणा प्रकट करावा व कॉंग्रेस, कॉन्फरन्स व कलाप्रदर्शनें भरवून देशावरचा प्रेमभाव प्रगट करण्याचा प्रयत्न करावा हीं व दुसरीं सर्व कृत्यें आमचे हातून कां होतात असा कोणी प्रश्न केला त्याला भिन्न मनुष्यांकडून भिन्न भिन्न उत्तरें मिळतील. कोणी म्हणेल पोटाकरितां उद्योग करितो; कोणी म्हणेल कीं; मी उच्च पदावर चढण्या- अभ्यास करितो; कोणी म्हणेल कीं, माझे प्रयत्न माझ्या देशाकरितां चाललेले याप्रमाणें ठराविक उत्तरें आपणाला मिळतील. या उत्तरांवरून एक गोष्ट ते व ती नेहमीं आपल्या प्रत्ययासहि येते, ती ही कीं, आम्हांला कोणतीहि आपलें 'कर्तव्य' म्हणून करण्याची अद्याप संवय लागलेली नाहीं. माझें कर्तव्य आहे, या प्रश्नाचें उत्तर ठरवून जर आपण उद्योग करण्यास प्रवृत्त होऊं तर हातून होतें त्यापेक्षां कितीतरीपट अधिक उपयुक्त काम होईल यांत नाहीं.

'माझें कर्तव्य काय आहे' हा प्रश्न सर्वांस सारख्याच महत्त्वाचा आहे. परंतु रांपेक्षां तरुणांस अधिक महत्वाचा आहे. आम्ही ज्या प्रकारचें उत्तर या प्रश्नास या प्रकारचा आमचा आयुष्यक्रम उपयुक्त किंवा निरुपयोगी होणार असल्यामुळें, उत्तर जितकें अधिक विचार करून दिलेलें असेल तितकें चांगलें. गलबताला हांकावयाचें असलें म्हणजे त्याला समुद्राचा नकाशा जवळ ठेवणें भाग असतें. आपणाला जीवनरूप गलबत या भवसागरांतून हांकावयाचें असल्यामुळें त्याचा नकाशा तरी आपल्याजवळ काढलेला असला पाहिजे.


'माझें कर्तव्य काय' या प्रश्नाचें उत्तर दोन प्रकारांनीं देतां येईल. एक ऐहिक व पारमार्थिक दृष्टीनें. ऐहिक म्हणजे माझें कुटुंब, माझें राष्ट्र किंवा मी रहातों तें यांविषयीं कर्तव्य; व पारमार्थिक म्हणजे ईश्वराविषयींचें कर्तव्य. ऐहिक कर्तव्या- च जरी विचार केला तरी आमचे प्रयत्न व्हावे तितके होतात, असें म्हणतां येत ऐहिक कर्तव्य करण्याचें मुख्य साधन पैसा होय, व तो मिळविण्याचे आमचे कितपत सफल होतात, हें कोणास सांगावयास नको.

ऐहिक कर्तव्य करण्यास एक दुसरी गोष्ट अत्यंत जरूरीची आहे. ती गोष्ट उत्तम शरीरप्रकृति होय. शरीर धड तर मन धड, अशी जी म्हण आहे ती आर्द आहे. तेव्हां आमचें येथलें कर्तव्य नीट करतां येण्याकरितां आम्ही आपल्या शरं घेतों यापेक्षां, अधिक काळजी घेतली पाहिजे.

ऐहिक दृष्टया कर्तव्याचा विचार केला तरी आपली कर्तव्यमर्यादा बरीच होते हें वर सांगितलेंच आहे. कोणाही कर्तव्यदक्ष मनुष्याला आपल्या राष्ट्राचें तेंच आपलें हित हें सांगावें लागत नाहीं. राष्ट्रावर प्रेम असलें तर तो त्याचे उ मार्ग शोधून काढणारच. परंतु कोणाचीही उन्नति करावयाची म्हणजे प्रथमतः उन्नति झाली पाहिजे. यासाठीं आपलें वर्तन चोख असणें अत्यंत जरूरीचें चोख वर्तन ठेवण्यास प्रामाणिकपणा, दृढविश्वास, सत्यावर निष्ठा, परमेश्वर त्याच्या चांगुलपणावर श्रद्धा हे गुण अंगीं अवश्य असले पाहिजेत. ना आपलें ऐहिक कर्तव्य-देशोन्नति करणें-तें आपल्या हातून चांगल्या प्रकारें, कि मुळींच व्हावयाचें नाहीं. आम्हांला वारंवार सांगण्यांत येतें कीं, मनुष्य हा सं पदार्थांचा धनी आहे, तेव्हां त्यानें ह्यांचा खुशाल उपभोग घेत असावें. परंतु कि मजा मारल्यानें, किंवा पैसा मिळविण्याची हांव धरल्यानें आपलें कर्तव्य होत खिस्ती शास्त्रांत म्हटलें आहे कीं, मनुष्य सारें जग मिळवून जर आपला आ करून घेईल तर त्याला काय फायदा होईल! हा प्रश्न आमचे नजरेपुढें असला पाहिजे.

या जगाविषयीं आमचें कर्तव्य करण्यास सद्वर्तन व परमेश्वरनिष्ठा अवश्य आहे हें प्रत्येक विचारी पुरुषास समजण्यासारखें आहे. आपलें क करून राष्ट्राची उन्नति करण्यास—मग ती उन्नति कोणत्याही प्रकारची अ परमेश्वरनिष्ठा फारच अगत्याची आहे. या कामीं धर्ममतैक्याचा जितका उपयोग तितका दुसरा कशाचाही होत नाहीं. असें मतैक्य असेल तरच आम्हीं एकमे उन्नति करण्यास झटूं. नाहींतर आमची आहे तीच स्थिति कायम राहील. मोठमो सभांतून आम्हीं एकमेकांविषयीं जी सहानुभूति दाखवितों ती कितीशी टि असते? सभेच्या मंडपांतून बाहेर पडतांच आमचे जातिभेद पुन्हां सुरू होतात नाहींत? ही जर खरी वस्तुस्थिति आहे, तर आम्हीं आपलें कर्तव्य ओळ तदनुरूप वागतों असें कसें म्हणतां येईल? एकमेकांविषयीं प्रेम उत्पन्न होण बंधुप्रीतीची वाढ झाली पाहिजे व तें उत्पन्न होण्याला धर्ममतैक्याविना दुसरा नाहीं. आम्हीं आपलें पारमार्थिक कर्तव्य करण्यास अधिक उद्युक्त झालें पाहिजे. अ केलें तरच आमचें ऐहिक कर्तव्यही चांगल्या प्रकारें बजावलें जाईल.

शिक्षणाचा इतक्या झपाट्यानें फैलाव होत असतां या शक्य गोष्टी आम च
तून कां घडत नाहींत हा प्रश्न विचार करण्यासारखा आहे. याचें उत्तर देणें सोपें
हे, परंतु तदनुरूप वागणें कठीण आहे! आमच्यांत नीतिधैर्य नाहीं, कोणतीही
ष्ट चांगली अशी आमची खात्री असली तरी ती करण्याचें आम्हांला सहसा धैर्य
त नाहीं. आमच्यांतील शहाणे लोक, जे वास्तविक लोकांचे मार्गदर्शक झाले पाहिजेत,
आपल्या कर्तव्याकडे लक्ष देत नाहींत. कोणी म्हणतो कीं सकाळपासून संध्याकाळ-
र्ति सरकारची अत्यंत प्रामाणिकपणें नोकरी करण्यांत आमचा सर्व वेळ जातो व
कर्तव्याकडे लक्ष देण्याला आम्हांला ताकद उरत नाहीं. अशा रीतीनें कोणी कांहीं,
णी कांहीं सबबी काढून सर्व कर्तव्यपराङ्मुख होत असतात! परंतु बंधुहो, आपल्या
ग्राचे स्थितीकडे नजर द्या, म्हणजे ही कर्तव्य टाळण्याची संवय कशी घातक आहे,
तुम्हांस दिसून येईल. आम्हीं प्रत्येकानें जर परमेश्वराला स्मरून आपलें कर्तव्य
ण्याचा प्रयत्न केला तर किती मोठा कार्यभाग होणार आहे!




## लहान मुलांच्या आंकडीवर

### जुनें आणि प्रसिद्ध औषध

**जयकर्स चिल्ड्रन्स कन्व्हलशन् रेमेडी**

सोल प्रो. जयकर ब्रदर्स, ६६, मरीन ड्राईव्ह, मुंबई १.

: स्टॉकिस्ट :

कांचनलाल वाडीलाल कं. — दवाबझार, मुंबई २.

# पूर्णयोगाची साधना

योगेश्वर श्री अरविंद

## ( ३ )

मानवी आत्म्याची ही गरज भारतीय आध्यात्मिक साधनेंत इष्टदेवता, अवतार, गुरु या कल्पनांच्या द्वारां भागविली जाते. इष्ट देवता म्हणजे एकादी कनिष्ठ देवता नसते, तर विश्वातीत विश्वरूपाचें एक नामरूप असतें. बहुतेक सर्व धर्मां असें कोणतेंतरी विश्वातीत विश्वरूपाचें नामरूप पाया म्हणून किंवा इतर प्रकारें उपयोगांत आणलेलें असतें. मानवी आत्म्याला अशा नामरूपाची गरज असते, हें उघड आहे. ईश्वर सर्व आहे आणि सर्वांच्या पलिकडेहि आहे, सर्वांहून अधिकहि आहे. जो सर्वांहून अधिक आहे, त्याची कल्पना मानवाला कशी करतां येणार? सर्वरूप ईश्वराची कल्पना करणें देखील मानवाला प्रथम जड जाणारें आहे; कारण त्याची क्रियाशील जाणीव मर्यादित आहे, तिचें रूप विशिष्ट प्रकारचें आहे; त्याची प्रकृति मर्यादित असल्यानें, या प्रकृतीशीं सुसंवादी असणारी वस्तूच तो समजूं शकतो व स्वतःच्या ठिकाणीं ग्रहण करूं शकतो; सर्वरूप ईश्वरांत अशा कांहीं बाजू आहेत कीं, ज्या त्याच्या बुद्धीला आकलन होऊं शकत नाहींत किंवा त्याच्या नाजुक भावनांना, भित्र्या संवेदनांना फार भयंकर वाटतात. आणखी असेंहि असूं शकते कीं, मानवाच्या ज्या अज्ञानी व एकांगी कल्पना असतात, त्या कल्पनांच्या वर्तुळाबाहेर फार दूर जें असेल, तें ईश्वर म्हणून तो ओळखूं शकत नाहीं, कल्पूं शकत नाहीं, मान्य करूं शकत नाहीं. ही एक अपरिहार्य गोष्ट आहे कीं, मानवानें आपल्या स्वरूपाला धरूनच ईश्वराच्या स्वरूपाची कल्पना करावी; फार तर ईश्वराचें असें रूप त्याला कल्पितां येईल कीं, जें त्याच्या पलीकडे आहे परन्तु त्याच्या उच्चतम प्रकृतीशीं जुळतें असून, त्याच्या भावनांना व त्याच्या बुद्धीला आकलन होण्यासारखें आहे. ईश्वराचें असें रूप त्याला न लाभेल तर ईश्वराशीं संपर्क जोडणें, ईश्वराशीं एकरूप होणें त्याला कठीण जाईल.

ईश्वराचें असें रूप लाभलें, तरी तेवढें मानवाला पुरेसें होत नाहीं; त्याच्या प्रकृतीला मानवी मध्यस्थाची जरूर भासते; असा मध्यस्थ लाभला तरच त्याला त्याच्या स्वतःच्या मानवतेच्या अगदीं जवळ असलेल्या आणि मानव प्रभावयुक्त इश्व

मानवी रूपांत ईश्वराची भावना करतां येते; त्याच्या प्रकृतीची ही गरज मानवरूपधारी ईश्वर, अवतार, कृष्ण, खिस्त, बुद्ध हे पुरी करतात. कोणा मानवाला ही अवतार-कल्पनाहि फार अनाकलनीय वाटली, तर त्याच्यासाठीं अवताराहून कमी आश्चर्यमय मध्यस्थ असा प्रेषित किंवा गुरु याचें रूप ईश्वर धारण करतो. पुष्कळ लोकांना देव-मनुष्य ( अवतारी मनुष्य ) कल्पितां येत नाहीं; अशा माणसाचें शिष्यत्व पत्करणें त्यांना अमान्य असतें. मानवोत्तम त्यांना चालतो, मानवोत्तमापुढें ते आपलें अंतरंग खुलें करूं शकतात.

या मानवोत्तमाला ते अवतार म्हणणार नाहींत; जगद्गुरु म्हणतील, ईश्वराचा प्रतिनिधि ( प्रेषित ) म्हणतील.

येवढ्यानेंहि कांहीं साधकांची पुरती सोय होत नाहीं. त्यांना जिवंत प्रभावाची, जिवंत उदाहरणाची, वर्तमान उपदेशकाची गरज असते. असे थोडेच साधक असतात, जो होऊन गेलेला गुरु आणि त्याची शिकवण, होऊन गेलेला अवतार व त्याचें उदाहरण आणि प्रभाव यांना आपल्या स्वतःच्या जीवनांत जिवंत शक्तीचें स्थान देऊं शकतात. ही गरज पण हिंदूंच्या योगसाधनेंत गुरुशिष्यसंबंधद्वारा भागविलेली आहे. केव्हां केव्हां अवतार किंवा जगद्गुरु हाच साधकाचा गुरु असतो; तथापि या संबंधांत इतकें पुरें असतें कीं, शिष्याला गुरूच्या ठिकाणीं दिव्य आदर्शाची थोडीबहुत उपस्थिति दिसावी, गुरूचा आत्मा आणि शाश्वत प्रभु यांजमध्यें कांहींतरी जिवंत नातें उत्पन्न झाल्याचें शिष्याला दिसावें.

पूर्णयोगाचा साधक आपल्या प्रकृतीनुसार या सर्व सहाय्यक साधनांचा उपयोग करून घेईल; परंतु ही गोष्ट आवश्यक आहे कीं, या साधनांत स्वभावतः ज्या मर्यादा आहेत, त्या मर्यादांचें अंकित त्यानें होऊं नये, अहंनिष्ठ मन, जी संकुचित बहिष्कार प्रवृत्ति बाळगून असते, ती प्रवृत्ति त्यानें बाळगूं नये; हें मन म्हणत असतें, "हा माझा ईश्वर, हा माझा अवतार, हा माझा प्रेषित, हा माझा गुरु" आणि असें म्हणून सांप्रदायिक, अतिरेकी भावनेच्या आहारीं जाऊन, दुसऱ्या सर्वांच्या वेगळ्या अनुभूतींचा, वेगळ्या ईश्वराचा वगैरे विरोध करीत बसतें; पूर्णयोगाच्या साधकानें सांप्रदायिकता, अतिरेकिता सर्व दूर ठेवावयास हवी; कारण ईश्वराचा पूर्ण साक्षात्कार अशा वृत्तीशीं सर्वथा विसंगत आहे.

उलटपक्षीं, पूर्णयोगाच्या साधकाला तेव्हांच समाधान लाभेल, जेव्हां त्याच्या ईश्वराच्या कल्पनेंत ईश्वराच्या सर्व नामरूपांचा अंतर्भाव होईल, जेव्हां त्याची इष्ट देवता दुसऱ्या सर्व इष्ट देवतांत त्याला दिसेल, सर्व अवतार एकाच ईश्वराचे असल्यानें एकच आहेत, अभिन्न आहेत अशी अनुभूति जेव्हां त्याला येईल, सर्व शिकवणींतील सत्यें एकत्र सांधून, त्यांत शाश्वत ज्ञानाची सुसंवादिता जेव्हां त्याला अनुभवास येईल.

पूर्णयोगाच्या साधकानें उपरिनिर्दिष्ट बाह्य साहाय्यक साधनांचा हेतुहि विसरूं नये; त्याच्या अंतरांत, त्याच्या आत्म्याला ईश्वराची ओळख व्हावी हाच या सर्व बाह्य साधनांचा हेतु असतो. ही आंतरिक जागृति जोपर्यंत त्याच्या ठिकाणीं झाली नाहीं, तोपर्यंत त्यानें कांहींच साधलें नाहीं. कृष्ण, ख्रिस्त, बुद्ध यांची पूजा करणें पुरेसें नाहीं; आमच्या अंतरांत ते प्रकट झाले पाहिजेत, साकार व्हावयास हवेत; असें होईपर्यंत बाहेरची पूजा अपुरी आहे. ही जी बाह्य पूजेची गोष्ट तीच इतर साहाय्यक साधनांची गोष्ट आहे. हीं सर्व साधनें आंतरिक ईश्वरविषयक जागृतिसाठींच आहेत; प्रत्येक साधन म्हणजे एक सेतु आहे, पूल आहे; मानवाची अपरिवर्तित प्रकाशहीन अवस्था एका बाजूला आणि ईश्वराचा अंतरंगांतील साक्षात्कार दुसऱ्या बाजूला; अशा या दोन वस्तूंना जोडणारा हा सेतू आहे.

आमच्या अंतरंगांतील गुरु ज्या पद्धतीचा वापर करतो, त्याच पद्धतीचा वापर पूर्णयोगाचा गुरु यथाशक्य करीत राहील. अर्थात् शिष्याची प्रकृति पाहून, त्या प्रकृतीला धरूनच पूर्णयोगाचा गुरु त्याला मार्गदर्शन करीत जाईल. गुरूला तीन साधनें उपलब्ध असतातः शिष्याला शिकवण देणें, आपलें उदाहरण शिष्यासमोर ठेवणें, आपला मूक प्रभाव शिष्यावर पडेल असें करणें. गुरूनें आपली अस्मिता, आपलीं मतें शिष्यावर लादावीं, शिष्यानें मन मोकळें ठेवून गुरु देईल तें, त्यांत विचार न करतां मान्य करून सांठवावें, असा भलता मार्ग शहाणा गुरु धरणार नाहीं; तो शिष्याच्या मनांत विचाराचें उत्पादक्षम असें केवळ बीज टाकील आणि शिष्याच्या मनांतील ईश्वर त्या बीजाची जोपासना करील अशी श्रद्धा ठेवील. शहाणा गुरु पाठ देण्यापेक्षां शिष्याच्या आंतरिक शक्ती जागृत करण्याकडे अधिक लक्ष देईल; शिष्याच्या आंतरिक शक्ती, आंतरिक अनुभव स्वाभाविक प्रक्रियेनें, मोकळ्या वातावरणांत वाढावे असा प्रयत्न करील. तो शिष्याला एकादी कार्यपद्धति शिकवितांना हें स्पष्ट करील कीं, ही पद्धति त्याला एक उपयुक्त उपाय म्हणून, उपयुक्त साधन म्हणून शिकविलेली आहे; ती उपयोगांत आणलीच पाहिजे असें कोणतेंहि बंधन त्याजवर नाहीं; तिला त्यानें शिरोधार्य आचारसूत्राचें, ठाम दिनचर्येचें स्वरूप देऊं नये. शहाणा गुरु या गोष्टीची काळजी घेईल कीं, शिष्यानें त्याला शिकविलेल्या साधनाला मर्यादा घालणाऱ्या भिंतीचें स्वरूप देऊं नये, त्याला शिकविलेली प्रक्रिया त्यानें यांत्रिक बनवून ठेवूं नये. शहाण्या गुरूचें काम इतकेंच राहील कीं, त्यानें अंतःकरणांत दिव्य प्रकाश जागवावा, दिव्य शक्ति तेथें क्रियाशील होईल असें करावें; तो स्वतः या दिव्य प्रकाशाचा व दिव्य शक्तीचा केवळ वाहक असतो, त्यांना वाहून नेणारें केवळ शरीर असतो, त्यांच्या हातांतलें एक साहाय्यक साधन असतो.

गुरूनें दिलेल्या पाठापेक्षां गुरूचें उदाहरण अधिक सामर्थ्यशाली असतें; पण बाह्य कृतींच्या उदाहरणाला, वैयक्तिक शीलाच्या उदाहरणाला फार महत्त्व नसतें; या उदाहरणांना त्यांचें स्थान असतें, या उदाहरणांचाहि उपयोग असतो; परंतु गुरूच्या ठिकाणीं असलेला दिव्य साक्षात्कार जो त्याचें सर्व जीवन, त्याची आंतरिक अवस्था, त्याच्या सर्व क्रिया नियंत्रित करीत असतो, मुख्य असतो; हा साक्षात्कार ही मुख्य मध्यवर्ती घटना असते, तो सार्वत्रिक सारभूत घटकाच्या स्वरूपाचा असतो; त्याहून दुसरें सर्व कांहीं गुरूच्या वैयक्तिक अस्मितेचा व उपाधीचा भाग असतो. गुरूच्या अंतरींचा क्रियाशील साक्षात्कार साधक शिष्याच्या अंतरंगाला प्रतीत व्हावयास हवा; साधक शिष्यानें आपल्या प्रकृतीनुसार हा साक्षात्कार स्वतःच्या ठिकाणीं निर्माण करून अनुभवावयास हवा; गुरूच्या बाह्य वर्तनाचें अनुकरण करण्याच्या भानगडींत शिष्यानें पडूं नये; हें अनुकरण शिष्याच्या ठिकाणीं सुयोग्य स्वाभाविक फलनिष्पत्ति करण्या-ऐवजीं, त्याच्या ठिकाणची निर्माणशक्ति शून्यवत् करील, असाच संभव अधिक आहे.

गुरूच्या उदाहरणाहून त्याच्या अस्मितेचा मूक प्रभाव हा अधिक सामर्थ्यवान् असतो. गुरूचा शिष्यावर जो बाह्यवर्ती अधिकार असतो, त्याला आम्ही प्रभाव म्हणत नाहीं; गुरूच्या संपर्कात जें सामर्थ्य असतें, त्याच्या केवळ उपस्थितीचें जें सामर्थ्य असतें; त्याचा आत्मा दुसऱ्याच्या आत्म्याच्या निकट आल्यानें या दुसऱ्या आत्म्यांत, शब्दाचा उपयोग न करतां गुरु आपली अस्मिता व आपली अध्यात्मिक संपत्ति ज्या आपल्या मूक सामर्थ्यांच्या बळावर ओततो, त्या बळाला प्रभाव असे नांव आम्ही देतों. गुरूचें हें सर्वश्रेष्ठ लक्षण आहे. श्रेष्ठ गुरु तितकासा पाठ देणारा गुरु नसतो; तो आपल्या भोंवतालच्या, ग्रहणशक्तीयुक्त सर्व साधकांत आपल्या केवळ उपस्थितीनें दिव्य जाणीव ओतणारा आणि या दिव्य जाणिवेची घटकभूत तत्त्वें, प्रकाश, सामर्थ्य, शुद्धता आणि आनंद ओतणारा असतो.

पूर्णयोगाच्या गुरूचें आणखी एक लक्षण हें असेल कीं, तो आपल्या गुरूपणाची बढाई मारणार नाहीं; कारण त्याच्या ठिकाणीं सामान्य माणसाचा पोकळ डौल आणि वृथा आत्मगौरव करण्याची भावना असणार नाहीं; त्याची भावना अशी असेल कीं, त्याला जें काम करावयाचें आहे, तें ईश्वरानें त्याजकडे सोंपविलेलें काम आहे, तो केवळ ईश्वराच्या इच्छेचा वाहक आहे, पात्र आहे, प्रतिनिधि आहे. आपल्या मानवबंधुंना मदत करणारा मानव, बालकांचा नायक असलेला एक बाल, अनेक दीप उजळणारा एक दीप, आत्म्यांना जागें करणारा एक जाग्रत आत्मा मी आहे असें तो मानील तो फार थोर असेल, उच्चतम अवस्थेंतील असेल, तर तो ईश्वराची एक विशिष्ट शक्ति वा रूप असेल आणि त्याचें कर्तव्य, इतर ईश्वरशक्तींना हांक द्यावयाचें असेल, त्यांना स्वतःजवळ व ईश्वराजवळ बोलावून घेण्याचें असेल.

ज्या साधकाला या सर्व साधनांचें साह्य मिळालें असेल, तो निश्चितपणें त्याचें साध्य गांठील. तो एखाद्या ठिकाणीं पडला, तरी त्याचें तें पडणें त्याच्या प्रगतीचें साधन होईल; त्याचें मरणें हें त्याच्या साध्यसिद्धीकडे त्याला नेणारें होईल. एकदां मनुष्य साधनेच्या मार्गावर आला म्हणजे जन्म व मरण या त्याच्या अस्तित्वाच्या विकासांतील प्रक्रिया बनतात, त्याच्या प्रवासांतील टप्पे बनतात.

ही विकासाची प्रक्रिया सफल होण्यासाठीं आणखी एक साधन 'काल' नांवाचें लागतें. त्याचाच विचार करणें आतां उरलें आहे. मानव परिश्रम करीत असतां, काल हा त्याचा दिसायला मित्र होतो, शत्रु होतो; काल हा त्याला विरोधक भासेल, माध्यम भासेल, साधनहि भासेल. तथापि तो कसाहि भासला तरी वस्तुतः तो नेहमीं आत्म्याच्या साधनाचें काम करतो.

अनेक परिस्थितिरूप उपाधी आणि अनेक शक्ती कालरूप क्षेत्रांत जमतातः या उपाधी आणि शक्ती एकत्र जमून व काम करून कांहीं एक गतिमान्, प्रगतिशील व्यवहार अस्तित्वांत आणतात; या व्यवहाराच्या क्रमाचें माप काल घेत असतो; अर्थात हा व्यवहाराचा क्रम कालाच्या पोटीं, कालाच्या क्षेत्रांत होत असतो. अहंभावाला हा काल जुलूम करणारा असतो, विरोध करणारा असतो; ईश्वराला तो साधनरूप असतो. आमचा प्रयत्न जेव्हां केवळ वैयक्तिक असतो, तेव्हां काल हा विरोधक म्हणून उभा रहातो; आमच्या शक्तीला विरोध उभा असतो; आमच्या जाणिवेंत ईश्वरी कार्य व वैयक्तिक कार्य अन्योन्य-सहकारी झालेले असेल, तेव्हां काल माध्यमाचें, पार्श्वभूमीचें रूप घेतो; हीं दोन कार्यें अगदीं एक होतात, तेव्हां काल हा सेवक होतो, साधन बनतो.

कालाच्या संबंधांत साधकाची आदर्श वृत्ति अशी असावी : त्याच्या ठिकाणीं अमर्याद सहिष्णुता, धिमेपणा, धीर असावा; आपल्यापुढें शाश्वत काळ पडलेला आहे, या काळांत आपण केव्हां तरी सिद्धि गांठूं असा विश्वास साधकाला असावा; या धिमेपणाबरोबर साधकानें आपली क्रियाशक्ति जोरानें वाढवीत असावें; या क्रियाशक्तीच्या बळावर त्यानें वर्तमानांत शक्य ते विजय मिळवावे; या शक्तीचें प्रभुत्व त्यानें सारखें वाढवीत रहावें, तिचा वेगहि वाढवीत रहावें; आपल्या क्रियाशक्तीच्या वाढत्या प्रभुत्वाच्या व वेगाच्या बळावर तो अशा स्थितीला पोहोंचूं शकेल कीं, या स्थितींत त्याच्या अस्तित्वाचें दिव्य, सर्वोच्च परिवर्तन तो अद्भुत रीतीनें एका क्षणांत घडवून आणूं शकेल.

# अवघें विश्वची माझें घर

## कांहीं आवश्यक सद्गुण

—गुरुदेव रानडे

### स्थैर्य

मन मुळींच चळूं न देणें म्हणजे स्थिरता होय. स्थिर पुरुषाचें शरीर बाह्यतः आपल्या परीनें हिंडत असलें, तरी त्याच्या मनाची बैठक मोडत नाहीं. लोभी मनुष्य दूरदेशीं गेला तरी त्याचा जीव त्याच्या धनाजवळच राहतो, त्याप्रमाणें स्थितप्रज्ञ मनुष्याचा देह चालला तरी त्याचें चित्त चळत नाहीं. ढग हलले तरी त्यांबरोबर आकाश हलत नाहीं; इतर ग्रह व नक्षत्रें यांबरोबर ध्रुव तारा फिरत नाहीं; वाटसरू लोकांबरोबर रस्ता चालत नाहीं; त्याप्रमाणें हे धनुर्धरा, स्थिर मनुष्य चलनवलनात्मक पंचमहाभूतांमध्यें सांपडला असला तरीहि त्याचें मन चळत नाहीं. वादळी वाऱ्यानें पृथ्वी ढळत नाहीं, त्याप्रमाणें उपद्रवांच्या उसळीनें त्याचें मन वाहून जात नाहीं. दारिद्र्यानें तो तापत नाहीं, भयानें वा शोकानें कांपत नाहीं व देहास मृत्यु आला तरी तो भीत नाहीं. आर्तता व आशा यांच्या भरानें किंवा म्हातारपण व आजार यांच्या गर्जनेनें त्याचें सरळ असलेलें चित्त कधींहि पा ठमोरे होत नाहीं. लोक त्याची नाहक निंदा करोत, त्याचें जीवित धोक्यांत असो किंवा काम, लोभ व अपमान यांनी तो त्रस्त झालेला असो, त्याचें मन कोणत्याच परिस्थितींत एक केसभरहि ढळत नाहीं. आकाश तुटून पडो व पृथ्वी विरून जावो, त्याची चित्तवृत्ति मुळींच चळत नाहीं हत्तीला फुलांनीं मारलें असतांहि तो जशी त्याची मुळींच फिकीर करीत नाही, त्याप्रमाणें दुर्वाक्य—शल्यांनीं ताडिलें, तरी तो आपलें मन मुळींच गजबजूं देत नाहीं.

### आत्म—विनिग्रह

इंद्रियांच्या आज्ञा मनानें न मानणें म्हणजेच आत्मसंयम होय. "पिशाच्च आपल्या झाडाला सोडीत नाहीं, किंवा योद्धा आपलें हत्यार टाकीत नाहीं; किंवा लोभी आपलें भांडार कोणावर विसंबवीत नाहीं किंवा आपल्या एकुलत्या बाळाला माता त्यजीत नाहीं किंवा मधमाशी मध—लुब्धता टाकीत नाहीं, त्याप्रमाणें तो आपलें अंतःकरण जतन करतो व इंद्रियांच्या दारीं देखील उभा राहत

नाहीं. कामरूपी बागुलबुवा ऐकेल, आशारूपी डाकीण पाहील, म्हणून तो जिवास फार जपतो. दांडगा पति आपल्या व्यभिचारिणी पत्नीस बाहेर जाऊं देत नाहीं, त्याप्रमाणें तो आपल्या प्रकृतीवर टेहळणी करीत असतो. मनाच्या महाद्वारावर व प्रत्याहाराच्या चौकीवर तो यम-दमांचा जागता पहारा ठेवतो. आधार, नाभि व कंठ या तीन चक्रांचे ठिकाणीं तो बंधत्रयाची गस्त घालतो. इडा व पिंगला यांच्या संपुटांत तो मन कोंडून ठेवतो. समाधीच्या बिछान्याजवळ तो ध्यानास बांधून घालतो व चित्त-चैतन्यांचा समरस होऊ देतो."

**वैराग्य**

ओकलेल्या अन्नाविषयीं रसनेला इच्छा होत नाहीं किंवा मृतास आलिंगिण्यासाठीं बाहू पसरत नाहींत, त्याप्रमाणें विरक्त मनुष्य इंद्रियसुखाविषयीं पूर्ण निरिच्छ असतो. विष खाणें आवडत नाहीं, जळत्या घरांत जाववत नाहीं, वाघाच्या गुहेंत वस्ती करवत नाहीं, उकळणाऱ्या लोखंडाच्या काहिलींत उडी घेववत नाहीं किंवा अजगराची उशी करवत नाहीं, त्याप्रमाणें त्याला विषयवार्ताच आवडत नाहीं. त्याला कोणत्याहि वस्तूबद्दल तीव्र लालसा नसते. त्याचें शरीर रोडकें असतें व त्यास शान्ति व संयम यांमध्येंच आनंद वाटतो. तो तप व उपवास करण्यांत आपलें आयुष्य घालवितो. गजबजलेल्या शहरांत जाणें सुद्धां त्यास मरणप्राय वाटतें. त्यास योगाभ्यासाची हांव असते. एकान्तासाठीं अरण्याकडे धांव घेतो व समाजाचें नांवहि त्यास सहन होत नाहीं. ऐहिक भोग त्यास बाणांच्या अंथरुणावर निजण्याप्रमाणें अथवा पुवाच्या चिखलांत लोळल्याप्रमाणें वाटतात आणि स्वर्गसुख तर तो कुत्र्याच्या कुजलेल्या मांसाप्रमाणें मानतो. इंद्रियजन्य सर्व विषयांविषयीं जेव्हां असें पूर्ण वैराग्य प्राप्त होतें, तेव्हांच तो आत्मप्राप्तीचा व ब्रह्मानंदाचा अनुभव चाखण्यास योग्य होतो. "

**अनहंकार**

वासनाधीन व्यसनी मनुष्याप्रमाणें इष्ट व प्राप्त कर्मे करूनहि कर्तेपणाचा अहंकार न बाळगणें म्हणजेच अनहंकार होय. अनहंकारी पुरुष आपल्या वर्णाश्रमांस पोषक अशीं नित्य-नैमित्तिक कर्में आचरण्यास कधींच चुकत नाहीं. तथापि, कर्म मीं केलें व हें माझ्यामुळें सिद्धीस गेलें, ही भावना तो आपल्या अंतःकरणांत ठेवीत नाहीं. वायु सहज सर्वत्र वाहतो व सूर्य कोणतेंहि उद्दिष्ट मनांत न धरतां उगवतो. अनुभूति जशी सहज येते, अमुक एका ठिकाणीं जावयाचें असा विचारहि मनांत न धरतां गंगा जशी वाहते, त्याप्रमाणें तो अहंकाराशिवाय आपलीं सर्व कर्में करतो. झाडांस योग्य वेळीं फळें येतात, परंतु झाडांस त्याची जाणीव नसते, त्याप्रमाणें सर्व कर्मांबद्दल त्याची वृत्ति असते. एकेरी द्वारांतील दोरी काढावी त्याप्रमाणें त्याचे विचार, उच्चार आणि आचार यांतील अहंभाव नष्ट झालेला असतो. आकाशांतील

ग ज्याप्रमाणें एकमेकांपासून अलिप्त असतात, त्याप्रमाणें त्याचीं कर्में देहापासून लिप्त असतात. दारूनें झिंगलेल्यास आपण कोणतें वस्त्र नेसलों आहों याचें ज्ञान सतें किंवा भिंतीवरील चित्रास आपल्या हातीं कोणतें शस्त्र दिलें आहे हें माहीत सतें किंवा आपल्या पाठीवर कोणत्या शास्त्राचीं पुस्तकें लादलीं आहेत हें बैलास ळत नाहीं, त्याप्रमाणें त्याला आपण देहांत आहों ही जाणीवच नसते. हीच खरी नरहंकारिता होय.

## दुःखवाद

जगांत दुःख फार भरलें आहे असें मानणें हें कांहीं वेळां परमार्थास आवश्यक असतें असें श्रीज्ञानेश्वरांचें म्हणणें आहे. जन्म, मृत्यु, म्हातारपण व रोग यांच्यापासून होणाऱ्या दुःखांचा प्रत्यक्ष भोग भोगण्यापूर्वीं दुरूनच विचार करावा. हा देह म्हणजे त्वाचा खड्डा असून तो मूत्र-रंध्रांतून निघाला आहे, कुचस्वादानें पोसला आहे. म्हणून त्याचा कंटाळा यावा व मृत्यु कल्पांतीं कां येईना, परंतु तो येण्यापूर्वींच शक्य तेतक्या लवकर सावध होऊन पुनः असा जन्म न येईल असें वागावें. नदीचें पाणी फार खोल आहे हें कळतांच पोहणारा पोहावयास पडण्यापूर्वीं व या तीरावरच कांस कसत नाहीं काय? उद्यांच्या मुक्कामाचा वाटाड्या दरोडेखोर आहे हें समजल्यावर वाटसरू रात्रभर जागा राहत नाहीं काय? मरण येण्यापूर्वीं मनुष्य औषध घेत नाहीं काय? घर जळूं लागल्यावर विहीर खणावयास लागून काय उपयोग? जबरदस्तांशीं हाडवैर झाल्यावर मनुष्य जसा रात्रंदिवस आपली तलवार परजून ठेवतो किंवा उपवर झालेली मुलगी विवाहित होणार हें जसें निश्चित किंवा संन्यास घेणार असें ज्यानें जाहीर केलें असेल त्यानें जसा संन्यास घेतलाच पाहिजे, त्याप्रमाणें प्रत्यक्ष मरण येण्यापूर्वीच प्रत्यकानें त्याची विवंचना केली पाहिजे. जन्मास जन्मानें व मृत्यूस मृत्यूनें मारून आपण आत्मरूप राहावें. तारुण्याच्या भरांत असतांच म्हातारपणाचा विचार करावा : आज माझें शरीर पुष्ट आहे, परंतु उद्यां तें वाळलेल्या भाजीप्रमाणें सुकून जाईल; आज माझे डोळे पद्मदलांशीं स्पर्धा करीत आहेत, पण तेच उद्यां पिकलेल्या पडवळाप्रमाणें होतील; माझीं मलमूत्र-द्वारें फुटकीं होतील व माझ्या मृत्यूसाठीं इतर लोक नवस करतील; माझ्या अंगीं मृत्यूचा पराधीनपणा येईल, सर्व सोयऱ्यांना माझा कंटाळा येईल व जग मला पाहून थुंकेल. माझ्या खोकण्यानें शेजाऱ्यांना जागरण होऊन 'हा म्हातारा मरत कां नाहीं? हा फार लोकांना दमवील' असें ते तिरस्कारानें म्हणू लागतील! या सर्व वार्धक्याच्या सूचनांचा तरुणपणींच विचार करावा म्हणजे आयुष्यास मन विटेल. कान बहिरे झाले नाहींत तोंच चांगलें सर्व ऐकावें; पंगूपणा आला नाहीं तोंच जाणें योग्य असेल तेथें जावें; दृष्टि आहे तोंच जें चांगलें पाहावयाचें असेल तें पाहून घ्यावें; वाचा बंद झाली

नाहीं तोंच चांगलें बोलून घ्यावें; हात लुळे पडले नाहींत, तोंच सर्व दानधर्म करू टाकावे. शरीराची अशी विकल स्थिति झाली असतां मन वेडें होईल, म्हणू आधींच आत्मज्ञानाचा चांगला विचार करावा. चोरांनीं घर व संपत्ति लुटलीं नाहींत तोंपर्यंतच्च आपल्या मालमत्तेची व्यवस्था करून टाकावी; किंवा दिवा आहे तों घरांतील झांकपाक करून सामान नीटनेटकें लावावें; त्याप्रमाणें वार्धक्य आलें नाहीं, तोंच आपल्या जीवनाची सर्व व्यवस्था उत्तम रीतीनें लावावी. मार्गांतील डोंगर दऱ्या यांतून एखादा वाटसरू जपून गेला नाहीं किंवा संध्याकाळीं पक्षी आपल्या घरट्यांत परत जाऊं लागले या गोष्टीकडे त्यानें दुर्लक्ष केलें, तर त्याला चोर लुटतात. नाना रोगांनीं शरीर ग्रस्त झालें नाहीं तोंच आरोग्याचा उपाय करावा. शहाणा मनुष्य ज्याप्रमाणें सापाच्या तोंडांतून पडलेला लाडू टाकून देतो, त्याप्रमाणें ज्याच्या मुळें वियोग, आपत्ति व शोक यांचें दुःख होतें त्याचा स्नेह सोडून मनुष्याने उदास राहावें."

**अनासक्ति व एकान्तप्रियता**

"पाहुणा दुसऱ्याच्या घरीं राहतो त्याप्रमाणें अनासक्त पुरुष आपल्या देह विषयीं उदास असतो. रस्त्यावरून जातांना अकस्मात् झाडाची सांवली मिळाल असतां एखाद्याला तिच्याविषयीं जेवढी आस्था वाटते, तेवढीच त्यास बाराव्या अध्यायां साधूच्या आत्यंतिक **समतेचें** वर्णन श्रीज्ञानेश्वरांनीं फारच बहारदार केलें आहे "अशा मनुष्याच्या ठिकाणीं वैषम्याची वार्तासुद्धां नसते. तो शत्रुमित्रांशीं सारख असतो. घरच्या लोकांना उजेड द्यावा व परक्यांना अंधार पाडावा हें दिवा जाणत नाहीं. जो बीं लावून वाढवितो व जो तोडावयासाठीं घाव घालतो, त्या दोघांसी वृक्ष एकसारखींच सांवली देतो; ऊंस पाळतो त्यास तेवढा गोड लागतो, पण त्याचा रस गाळतो त्यास कडू लागतो असें नाहीं; त्याप्रमाणें शत्रु—मित्र, मान—अपमान, या बाबतींत त्याचा भाव समान असतो. आकाशास लेप लागत नाहीं त्याप्रमाणें तो स्तुतीनें फुगत नाहीं वा निंदेनें त्रस्त होत नाहीं. तो खरें व खोटें दोनहि न बोलता मौन पाळतो व ही उन्मनी स्थिति तो भोगत असतां तींत खंड पडत नाहीं. सहज लाभ झाला तर त्यास आनंद वाटतो; परंतु, समुद्र जसा पाऊस पडला नाहीं तरी सुकत नाहीं, त्याप्रमाणें तोटा झाला तरी तो दुःखी होत नाहीं. वाऱ्यास जसें कायमचें घर नसतें, त्याप्रमाणें तो कायम कोणत्याच जागेचा आश्रय घेत नाहीं. 'अवघे विश्वच माझें घर आहे' असा त्याच्या मनाचा निश्चय असतो; किंबहुना तो वस्तुतः आपणच हें सर्व चराचर विश्व होतो."

# श्रीसाईनाथ हॉस्पिटल

( दि. १-११-६६ ते दि. ३१-१२-६६ अखेर )

श्रीसाई भक्तांनी "दवाखाना देणगी" म्हणून रोखीनें देणगी ...ऱ्या भक्तांची यादी—

| भक्ताचें नांव | गांव | रक्कम रुपये पैसे |
|---|---|---|
| टांगरी एडन् आर फार्मसी | एडन | ७५-०० |
| शिर्डी कॉन्ट्रक्शन कंपनी | चेंबूर मुं. नं. ७१ | २००-०० |
| बाळुभाई मोतीभाई मोदी | — | ११-०० |
| सोराबजी दबाभाई मोदी | मुं. नं. ४ | १०-५० |
| शामदास पुजारालाल वधवा | मुंबई | १०१-०० |
| रंजन भट्ट | मुंबई | ११-०० |
| सरलाबाई वसंत कर्णिक | अहमदाबाद | २१-०० |
| पी. राजलींगम् | बोलारम् | ६००-०० |
| सुलभा वामन वाझकर | मुंबई ४ | ३०-०० |
| एम्. एल. पवार | इचलकरंजी | ५-०० |
| जयंतीलाल यू. कोठारी | जळगांव | ५१-०० |
| प्रभाकर रघुनाथ पाटील | मुंबई | ५१-०० |
| आर. एच. ओवळेकर | मुंबई नं. १२ | ५-०० |
| व्ही. बी. पटेल | कलकत्ता ७ | १०१-०० |
| के. एस. अय्यर | मुं. नं. ७० | ५१-०० |
| जी. ए. भट्टे | मुं. नं. ५८ | ५१-०० |
| टी. एम्. शहानी | मुं. नं. २६ | ५०-०० |
| कमलाकर ए. पंडित | मुं. नं. ४ | ११-०० |
| रामचंद्र महादेव पाध्ये | मुं. नं. ४ | ११-०० |
| व्ही. आर. सातकुटे | मु. पो. तेवहारा ( अकोला ) | ५-०० |
| दुर्गाबाई येन्नामडी | मुंबई | १५-०० |
| बी. बी. मल्लीनाथ | बँगलोर | २५-०० |
| ...मती टी. एस. पटेल | कंपाळा (युगांडा) | २५-०० |

## श्री साईबाबा संस्थान शिर्डी, दि. १।११।६६ ते दि. ३१।१२।६

## अखेर श्री साईभक्तांनीं "दवाखाना देणगी" म्हणून मनिऑर्डरनें दे
## देणाऱ्या भक्तांची यादी

| | | |
|---|---|---|
| श्री. बी. आर. वर्मा | जालंदर | १०- |
| श्री. एम्. बी. गावडे | इन्दोर | १२- |
| ,, ए. बी. पटेल | मुगली ( कोल्हापूर ) | ४- |
| ,, सी. ए. आप्पय्या | कुर्ग ( म्हैसूर ) | ५- |
| ,, वासुदेवराव व्यापरला | महबुब नगर | ११- |
| ,, दीनकर के. काटेकर | मुं. नं. २९ | ५- |
| श्रीमती निर्मला डी. काटेकर | — | ५- |
| कुमारी स्नेहा काकोडकर | मुं. नं. १८ | ६०- |
| मेजर व्ही. पी. नातू | अलाहाबाद | २०- |
| श्री. टी. आर. पंडीत | मुं. नं. १ | ५१- |
| ,, एच. सीद्धवानकर | मुं. नं. १९ | ५- |
| ,, डी. बी. रामटेके | चंद्रपुर | ५- |
| सौ. क्रान्ती नातू | अलाहाबाद | ४- |

## मुंबई ऑफिसकडील श्रीसाईनाथ हॉस्पिटल व शिक्षण फंडास
## आलेल्या रकमा
### ( दि. १-११-६६ ते १२-१-६७ )
### चेकने आलेले

| | | |
|---|---|---|
| श्री. किसन सूर्यप्रकाश राव | यादगीरी | ११००-०० |
| श्रीमती सुधा देहजीया | न्युयॉर्क | ७००-०० |
| मे. अरुण स्टील इन्डस्ट्रीज | कलकत्ता | ६००-०० |
| श्री. रसीक शहा | मुंबई | १४०-०० |
| ,, जे. आर. मुधोळकर | दिल्ली | १०२-०० |
| ,, एन. के. मिस्त्री | मुंबई | १०१-०० |
| ,, बी. एल. कोटक | ,, | १०१-०० |
| ,, एस. व्ही. व श्रीमती आर. एच. नाडकर्णी | ,, | ५१-०० |
| ,, आर. व्ही. दिवेचा | ,, | ५१-०० |
| ,, एच. जे. शहा | ,, | ४५-०० |
| ,, व्ही. ए. गोखले | ,, | |
| | नागपूर | ४१-०० |

| | | |
|---|---|---|
| ी. जे. गोदिवाला | मीरत | ४०—०० |
| . टी. हनमंतराव | अर्नाकुलम | ३६—५० |
| पा आफळे | दिल्ली | ३३—०० |
| श्रीमती आर. एच. टिपणीस | कलकत्ता | ३३—०० |
| अल्ला मालिक | मुंबई | २५—०० |
| डी. टी. मोदी | ,, | २५—०० |
| रयू तळपदे | ,, | २२—०० |
| के. आनंदराव | धारवाड | ११—०० |

## रोख रक्कम

| | | |
|---|---|---|
| ए. व्ही. कोला | हैद्राबाद | १००—०० |
| ओ. टी. शर्मा | मुंबई | ७५—०० |
| ोल्ड सोप कं. | ,, | ६२—०० |
| भक्त ५+२५+५+५ | ,, | ४०—०० |
| जी. के. रजपूत | ,, | २८—०० |
| बी. कर्णिक | ,, | २५—०० |
| टी. जी. पाटील | नांदेड | २०—०० |
| बी. आर. भट | मुंबई | १५—०० |
| आर. पी. खारकर | ,, | १५—०० |
| शं. ह. चौबळ | अंधेरी | १०—०० |
| ज. शं. चौबळ | ,, | १०—०० |
| पी. पी. व्ही. जे. नंबीआर | मुंबई | १०—०० |
| एम. एस. गोपाल अयंगार | सायन | १०—०० |
| एच. एन. खिथल | मिरत | ५—०० |
| जी. पी. पाटकर | मुंबई | ५—०० |
| एस. जी. तोडनकर | ,, | ५—०० |
| के. डी. मेहता | ,, | ५—०० |
| मती सुमन डी. निर्गुण | ,, | ५—०० |
| के. जी. ओस मुर्ती | ,, | ५—०० |

## शिक्षण फंडाकरितां

| | | |
|---|---|---|
| होमी बाटलीवाला ( सिक्युरीटीज ) | मुंबई | ५००—०० |
| डी. जे. गोदिवाला | मिरत | ४०—०० |

# सर्वगुणसंपन्न रामचंद्र

## लोकोत्तर महापुरुष

रामाचें व्यक्तिमत्व जीवनाच्या प्रत्येक कक्षेंत प्रकट झालेलें आहे. लोकोत्तर लोकोत्तर पुत्र, लोकोत्तर शत्रू, लोकोत्तर मित्र, लोकोत्तर शिष्य, लोकोत्तर लोकोत्तर वल्लभ, लोकोत्तर धर्मनिष्ठ वगैरे सर्वच लोकोत्तर होते. अशा तऱ्हेनें चरित्राच्या प्रत्येक कक्षेंत लोकोत्तरपणा प्रकट करून वाल्मीकींनीं त्या चरित्राची दाखविली आहे.

रामाच्या जीवनांत भावना आणि कर्तव्य यांचा संघर्ष सतत चालत आहे, परंतु जीवनांतल्या शेवटच्या क्षणापर्यंत भावनेला कर्तव्यावर एक क्षणही हल्ला करायला मिळालेला नाहीं—कर्तव्यनिष्ठ हेंच जीवनाचें प्रमुख ध्येय होतें. भरत, मारुति, लक्ष्मण वगैरे आपापल्या तेजानें रामायणाला भूषित करीत परंतु त्या सर्वांपेक्षांही सरस असें अलौकिक तेज आणि अलौकिक माधुर्य रामचें आहे. राम हा रघुवंशाच्या मंदिरावरचा एक श्रेष्ठ ध्वज आहे. रामायणमंदि प्रत्येक पत्थर, वीट, सुंदर आहे. परंतु राम त्यावरचा ध्वज आहे. 'तेषां केतुरिव रामः सत्यपराक्रमः।' असें वाल्मीकी म्हणतात. सर्वांच्या जीवनांत भावनेनें कि प्रसंगीं प्राधान्य मिळविलेलें आहे. परंतु रामाच्या जीवनांत कर्तव्यासमोर राहाण्याची भावनेची ताकद नव्हती.

प्रत्येक कक्षेंत रामाचें वर्णन आहे. राम अलौकिक पुत्र आहे, आणि 'आ पुत्रकर्तव्य योग्य रीतीनें पार पाडीत आहोंत,' अशा तऱ्हेचा एकप्रकारचा ता अभिमान सुद्धां रामाच्या भाषणांत दिसून येतो.

> "न सर्वे भ्रातरस्तात ! भवन्ति भरतोपमाः ।
> मद्विधा वा पितुः पुत्राः सुहृदो वा भवद्विधाः ॥"

या श्लोकांत ही भावना स्पष्ट शब्दांत प्रतीत होते. रामानें पुत्रत्वाचा आदर्श ठेवला आहे हें सांगण्याची गरज नाहीं—त्याच्या समग्र चरित्रावरू कळलेंच असेल. भरतासारखा भाऊ मिळणार नाहीं, त्याचप्रमाणें रामासारखा पण मिळणार नाहीं. रामानें अलौकिक पुत्राची भूमिका उत्कृष्ट तऱ्हेनें वठविली आ

त्यांशीं संघर्षाचा प्रसंग आला त्यावेळीं तो दूर करण्यासाठीं रामानें खूप मेहनत
घेतली. वडील सांगत होते आणि राम ऐकत होता. रामाच्याही मनांत असें होतें कीं
अद्वितीय पुत्र व्हायला पाहिजे.

दशरथ कैकेयीला सांगतो, "रामाविषयी तूं शंका घेतेस" पण राम दोनदां बोलत नाहीं 'रामो द्विर्न प्रभाषते।' एकदा जें बोलतो तें करून दाखवतो. 'चंद्र लक्ष्मी सोडील, हिमालय शीतलता सोडील, सागर मर्यादेचें अतिक्रमण करील, परंतु राम वडिलांच्या आज्ञेचा भंग करणार नाहीं. असें दशरथाने स्पष्ट शब्दांत सांगितलें. दशरथाचे हे शब्द मुलाच्या बाबतींत केवढा आत्मविश्वास प्रदर्शित करतात. वडिलांच्या अंतःकरणांत त्याच्याविषयीं एवढा मोठा विश्वास होता कीं दशरथ एका ठिकाणीं रडत रडत असें म्हणतो कीं, 'माझें दुर्दैव कीं माझा मुलगा माझें मानीतच आलेला आहे!' जगांत सर्व ठिकाणीं असेंच ऐकायला मिळेल कीं, 'माझें दुर्दैव कीं मुलगा माझें ऐकतच नाहीं.' परंतु निसर्गानें दशरथाच्या तोंडून उलटे शब्द वदविले आहेत. म्हणून दशरथ म्हणतो, 'ईशकृपेनें राम माझें न ऐकेल तर किती बरें चांगलें होईल!' पण तें कसें होणार? राम पुत्राची भूमिका इतकी उत्कृष्ट वठवीत होता कीं, ज्यामुळें दशरथाला जगावेगळें बोलावें लागलें. यांतच त्याचें अलौकिक पुत्रत्व आहे. रामावर जसा त्याचा अलौकिक विश्वास होता, तसें त्याचें वर्णन पण होतें. वडिलांच्या आज्ञेचें पालन करतांना दुसरा विचारच त्याच्या मनांत येत नसे. चित्रकूट पर्वतावर रामानें भरताचें म्हणणें ऐकलें नाहीं, आणि शेवटचें उत्तर दिलें कीं,—

"लक्ष्मीश्चन्द्रादपेयाद्वा हिमवान्वा हिमं त्यजेत्।
अतीयात्सागरो वेलां न प्रतिज्ञामहं पितुः॥"

वडिलांचा शब्द म्हणजे रामाला सर्वस्व. खरोखर, वडिलांच्या एका शब्दासाठीं तरुण वयांत राज्यादिक सर्व सोडून, विचार सुद्धां न करतां, वनवासांत निघून जाणें आणि तें वडिलांच्या केवळ एका शब्दाखातर—अशा तऱ्हेची महान् अग्निपरीक्षा ज्यानें दिली, त्या मुलाच्या पितृभक्तीच्या बाबतींत आपण काय बोलूं शकणार! एवढेंच म्हणावेसें वाटतें कीं ते आईबाप धन्य कीं ज्यांच्या पोटीं अशा तऱ्हेचें अलौकिक पुत्ररत्न निर्माण झालें.

दशरथ आणि कौसल्या यांनीं केवढें तप केलें असेल? खरोखर महत्तम तपश्चर्येचें फळ रामरूपानें त्यांना मिळालें असेल!

राम म्हणजे लोकोत्तर बंधु. अशा तऱ्हेचा भाऊ झाला नाहीं. भरत लक्ष्मण यांना बंधुत्वाचे आदर्श म्हणून जग समजतें, तें कांहीं खोटें नाहीं. तुलसीदास म्हणतो रामापेक्षांही श्रेष्ठ असा भरताचा त्याग आहे; परंतु भरताचा मोठा भाऊ म्हणून

शोभेल असें रामाचें वर्तन आहे. राम कैकेयीला म्हणतो कीं, 'भरतासाठीं
मागण्याकरितां इतकें सगळें करायचें काय कारण होतें ? वरदानाची काय गरज हो
माझ्या अधिकारांत असलेली कोणतीही गोष्ट, माझे पंचप्राण सुद्धां भरताला द्या
मी तयार आहें. भरत तर माझें हृदय आहे. इतकी मोठी खटपट तूं उगाच केलं
भरत आणि राम यांच्यांत लोकांना भेद करायचा असेल तर तो करतां येईल;
आमच्या मनांत तर भेद नाहींच. जर भरत राज्यावर बसला तर मीच राज्य
बसलों आहें, एवढा मला आनंद होईल.'

लक्ष्मण म्हणतो, 'वडिलांना बांधून राज्य घे.' राम म्हणतो, कुटुंबाला दु
करून मला राज्य नको. शस्त्रावर हात ठेवून मी असें सांगतों कीं, राज्यच
कोणतीहि गोष्ट बंधूंच्या एकतेंत भंग करणारी मला नको. माझी प्रत्येक कृति आ
भावांचे संबंध अभेद्य रहावेत यासाठींच आहे. संपूर्ण पृथ्वीचें राज्य करीन, पण तें
करण्याच्या मोहाच्या इच्छेनें नव्हे, तर भावांच्या ऐक्यासाठीं आणि सुखासाठीं
भ्रातृसंबंधाची होळी करून विश्वाचें राज्य सुद्धां मला नको आहे. तुम्ही कोणीही
झालांत तरी मला राजा होण्याची इच्छाच नाहीं. मी राज्य केलें तर तें
म्हणूनच, लोभानें नव्हे!' शेवटपर्यंत रामानें हा संबंध टिकवलेला आहे. अयो
आला त्यावेळीं सुद्धां मारुतिरायाला भरताच्या चेहऱ्यावर विकार होतात कीं ना
पाहाण्याकरितां पाठविलें होतें. "जर राज्यलक्ष्मीचा उपभोग घ्यायची भरताला इ
असेल तर अजूनही मी वनांत जायला तयार आहें." अशी रामाची तयारी
राम प्रत्येक गोष्टींत भरत आणि लक्ष्मण यांचा मोठा भाऊ म्हणून शोभून दिस
लंकेंत विजय मिळविल्यानंतर बिभीषणानें रामाला लंकेंत दोनचार दि
विश्रांति आणि आनंदांत घालविण्यासाठीं थांबावें असें सांगितलें. त्यावेळीं रा
बिभीषणाला म्हणतो कीं, 'मी लंकेंत एक क्षणही थांबूं शकणार नाहीं. मला भरता
भेटायचें आहे.' अशा तऱ्हेनें भरताला भेटण्यासाठीं राम अतिशय अधीर झाले
होता. राम लक्ष्मणाला बहिश्चर प्राण मानीत होता. त्यामुळें ज्यावेळीं लक्ष
मूर्च्छा आली त्यावेळीं जणूं स्वतःच नष्ट झाला असें बोलूं लागला. लक्ष्म
गेला म्हणजे राम पण गेलाच. लक्ष्मणानें शरयूप्रवेश केला कीं रामानें सुद्धां शरयूप्रवे
केला. कांहीं लोक असें म्हणतात कीं, लक्ष्मणानें स्वतःच्या कर्तव्याचें पालन केलें पण
रामानें स्वतःच्या कर्तव्याचें पालन केलें नाहीं. 'दुर्भाग्य रामाचें कीं रामाचें
लोक ओळखूं शकले नाहींत.'

अलौकिक मित्र म्हणूनसुद्धां राम तितकाच शोभून दिसतो. उत्त
नव्हे तर उच्चतम मानवाचें चित्र म्हणजे राम. राम अलौकिक मित्र हो
त्याचे दोन मित्र होते, एक गुह आणि दुसरा सुग्रीव. स्वतःचा वनवास

रून परत येतो त्यावेळीं राम ताबडतोब हनुमानाला सांगतो कीं, 'गुहाला सांगून कीं, 'राम जिवंत आहे. कुशल आहे. निरोगी आहे, तापरहित आहे.' गुहाचेंही ावर तितकेंच प्रेम होतें. राम संकटांत सांपडला कीं स्वतः लढायला तयार. त रामाला भेटायला जातो त्यावेळीं त्याच्या मनांत शंका येते आणि अडविण्या-ठीं समोर सैन्य घेऊन लढायला तयार झाला. दोन हजार रुपये मित्राला द्यायची ठी आली तर जिवावर येतें. या प्रसंगीं शेंकडों माणसें मरण्याची शक्यता होती, ाचित् गुहाचाही लढाईत विनाश झाला असता.

प्रेम द्याल तर प्रेम मिळेल. रामाचें गुहावर इतकें प्रेम होतें, तर गुहानेंही त्याला तर्केंच प्रेम दिलें.

सुग्रीवावर सुद्धां रामाचें किती प्रेम होतें ! सुग्रीव आणि राम यांमध्यें अभेद्य व होता. सुग्रीवाला जरा दुःख झालें तरी सुद्धां रामाच्या डोळ्यांत पाणी येई. रामानें ीव आणि स्वतः यांमध्यें बिलकुल भेदभावानें पाहिलेलें नाहीं. त्यामुळेंच राम ावेळीं शरयूप्रवेश करतो त्यावेळीं किष्किंधेंतून सुग्रीव धांवत धांवत येतो आणि तः पण रामाबरोबर शरयूप्रवेश करतो. दुसरा एकादा मित्र असता तर तो स्मशाना-त गेला असता आणि मित्रांना दोन दुःखाचे शब्द सांगितले असते. सुग्रीवानें ाच्या इतिहासांत मित्रत्वाचा अमर लेख लिहिला आहे आणि दिव्य आदर्श उभा ला आहे. रामानें एवढें दिलें होतें म्हणूनच सुग्रीव अंगदाला गादीवर बसवून रण्याकरितां आला. खरोखर ! ही आश्चर्याची गोष्ट आहे कीं एका मित्राच्या त्यूनंतर दुसरा मित्र मृत्यूच्या मुखांत उडी मारतो. हें जगाच्या इतिहासांत एक लोभनीय चित्र आहे ! रामानें केवढें अलौकिक प्रेम सुग्रीवाला दिलें असेल ! आणि माच्या व्यक्तित्वाचें केवढें आकर्षण असेल कीं राज्यकारभार सोडून रामाच्या गोमाग मरण्याकरितां धांवत गेला ! बुद्धि कुंठित व्हावी अशा प्रकारचें हें मित्रप्रेम हे. राम म्हणतो, 'इहलोकांतच नव्हे तर परलोकांतसुद्धां आपल्यामध्यें वियोग ण निर्माण करील ! परलोकांत सुद्धां मित्र म्हणूनच जाणार.' राज्यद्वाराला सुरवात रून स्वर्गद्वारापर्यंत सहजीवन कुठेंहि वाचायला मिळत नाहीं. सुग्रीव ज्यावेळीं रणाला पाहून उडी मारतो, त्यावेळीं त्याची रामाला किती काळजी वाटते !

लोकोत्तर शत्रुसुद्धां रामच. मारीच रामाच्या उदात्ततेचें आणि भव्यतेचें वर्णन तांना म्हणतो कीं "मित्र असावा तर रामासारखा आणि शत्रु असावा तो द्धां रामासारखाच." रामासारखा शत्रु मिळणें ही गोष्ट सुद्धां भाग्याचीच. रणाच्या मृत्यूनंतर बिभीषण रावणाचा अग्निसंस्कार करायला नकार देतो. तो णतो कीं, "जिवंत पशुता म्हणजे रावण, त्याला अग्निसंस्कार कोण करणार ?" म म्हणाला, 'ज्यानें इंद्रासन जिंकलें, जो इतका पराक्रमी आहे—त्याच्याविषयीं असे

शब्द बोलतोस ! जिवंत असेपर्यंत त्याच्या ठिकाणीं पशुता होती, पण मेल्यानंतर काय म्हणून ? भावाला शोभेल असा अग्निसंस्कार कर. तूं करणार नसशील तर करीन ! हा जसा तुझा भाऊ आहे तसा माझाहि भाऊ आहे. '

" मरणान्तानि वैराणि निवृत्तं नः प्रयोजनम् ।
क्रियतामस्य संस्कारः ममाप्येष यथा तव ॥ "

जिच्यामुळें स्वतः राज्यभ्रष्ट झाला त्या कैकेयीशीं प्रेमळ आणि देवीसारखें व करीन अशा तऱ्हेची शपथ घे आणि नंतर अयोध्येंत जा—हें वचन रामानें भरताप घेतलें होतें. केवढी श्रीमंती ! रामचरित्र जाणण्यासाठीं बुद्धि आणि मन योग्यता हवी.

लोकोत्तर धर्मनिष्ठा म्हणजे राम. रामाची धर्मनिष्ठा कशी होती तें पहा ! किष्कि आणि लंका यांचें राज्य समोर उभें होतें; परंतु 'जंगलांत राहीन' हें कबूल असल्यामुळें सुग्रीवाच्या राज्यांतहि पाऊल टाकलें नाहीं. तत्त्वापासून भ्रष्ट होण्या विचार रामाच्या डोक्यांत केव्हांहि आलाच नाहीं. सॉलिसिटर कदाचित् म्हणेल 'राज्यच जंगलांत आहे, मग जायला कोणती हरकत ? परंतु राम अशा त सॉलिसीटर्स लोकांना मानणारा नव्हता, त्यामुळेंच तर तो राम झाला आणि राज्य पाऊल टाकलें नाहीं. राज्य पायाशीं चालत आलें होतें. पण धर्मनिष्ठेमुळें रामानें राज्य सुग्रीवाला दिलें. त्याचप्रमाणें लंकेच्या राज्याचाही स्वीकार केला नाहीं. धर्मनि म्हणजे केवळ मंदिराच्या पायऱ्या झिजविणें आणि गंध लावणें ही कल्पना राम नव्हती; परंतु जो स्वतःला अतिशय धार्मिक समजतो, त्याचा जीवनव्यवहार अतिश शुद्ध असायला पाहिजे. या धर्मनिष्ठेमुळेंच पायाशीं चालून आलेलें राज्य राम सोडू देऊं शकला—त्याचप्रमाणें बिभीषणाला सुद्धां लंकेचं राज्य देऊं शकला—" सुवर्णा लंकाही आपणांला नको, " असें म्हणून रामानें राज्य बिभीषणाला दिलें. राम बिभीषण किंवा सुग्रीव यांना मांडलिक राजा बनविलें नाहीं. तर त्यांना स्वतंत्र ठे उत्कृष्ट तऱ्हेनें राज्य कसें चालवायचें याचा अत्यंत उच्च उपदेश केला. शाश्वत अमर राहील अशा प्रकारचा तो उपदेश आहे. खरोखर ! राम हा लोकोत्तर पुरु आहे. त्याचें संपूर्ण जीवन कर्तव्यनिष्ठ आणि धर्मनिष्ठ आहे. कांहीं असें म्हणतील बिभीषणाला राज्य दिलें तें बरोबर आहे, परंतु सुग्रीवाला राज्य दिलें तें मैत्री 'सुग्रीव आपल्याला सीताविमोचनासाठीं मदत करील म्हणून राज्य दिलें.' खरोखर या दृष्टीनें सुग्रीवाला राज्य दिलें नाहीं. वालीनिधनानंतर शासनाधिकारी म्हणून त्या राज्यावर बसविलें आणि नीतीनें तुझ्या वंशांत गादी राहूं शकत नाहीं, म्हणून राजगादीवरचा सुग्रीवाचा अधिकार काढून वालीचा मुलगा अंगदच उत्तराधिकारी

आहे असा स्पष्ट निर्णय त्यानें दिला. या धर्मनिष्ठेला व न्यायप्रियतेला अनंत प्रणाम! त्याच्या जीवनाचा पूर्ण अभ्यास केल्याशिवाय त्याच्यावर चिखल उडवूं नका. रामायणाचीं पानें उलटणें म्हणजे रामायण वाचणें नव्हे. रामाच्या न्यायाची ही अत्यंत सुसूक्ष्म बुद्धि पाहिल्यानंतर आपल्याला असें वाटतें कीं, सूर्यासमोर काजवा नाचायला लागला तर त्याची उपेक्षा करून त्याला कोपऱ्यांतच बसविला पाहिजे.

अलौकिक राजा, रामासारखा राजा, झालेला नाहीं आणि होणार नाहीं. रामाचें सर्वस्व प्रजा आहे. सीतेच्या शोकानें विव्हल झालेला राम चार दिवस पौरजनांचें दुःख ऐकूं शकला नाहीं. त्यावेळीं लक्ष्मणाला म्हणतो, "चार दिवस झाले. मी पौरजनांचें दुःख ऐकूं शकलों नाहीं, मी नालायक आहें. नरकांत जाणार आहें." प्रियपत्नीसाठीं चार दिवस सुद्धां शोक नाहीं! कर्तव्यापुढें प्रेमालाही स्थान नाहीं! प्रजेचें सुद्धां अशा प्रकारच्या रामावर प्रेम कां असणार नाहीं? राम वनांत जायला निघालेला आहे, त्याचें वर्णन अयोध्याकांडांत आहे तें वाचा. श्लोक सोपे आहेत आणि वाचण्यासारखे आहेत. लोक म्हणतात, 'राम आमचा काय नाहीं? पिता, पुत्र, सर्वच आहे.'

राम म्हणजे राष्ट्र. राम नरकांत गेला तर नरक पण राष्ट्र. म्हणून रामाला सोडून कोणीही परत फिरायला तयार नव्हता. शेवटीं रामाला रात्रीं बारा वाजतां पळून जावे लागलें. लोक परत आले त्यावेळीं पत्नी पतीला दोष देते कीं, तुम्ही रामाशिवाय परत कां आलांत? कांहीं आपल्या मुलांना थोबाडींत मारूं लागल्या, रामाशिवाय परत कां आलांत लोकांचें किती अद्‌भुत प्रेम होतें.

रामानें शरयूप्रवेश केला त्यावेळीं अयोध्यावासी लोकांनीं सुद्धां महाप्रस्थान केलें. संपूर्ण अयोध्या उजाड झाली. राष्ट्राचें रामावर जितकें प्रेम होतें. तितकेंच रामाचें सुद्धां प्रजेवर विलक्षण प्रेम होतें. रामाच्या शासनसंस्थेच्या इतिहासांत प्रजा आणि शासन-संस्था यांचा संबंध सूर्य आणि त्याचे तेज याप्रमाणें होता. सूर्याशिवाय तेज राहूं शकत नाहीं आणि तेजाशिवाय सूर्याला शोभा नाहीं. यासारखी अभेदता कुठेही पाहायला मिळत नाहीं. शासनसंस्था तीच प्रजा आणि प्रजा तीच शासनसंस्था असें तें राज्य अलौकिक होतें.

राम लोकोत्तर राजा होता. त्याचे ठिकाणीं लोकोत्तर पराक्रम होता बाहुबळ होतें, असें असूनहि प्रजेवर प्रेम होतें. लोकांच्या दाढीला हात लावण्याकरितां तो प्रेम करीत नव्हता. लोकोत्तर आत्मविश्वास होता. आत्मविश्वास निघून जातो त्यावेळी रामायण वाचा, रामाच्या पराक्रमापेक्षा त्याच्या आत्मविश्वासाचे श्लोक वाचा—त्यावेळी वाटेल कीं काय राम असा होता! राम म्हणजे जिवंत आत्मविश्वास! लहाणपणीं शिवधनुष्यभंग, परशुरामाचा पराभव, ताटकावध, वालीसारख्या महापराक्रमी असले-

त्याला सुद्धां एक बाणानें मारणें, रावणराज्याचें उच्चाटन इत्यादि तत्कालीन अत्यंत महान् कामें स्वतःच्या पराक्रमानें आणि आत्मविश्वासानें या महापुरुषानें केली आहेत. कांहीं लोकांना रामाच्या पराक्रमाविषयीं शंका आहे. लवानें—त्याच्या मुलानें ही शंका काढली आहे.

मोठ्या माणसांच्या बाबतींत बोलतां कामा नये. एका स्त्रीला मारूनही त्याची कीर्ति अबाधित राहावे, एका ठिकाणीं लढाईत बाण खेंचण्याकरितां कदाचित् तोंड समोर असेल, (पाठ फिरविली नाहीं) परंतु पाठीमागें तर आलाच ना! आणि वालीचा वध त्याच्या पराक्रमाला शोभण्यासारखा नाहीं.

ही शंका खोटी आहे, इतकी मूर्खपणाची आहे कीं तिला जबाब देणें ही गोष्ट तिला विनाकारण मोठेपणा देण्यासारखें आहे. परंतु वालीवधाची शंका आपल्यालाही आहे. पुष्कळ लोक असें म्हणतात कीं, वालीचा छुपा वध त्यानें केलेला आहे. रामायण न वाचलेले किंवा आजीबाईजवळून रामायण ऐकलेलेच म्हणतील कीं वालीचा वध छुपा केलेला होता. रामानें वाली आणि सुग्रीव यांचें द्वंद्वयुद्ध सुरू असतें आणि वालीला मारलें असतें तर तें बरोबर नव्हतें. परंतु या ठिकाणीं दोन्ही पक्षांनीं परस्परांना लढण्याचें आव्हान दिलें होतें. रणांगणाऐवजीं शयनगृहांत मारलें असतें, तर रामाचें कृत्य निंद्य ठरलें असतें. युद्धांत शत्रूचें अज्ञान, दुबळेपणा, मर्मस्थान किंवा अहंकार यांचा उपयोग केलाच पाहिजे आणि त्याला मारलेंच पाहिजे. ही रणनीति आहे. एक मेला म्हणून त्याकरितां एकानें Resign होणें ही रणनीति नाहीं. एका पक्षांत राम आहे आणि दुसऱ्या पक्षांत राम नाहीं म्हणून त्या पक्षावर अन्याय झाला असें जर कोणी म्हणेल तर तो लढाईला अयोग्य आहे. शत्रूचें अज्ञान, अहंकार, मर्मस्थान यांचा उपयोग केलाच पाहिजे, ही गोष्ट महाभारतांत सुद्धां आली आहे. भूरिश्रवा सात्यकीला मारायला तयार झालेला असतो. त्यावेळीं अर्जुनानें बाण मारून त्याचा हात कापून टाकला. आश्रिताचें रक्षण करणें हा क्षात्रधर्म आहे. 'Air Conditioned Room 'मध्यें आईस्क्रीम खातां खातां वाचणाऱ्याला रणनीति कळणार नाहीं.

राम आपला प्रतिपक्षी आहे अशी स्पष्ट कल्पना वालीला होती. रामानें एक बाण मारून सात तमालवृक्षांचा वेध केला होता, असें असूनही त्याच्या सामर्थ्याच्या बाबतींत सुग्रीव साशंक होता. म्हणून सुग्रीव म्हणतो, "आपण रणांगणांवर लढूं या, तूं मला मदत कर." रामानें कबूल केलें. त्यानें मित्राचें हृदय ओळखलें होतें. वालीला सुद्धां माहीत होतें. कीं रामाशीं आपला संबंध येणार आहे. तारेनें वालीला असें सांगितलें होतें कीं "रामाशीं लढूं नका. सप्तवृक्षभेदन, शिवधनुष्यभंग, परशुरामपराभव वगैरे महान् पराक्रम कोणी केलेले आहेत?" तारा वारंवार वालीला सांगते, 'या

महापराक्रमी पुरुषार्थी तुम्ही लढाईचा प्रसंग आणूं नका.' वालीला रामाविषयीं आदर होता. तो म्हणतो, "असें मी करीन कीं राम रणांगणांत लढणार नाहीं. सुग्रीव हा रामाचा आश्रित आहे. भयापासून रक्षण करतो तो क्षत्रिय, परंतु मी सुग्रीवाला मारणार नाहीं तर माझें सामर्थ्य दाखवून परत येईन. अशा तऱ्हेची अक्कल चालवीन कीं राम रणांगणांत येऊनही बाण सोडणार नाहीं. राम निष्कारण समरांगणांत येणार नाहीं. सुग्रीवावर प्राणघातक हल्ला मी करणार नाहीं, म्हणून राम मध्यें येणार नाहीं—राम धर्मज्ञ आहे." अर्थात् मी सुग्रीवाचा पराभव करीन पण त्याला ठार मारणार नाहीं, अशा तऱ्हेचें आश्वासन देऊन वाली समरांगणांत आला. अशा तऱ्हेचें त्या प्रसंगाच्या चित्रणावरून आणि श्लोकांवरून सहज अनुमान करतां येतें, परंतु लढायला लागल्यानंतर पत्नीला दिलेलें वचन तो विसरतो, सुग्रीवाचे प्राण जाण्यापर्यंत पाळी येते आणि सुग्रीव आतां मरणार असें रामाला ज्यावेळीं वाटतें त्यावेळींच राम आश्रिताचें रक्षण करण्यासाठीं पुढें येतो.

रामानें झाडाआड उभे राहून बाण मारले अशा तऱ्हेचें चित्र काढण्यांत येतें, परंतु वस्तुस्थिति पाहातांना वाल्मीकींचें मत असें आहे असें दिसत नाहीं, धनुष्याला प्रत्यंचा लावतांना खूप मोठा आवाज झाला. त्यावेळचें वाल्मीकि वर्णन करतात, "प्रदुद्रुवुर्मृगाश्चैव युगांत इव मोहिताः।" सात पाताळांचा भेद करण्याएवढा मोठा आवाज झाला, तो आवाज जवळ उभा असलेल्या वालीनें ऐकला नसेल काय ? आणि रामानें जो बाण मारला तो वालीच्या छातींत घुसला—असें वर्णन आहे. तर मग तो बाण समोरूनच मारला असेल कीं नाहीं ? अर्थात् आड उभा राहून कोणालाही न समजतां वालीचा छुपा वध झाला ही गोष्ट खोटी आहे. रामानें वालीला पाहून, वालीला माहीत असतांना एका आश्रिताचें रक्षण करण्यासाठीं बाण मारला. म्हणून वाली वधाचा आक्षेप बुद्धींत उतरत नाहीं. रामाच्या पराक्रमाच्या बाबतींत, पौरुषाच्या बाबतींत मुळींच शंका नव्हती. रामाचें चरित्र लोकोत्तर आहे. संपूर्ण चरित्र अद्वितीय आहे.


लोकोत्तर वल्लभ म्हणजे राम. गृहस्थाश्रमांत अशा तऱ्हेचा लोकोत्तर पति मिळेल कीं नाहीं कोणाला माहीत ? साध्वी स्त्रियांची अपेक्षा रामासारख्या पतीविषयीं असते. दोघांच्या प्रेमाचें वर्णन रामायणांत केलेलें आहे. प्रेमगीतानें रामायण भरलेलें आहे. रामाचें अलौकिक आणि अमर्याद प्रेम सीतेवर होतें. प्रत्येक गोष्टींत राम लोकोत्तर होता हें मानायला लोक तयार होतील, पण राम लोकोत्तर पति होता ही गोष्ट मानणार नाहींत, कारण रामानें सीतेचा त्याग केलेला आहे. परंतु आपल्याला

माहीत आहे कीं, एका व्यक्तीच्या सांगण्यावरून रामानें सीतेचा त्याग केलेला नाहीं; तर पुष्कळ पौरजनांच्या मनांत सीतेविषयीं शंका होती आणि त्याची चर्चा गल्ली-गल्लींत, पेठेपेठेंत चालत होती. कर्तव्य आणि भावना यांमध्यें कर्तव्याला प्रथमस्थान असल्यामुळें रामानें सीतेचा त्याग केला. त्यागानंतरचें प्रेम अलौकिक आहे. आपल्याला राम वाटेल तितका राम निष्ठुर वाटो, पण त्याच्या प्रेमाविषयीं सीतेची साक्ष घ्या. सीता जे आक्षेप घेते ते बरोबर आहेत. जर पत्नीला पति पसंत असेल तर गुरु-महाराजांना तक्रार करायचें काय कारण? पतिपत्नी वेगळीं राहिलीं तर शेजाऱ्यानें कां बोलावे? 'अव्यापारेषु व्यापार:' करण्याची कोणालाही गरज नाहीं. त्यामुळें सीतेला अन्याय वाटत होता कीं काय? याचा आपल्याला विचार करायला हवा. ती जर कांहीं म्हणत असेल तर शब्द बरोबर आहेत.

राम राजा होता. रामानें पत्नीचा त्याग नव्हे तर राजानें राणीचा त्याग केलेला आहे. दांपत्यधर्म आणि राजधर्म यांच्यांत संघर्ष निर्माण झाला. कोणता धर्म श्रेष्ठ? रामानें राजधर्म नक्की केला. कुटुंब आणि राष्ट्र यांच्या हिताचा प्रश्न येतांच प्रथम राष्ट्राला स्थान दिलें पाहिजे—'ग्रामस्यार्थे कुलं त्यजेत्।' अर्थात् राजधर्मांत अनेक लोकांचें सुख येतें आणि कुटुंबधर्मांत फक्त स्वतःचें सुख येतें. रामानें राष्ट्रासाठीं स्वतःच्या सुखाचा त्याग केला आणि सीतेनें त्याला सहकार दिला. राजधर्मासाठीं रामानें पत्नीचा नव्हे तर राणीचा त्याग केला आहे. हें वैशिष्टय आहे. रामानें पत्नीचा त्याग केला असता तर दुसरें लग्न केलें असतें. यज्ञाच्या वेळीं 'धर्मशास्त्राप्रमाणें तुम्हांला दुसरी पत्नी करतां येते,' असें सर्व लोक सांगतात, त्यावेळीं रामानें लोकांना स्पष्ट शब्दांत सांगितलें कीं, रामाच्या हृदयसिंहासनावर एकालाच स्थान आहे आणि तें म्हणजे सीतेलाच. अशा तऱ्हेचें विलक्षण उत्तर देणाऱ्या रामाविषयीं घटस्फोटाचे विचार ज्यांच्या मनांत येतात त्यांनीं आक्षेप काय म्हणून करावेत! रामानें सोन्याची मूर्ति तयार करून यज्ञ केले. रामाच्या हृदयांत दुसऱ्या पत्नीला स्थानच नव्हतें. सीता कलंकित आहे ही गोष्ट त्याला मान्यच नव्हती. रामाचा सीतात्याग हें आत्मबलि-दानाच्या उच्चतम भावनेचें प्रतीक आहे.

आज जे लोक रणांगणांत गेले त्यांच्या तरुण स्त्रियांना झालेल्या दुःखाबद्दल कोणीही रडत नाहीं. ते लोक राष्ट्रासाठीं लढले, राष्ट्रासाठीं बलिदान केलें असें म्हणतात. रामाचा सीतात्याग हें सुद्धां आत्मबलिदानच आहे. पन्नास पन्नास वर्षें जे लोक तुरुंगांत राहिले, त्यांच्या पत्नींना सुख मिळालें नाहीं इतकेंच नव्हे, तर असें म्हणण्यांत येतें कीं, 'राष्ट्रासाठीं त्यांनीं सांसारिक सुखाचें, कौटुंबिक सुखाचें बलिदान केलें.' हे विचार

आजही लोकांत आहेत. जे लोक राष्ट्रासाठीं स्वतःच्या प्रिय पत्नींना दुःखी ठेवून सुद्धां राष्ट्र-कर्तव्य पालनासाठीं निघून गेले त्यांचें समाज आजही वर्णन करीत आहे. बरोबर तीच स्थिति रामाची आहे आणि सीता सुद्धां या कामीं सहभागी आहे. जर सीतेची फिर्याद असेल तर आपल्याला विचार करावा लागेल. परंतु सीतेचा असा कबुलीजबाब आहे कीं, 'रामानें जें केलें, तें बरोबरच केलें आहे.' रामानेंही असें दाखविलें आहे कीं, पहिलें राष्ट्र व नंतर कुटुंब. म्हणून निष्कारण रामावर चिखल उडविण्याची आवश्यकता नाहीं. अर्थात् आजही आपण जें बलिदान मानतों त्यापेक्षांही दिव्य बलिदान रामानें केलेलें आहे.




## MATUNGA CLEANING WORKS

**ESTD. 1934** *Prop.* **S. V. PRADHAN**

MODI NIWAS, BOMBAY 19

**Washers, Dyers and Dry Cleaners.**

**A Pleasure to You—A Satisfaction to Us**

**Chemical Cleaners, Super Fine Darners**

**Master Dyers**

*FOR*

**Cotton, Woollen, Silken & Jari Whole Cloths**

# आत्मनिरीक्षणाचें महत्त्व

लेखक : एक साधक

प्रत्येकाच्या अंतःकरणांत कांहीं ना कांहीं दुष्ट वासना घर करून राहिलेल्या असतात. त्या दुष्ट वासना पदोपदीं आमच्या उत्कर्षाआड येत असतात. गीता हें आमचें धर्मशास्त्र आहे. त्यांत अर्जुन व श्रीकृष्ण ह्यांचा जो संवाद झालेला आहे त्यांत अंतःकरणांतील दुष्ट प्रवृत्तींशीं लढण्यावर विशेष भर देण्यांत आलेला आहे. कौरव आणि पांडव यांच्या रूपानें दुष्ट प्रवृत्तींचा व सत्प्रवृत्तींचा लढा कसा चाललेला असतो याचें महाभारताच्या रूपानें सुंदर चित्र रेखाटण्यांत आलें आहे. या जगांत हा लढा अनादि काळापासून चालत आलेला आहे.

आपल्यापैकीं प्रत्येकानें अर्जुन बनून व गांडीव–धनुष्य हातीं घेऊन अंतःकरणांतील दुष्ट प्रवृत्तींचा नायनाट करण्यासाठीं झटावयाचें आहे.

प्रत्येक माणसानें जगाची सुधारणा करण्याकडे लक्ष पुरविण्यापूर्वी प्रथम स्वतःची सुधारणा घडवून आणण्याचा कार्यक्रम प्रथम हातीं घेतला पाहिजे. त्याला अग्रपूजेचा मान दिला पाहिजे.

बहुधा असें आढळून येतें कीं, प्रत्येक मनुष्य स्वतःला निर्दोष, हुषार, शहाणा समजत असतो. परंतु त्याच्याठायीं किती दुष्ट प्रवृत्ति बीनबोभाट वास करीत आहेत याची त्याला कल्पनाही नसते. प्रत्येकानें आपल्यांत कोणत्या उणीवा वास करीत आहेत, कोणते दुर्गुण घर करून राहिले आहेत याचें बारकाईनें संशोधन केलें पाहिजे. तें न केल्यानें त्याची प्रगति न होतां उत्तरोत्तर पीछेहाट होत असते. दुर्गुणांचें प्राबल्य माजत गेल्यामुळें वेळोवेळीं त्याच्यावर दुर्धर प्रसंग ओढवतात व वारंवार संकटांशीं सामना द्यावा लागत असतो.

मोठी दुर्दैवाची घटना हीच आहे कीं, ज्याला त्याला स्वतःचे दोष दिसत नाहींत तर दुसऱ्यांचे लहानसहान दोषही सहज दिसतात.

रोजचा जीवनक्रम कसाबसा चालू असतो, कुठें न कुठें खटके उडतच असतात. परंतु ते खटके कां उडतात याची मात्र जाणीव होत नाहीं. जीवनप्रवाह संथपणें चालावा, त्यांत अडथळे येऊं नयेत यासाठीं काय उपाययोजना करावी हें समजत नाहीं व त्याचा कोणाला विचारही करावासा वाटत नाहीं.

आपल्या डोळ्यांत कांहीं गेलें तर तें आपणांस दिसतें का ? त्यासाठीं हातांत आरसा घेऊन पहावें लागतें. आणि मग डोळ्यांत कांहीं गेलें आहे याचें ज्ञान होतें.

त्याचप्रमाणें आपल्या ठायीं कोणते दुर्गुण वास करीत आहेत याची चांचपणी करण्यासाठीं आपण आत्मनिरीक्षणाचा आरसा हातीं घेतला पाहिजे. दुसऱ्यांच्या

बारीकसारीक दोषांचीही आपण कशी रसभरीत चर्चा करतो तशी तीक्ष्ण दृष्टीच्या सहाय्यानें स्वतःचे दोष शोधून ते घालविण्यासाठीं आपण बद्धपरिकर झालें पाहिजे.

आमची प्रगति व मनाचें शाश्वत समाधान कशावर अवलंबून आहे बरें ? सद्‌गुणी होण्यावर नि दुर्गुणांचा त्याग करण्यावर. धनदौलत, विद्या, बुद्धिमत्ता, शरीरसामर्थ्य, मित्रमंडळी वगैरेचें सहाय्य मिळवून मनुष्य या जगांत नांवलौकिक संपादन करूं शकतो. परंतु सर्वांत मोठें सामर्थ्य जर कोणतें असेल तर तें म्हणजे माणसाचें चारित्र्य. चारित्र्यसंपन्न मनुष्यच जगांत शाश्वत नांवलौकिक मिळवूं शकतो व जनमनावर आधिपत्य गाजवूं शकतो. सद्‌गुणांची कास धरल्याशिवाय मनुष्य चारित्र्यसंपन्न होऊं शकत नाहीं. तेव्हां आपले दुर्गुण आपण शोधून काढून त्यांचा नायनाट करून टाकण्यासाठीं प्रथम झटलें पाहिजे. प्रथम स्वतःची सुधारणा आणि नंतर इतरेजनांची.

प्रत्येक माणसानें आत्म–परीक्षण करण्यासाठीं मनापासून झटलें पाहिजे. तें कार्य करीत असतां आपल्यांतील दुर्गुण शोधून काढण्याचे नि ते नाहींसे करण्याचा प्रयत्न निश्चयपूर्वक सुरू करायचा–हा कार्यक्रम अंमलांत आणण्यासाठीं झटणें हाच खरा पुरुषार्थ आहे. त्यांतच दूरदर्शीपणा व जीवनसाफल्य आहे.

हें एक प्रकारचें साहस आहे म्हणाना. हें साहस करण्याचा ज्यानें निर्धार केला व जो त्या कार्याला लागला त्यानें आपल्या जीवनसाफल्याचा व अध्यात्मिक सुख संपादन करण्याचा मार्ग पकडला असें म्हणतां येईल. त्यांतच आत्मकल्याण आहे. ह्या आत्म-कल्याणाची पहिली पायरी आहे आत्म–निरीक्षण व दुसरी पायरी आहे आत्म–सुधारणा.

हा मार्ग ज्यानें हस्तगत केला व त्या मार्गानें जो वाटचाल करूं लागला तो पडलेल्या स्थितींत कधींच रहाणार नाहीं. त्याच्या जीवनाचा उत्तरोत्तर विकासच होत जाणार व त्याची गणना कधीं ना कधीं थोर नि वंदनीय पुरुषांत झाल्याशिवाय रहाणार नाहीं.

कोणतीहि चांगली गोष्ट असो. ती सहजासहजीं घडून येत नाहीं. तिच्यासाठीं कांहीं ना कांहीं साधना करणें आवश्यक असतें. आपण स्वतःसाठीं नियमांचें बंधन घालून घेतलें पाहिजे. सकाळच्या प्रहरीं ईश्वरचिंतन करायचें नि सायंकाळीं आत्म-निरीक्षण करायचें. आपले नित्याचे पोटापाण्याचे उद्योग करावयाचेच. ते करूनच सुटका. तोही रोज करावयाचा एक यज्ञच आहे. तो पार पाडून जो वेळ मिळेल त्याचा सदुपयोग ध्यान, जप व एकांतवासासाठीं नित्यनेमानें करावा. एखादेवेळीं कांहींतरी आकस्मिक अडचण निर्माण होते, त्याला इलाज नसतो; परंतु शक्यतों आपल्या नित्यक्रमांत व्यत्यय येऊं द्यावयाचा नाहीं हें धोरण कडक रीतीनें पाळण्यांत यावें.

येथें आळस, हलगर्जीपणा किंवा हेळसांड काय कामाची ? ही सहजप्रवृत्ति झाली पाहिजे. मन आपोआप त्या गोष्टींकडे ओढलें गेलें पाहिजे. येथें जुलमाचा रामराम नाहीं, कांहीं नाहीं.

सायंकाळच्या प्रहरीं किंवा बिछान्यावर पडण्यापूर्वी आत्म-निरीक्षण करायचे म्हणजे काय करायचें ? आजच्या दिवसांत माझ्याकडून काय चुका घडल्या, किती वेळां खोटें बोललों, कोणाला टोंचून बोललों, कटुता कोणाकोणांत निर्माण केली, शिष्टाचार कोणाच्या बाबतींत पाळला नाहीं, चहाडी, निंदा, मत्सर कोणाच्या बाबतींत घडला का ? मनांत कोणाबद्दल दुष्ट किंवा पापी विचार आले का ?

या सर्व गोष्टींची नि घटनांची हजेरी लागली पाहिजे व घेण्यांत आली पाहिजे. लहान लहान अपराध दिसतात परंतु तेंच विषें निर्माण करीत असतात. मनांत कोणत्याही प्रकारच्या पापी विचारांस थारा द्यावयाचा नाहीं. त्यांची हकालपट्टा निर्दयपणें करायची. या जगांत पूर्ण निर्दोषी किंवा सर्वस्वी गुणवान कोणीही नाहीं. प्रत्येकांत कांहीं ना कांहीं अवगुण हे असावयाचेच. ते असले तरी त्यांची झडती घेऊन ते दूर करण्याकडे आपले लक्ष लागून राहिले पाहिजे. त्यांच्यावर सक्त पहारा ठेवण्यांत आला पाहिजे. मग पहारा चुकवून आंत प्रवेश करण्याची काय त्यांची छाती लागून गेली आहे !

आपलें अंतःकरण सदासर्वकाळ प्रेरणादायी विचारांनी ओतप्रोत भरून राहिलें पाहिजे. निर्मळ पवित्र व स्फूर्तिदायक विचारांनाच मनांत स्थान मिळेल अशी आपली वागणूक, वाचन नि व्यवहार असावे. त्यांच्यापासून चांगली प्रेरणा मिळत जावी.

प्रेरणादायक साहित्य अपरंपार आहे त्याच्या संगतींत राहिलें पाहिजे. कधीं कधीं मनांतील दुष्ट वासना मनांत दबा धरून राहिलेल्या असतात. त्यांचा अवतार संपला असें आपणांस वाटतें; परंतु वेळप्रसंगीं त्या दुष्ट वासना कधीं उसळी मारून येतील हें समजायचें नाहीं; यासाठीं मनाच्या दरीखिंडींतून जें जें दुष्ट वातावरण दबा धरून बसलें असेल तें चांगलें निपटून काढलें पाहिजे; आणि मनाचा मळा स्वच्छ केला पाहिजे.

आमच्या शरिरांत नाना प्रकारच्या दुर्बलता घर करून राहिलेल्या आहेत. त्यामुळें आपलें पाऊल पुढें पडूं शकत नाहीं. प्रत्येक दुर्बल विचाराचा आपण विचारपूर्वक त्याग केला पाहिजे. त्यापासून तोटे कोणते आणि त्यांचा त्याग केल्यापासून फायदे कोणते याचें यथायोग्य मोजमाप आपण केलें पाहिजे.

मनांत नेहमीं सद्भावना, सद्विचार यांनाच स्थान द्यावयाचें. कुविचारांना मनांत थाराच द्यावयाचा नाहीं.

अशा रीतीनें सदैव सद्भावनांची कांस धरून तुम्हीं दिन प्रतिदिन जागरूकपणें वावरूं लागलां म्हणजे परमात्मा तुमचा सहाय्यकारी होईल व तुमच्या सार्‍या इच्छा पूर्ण करील.

# रावणाला सीतामाईचा सदुपदेश

सीता दुःखमग्न होती. रामाच्या विचाराखेरीज तिच्या मनांत दुसरा विचार येत नव्हता. तशा असहाय अवस्थेंतहि आपल्या शीलाचें ती जिवापाड जतन ोत होती.

एक दिवस रावण तिच्याजवळ आला नि तिची मनधरणी करूं लागला.

" हे सुंदरी, तूं मला वश होत नाहींस याचं कारण तरी काय आहे? मी तुझी ुकी काळजी घेत आहे, पण तूं वर मान करून माझ्याकडे बघायलाही तयार हींस. वाटलं तर बळजबरीनें मी तुझ्याशीं विवाह करूं शकतों. तसं करणं आम्हां ासांच्या धर्माला अनुसरूनच होणार आहे. पण असं असूनहि तुझ्या प्रेमाची भिक्षा ागण्यासाठीं याचक होऊन मी इथें आलों आहें. माझी भीति का वाटते तुला? सं असेल तर माझ्यावर तुझं मन जडण्याआधीं मी तुझ्या शरीराला स्पर्शसुद्धां रणार नाहीं, याचं आश्वासन या क्षणींच देऊन ठेवतों. मला कशासाठीं भ्यायचं? ी तुझी ज्या आपलेपणानें काळजी घेतों तोच आपलेपणा तूंहि माझ्या बाबतींत ावावास, एवढीच माझी इच्छा आहे. माझा स्वीकार करणार असशील तर तो ामपूर्वक कर. उर्वशीनेंहि हेवा करावा असा तुझा हा सुंदर देह...कशासाठीं त्याला ा यातनांच्या खाईंत टाकतेस?

" देवी, सौंदर्यात तुझी बरोबरी करणारं या अवनीतलावर तरी कुणी नाहीं. ी पाठवलेल्या अलंकारांचा नि वस्त्रांचा तूं स्वीकार केला नाहींस, हें कांहीं तू बरं ्लं नाहींस. तुला अशी मुक्तकेशा बसलेली नि जमिनीवर निजलेली पाहून माझ्या ंतःकरणाला अपार क्लेश होतात. नको, असं वाया जाऊं देऊं तुझं तारुण्य नि ावण्य! कितीहि झालं तरी तूं आतां मात्र माझ्या छत्राखालीं आली आहेस. कशा ाचीहि तुला वाण पडणार नाहीं. त्रिभुवनांतील सारीं, सारीं सुखं तुझ्या पायांशीं ोळण घेत येतील.

" पौर्णिमेच्या चंद्रासारखं तुझं रूप... कशी नजर काढून घेऊं मी तरी ्यावरून? एकदा का तुझ्याकडे दृष्टिक्षेप केला कीं डोळे हलत नाहींत बघ तिथून! तुझ्यासारख्या रूपवतीनें इतक दुःखीकष्टी व्हावं हें बरं दिसत नाहीं. मनानें तूं माझा स्वीकार कर नि जगांतील सुखविलासांचा मनमुराद उपभोग े. तुझ्यासाठीं सारी पृथ्वी पादाक्रान्त करून ती जनकाच्या पायांवर ठेवायची ाझी तयारी आहे. या जगांत असं काय आहे कीं जें मी तुझ्यासाठीं करणार ाहीं? मी तुला पट्टराणी बनवीन. प्रासादांतील साऱ्या राण्या नि स्त्रिया यांवर तुझी

सत्ता राहील. माझी धनदौलत, माझं साम्राज्य...सारं, सारं कांहीं तुझं होईल, लंकानगरी नि मी...नव्हे...उभी पृथ्वी तुझ्या स्वामित्वाखालीं येईल. माझ्या प क्रमाची नि सामर्थ्याची जाणीव देवासुरांना चांगलीच झाली आहे. माझ्यासमोर नतमस्तक असतात तें उगीच नव्हे !

"माझ्या दासी तुला मौल्यवान अलंकारांनीं नि उंची वस्त्राप्रावरण सजवतील. अशा वैभवाच्या दिमाखांत तुला मला डोळे भरून पाहायचं आहे. तुझ मनाला येईल तेवढं दान तूं खुशाल कर. साऱ्या मानवजातीची तूं स्वामिनी होशी तूं राणी झाल्याची वार्ता ऐकतांच माझ्या प्रजाजनांना मनस्वी आनंद झाल्याशिव राहाणार नाहीं.

"अरण्यांत वणवण करीत हिंडणाऱ्या त्या भिकारड्या रामासाठीं कश झुरत राहिली आहेस तूं ? जो आपले सर्व अधिकार गमावून बसला आहे, ज्या राज्याबाहेर घालवून देण्यांत आलं आहे, जो वल्कलं परिधान करून इ तिकडे भटकत राहिला आहे, अशा माणसावर प्रेम तरी कां करावंस विश्वास तरी कां ठेवावास ? तो स्वतःच इतका असहाय होऊन बसला आ कीं, तुझ्यासाठीं तो कांहींहि करूं शकणार नाहीं. सत्ता व यश यांची अधिष्ठ देवता लक्ष्मी हिनेहि त्याचा त्याग केला आहे. तो आतां जिवंत आहे कीं नाहीं सुद्धां, खरं म्हणजे, कुणाला माहीत नाहीं. कांहींहि असलं तरी यापुढें तुझी त्याची भेट होत नाहीं हें मात्र निश्चित. गरुडानें सर्प पकडावा तसं म हृदय विद्ध केलं आहेस. मला आतां तरणोपायच नाहीं. तुझ्या अंगावर एक अलंकार नाहीं कीं उत्तम वस्त्र नाहीं. असं असूनहि बाकीच्या स्त्रिया टाकून मी तुझी मनधरणी करायला आलों आहें, यावरूनच बघ काय तें. तुला पाहिल्यापास मला त्या नजरेसमोर नकोशा झाल्या आहेत. मी तुला महाराणी करीन नि त्या तुझी सेवा करायला लावीन.

"सामर्थ्य, संपत्ति, वैभव, कशाकशांतहि राम माझ्या पासंगालाहि पुरणा नाहीं. अनेक वेळां मी हें सिद्ध करून दाखवल्यानंतर तूं शंका कशाला बाळगतेस परस्परांच्या सुखद सहवासांत आपण पृथ्वीपर्यटनाला निघूं. कधींच न संपणार आनंदाचा निर्झर तुझ्या व माझ्या जीवनांत वाहायला लागूं दे. सीते, माझी कांहीं दया येत नाहीं का तुला ? उपवनांत...समुद्रकिनाऱ्यावरील एकान्तवासांत जाऊ आपण राईत बसूं. हो म्हण एकदां !"

अशी प्रेमाची व दयेची भीक रावण तिच्याजवळ परोपरीनें मागत होता.

सीतेनें एक दूर्वांकुर खुडला व तो दातांनीं कुरतडीत उपहासपूर्वक हसत ती शांतपणें म्हणाली, "रावणा, माझ्याविषयीं तुझ्या मनांत आलेले हे उन्मत्त विचार तूं जितक्या लवकर मनांतून काढूं शकशील तितकं बरं. माझ्याविषयीं

मनांत वासना उत्पन्न व्हावी हें तुला शोभत नाहीं. तूं ज्यांच्याशीं
द्ध झाला आहेस त्यांच्यावर तुझ्या प्रेमाचा काय वर्षाव करायचा
:. तुझ्या म्हणण्याला मी रुकार देईन हें संभवतं तरी कसं ? माझं
ळ काय आहे, मी कुणाची सहधर्मचारिणी आहें, हें सारं ठाऊक असूनहि
उद्गार तुझ्या मुखांतून बाहेर तरी कसे पडतात ? प्रत्यक्षांत कधींच न
होणाऱ्या या मूर्ख व असंभाव्य कामना तूं कुरवाळीत बसलास तर आपला सर्व-
ह्या तूंच ओढवून घेणार आहेस हें लक्षांत ठेव."

मग आपली मान दुसरीकडे वळवीत ती पुढें म्हणाली, "मी दुसऱ्याची पत्नी
ना तुझी पत्नी कशी होऊं शकेन ? अधर्माचरण करूं नकोस. या पापी मार्गानें तूं
नयेस. माझं ऐक. दुसऱ्या कुणाचाहि स्पर्श आपल्या स्त्रियांना होणार नाहीं यासाठीं
ी जपत असतोस, याची आठवण कर. इतर पुरुषांनाहि तुझ्यासारखंच वाटणं
विक नाहीं का ? तीसुद्धां तुझ्यासारखीच माणसं आहेत. परस्त्रीकडे वांकड्या
पाहूं नकोस. स्वतःच्याच पत्नीच्या सुखांत आपलं सुख पाहणं हेंच खरंखुर सुख
परस्त्रीवर ज्याचं मन जावं त्याच्या पदरीं अखेर दुःख नि दुष्कीर्ति यांखेरीज
पडत नाहीं.

"योग्य उपदेश करणारं तुला या जगांत कुणीच नाहीं का ? या अशा
र्गांचा अवलंब करून तूं स्वतःवर नि आपल्या कुटुंबियांवर निष्कारण
त्ति कशाला ओढवून घेतोस ? राजाचा स्वतःवरचा तोल सुटला, कीं त्याचं
नि संपत्ति यांचाहि विनाशकाल जवळ आला, ही काळ्या दगडावरची रेघ
तूं आपल्या मनांत उद्‌भवलेल्या पापी वासनेच्या कवेंतून स्वतःची मुक्तता करून
नाहींस, तर या लंकेचा नि तिच्या वैभवाचा सर्वनाश झाल्याशिवाय राहाणार
. मग ज्यांना तूं जिंकलं होतंस ते तुझे शत्रु तुझ्याकडे पाहून खदखदां
ील. ज्या धनदौलतीचा नि सुखोपभोगांचा मोह तू मला घालीत आहेस त्यांचा
काडीमात्र उपयोग नाहीं. या मोहाला मी बळी पडेन हें कालत्रयींहि तूं मनांत
ूं नकोस. मी रामपत्नी आहे नि शेवटपर्यंत रामपत्नीच राहीन. बोहल्यावर
चा हात हातांत घेतला त्याच्याशिवाय दुसऱ्या कुणालाहि माझ्या हाताचा स्पर्श
र नाहीं. सर्वस्वीं अगदीं सर्वस्वीं मी रामाची आहें. वेदांवर ऋषींची असते तशी
्यावर त्याची सत्ता आहे. राम आणि सीता यांत द्वैताला थाराच नाहीं दुसऱ्या
ीहि आपली वासनेनें बरबटलेली नजर माझ्यावर वळवूं नये. तुझ्या चांगल्यासाठीं
त्यें कीं रामापाशीं क्षमायाचना कर नि त्याच्या क्रोधाचा बळी होण्याचं संकट
ळ. राम मनानें उदार आहे. त्याची करुणा भाकलीस तर आपल्या दयेचा
हस्त तो तुझ्यावर ठेवल्याशिवाय राहणार नाहीं. नाहीं तर तुझा मरणकाळ नि
नाश कांहीं फार दूर नाहीं.

"ऐक, नीट ऐक. मला तर रामाच्या धनुष्याचा टणत्कारहि ऐकूं येत
आतां यांतून तुझी सुटका नाहीं. यमराज तुझ्या दिशेनें पावलं टाकूं लागला
राम–लक्ष्मणांचे बाण लवकरच लंकेच्या दिशेनें येतील नि ही उभी नगरी भस्म
होऊन जाईल. जनस्थानाच्या राक्षसांचा निःपात रामांनें कसा केला होता तें
आहे ना ? रामाचं सामर्थ्य माहीत असल्यामुळेंच ना तूं आश्रमांत कुणी नाहीं
पाहून, माझं अपहरण करण्यासाठीं चोरासारखा तिथें आला होतास ?
तरी राम–लक्ष्मणांच्या नजरेला नजर द्यायचं धैर्य होईल का तुला ? श्वानानें
वाघाशीं युद्ध केल्याचं ऐकलं आहेस ? वाघाची नुसती चाहूल लागल्या
तें मागच्या मागें पळून गेल्याशिवाय राहील का ? सूर्याच्या उन्हांत
झिरपलेल्या पाण्याची जशी वाफ होते तशी स्थिति तुझ्या प्राणांची ते
टाकतील. तूं रानाडोंगरांत जाऊन दडून बसलास किंवा समुद्राच्या तळाशीं
राहिलास, तरी ठरल्या वेळीं विजेचा लोळ जसा वृक्षावर पडल्या राहात नाहीं,
तुझी स्थिति होईल. आतां यांतून तुझी सुटका होणं केवळ अशक्यप्राय आहे."

सीता अशा प्रकारें रावणाची कानउघाडणी करीत होती आणि त्याचा
अनावर होत चालला होता. तरीहि मनावरची पकड सुटूं न देता
म्हणाला, "सीते त्या मूर्ख नि विरक्त रामाच्या नादीं लागून तूं अशा
माझा अपमान करावास हें बरं नव्हे. मी तुझ्याशीं प्रेमळपणें बोलत अस
तूं मला उद्धट उत्तरं द्यावींस हें तुला शोभत नाहीं. माझं तुझ
प्रेम नसतं तर तर एव्हां तूं जिवंतहि राहिली नसतीस. तुला तुझा काय तो
करतां यावा यासाठीं नेमून देण्यांत आलेला वेळ संपायला अद्याप दोन महिने आ
तेवढ्यांत तूं माझ्याशीं विवाह करायला तयार होशील अशी मला आशा
न पक्षीं तुझीं खांडोळीं करून तुझं शिजवलेलं मांस मी भक्षण केल्यावांचून रा
नाहीं. लक्षांत ठेव !"

राक्षस नरभक्षकहि होते ही गोष्ट सुप्रसिद्धच आहे. या दृष्टीनें पाहातां राव
सीतेला दिलेली ही समज अतिशयोक्त होती असें वाटत नाहीं. प्रत्यक्षांत
शकणाऱ्या एका घटनेची ती केवळ एक पूर्वसूचना होती. असें असूनहि सीतेचा
मुळींसुद्धां सुटला नाहीं. ती म्हणाली,

"अरे रे, या क्षणीं तुला सन्मार्ग दाखवणारं कुणीहि असूं नये ही
शोचनीय गोष्ट आहे ! या पापमार्गापासून तुला परावृत्त करून सन्मार्गावर आ
शकणारा एकहि मित्र तुला नाहीं का ? वनगजाशीं एखाद्या सशानें वैमनस्य पत
तसं तूं करीत आहेस ? रामाच्या हातूनच तुझा विनाश होणार आहे हें मला
दिसत आहे. राम आश्रमांत नाहीं असं पाहून तूं माझं अपहरण केलंस याची

लाज वाटत नाहीं ! माणसाचा सर्वनाश जवळ येत असला कीं त्याला बुद्धि सुचते, हें खरंच तर. तूं कुबेराचा भाऊ, आपल्या पराक्रमानें त्रिभुवनांत मिळवलेला योद्धा, चतुरंग सैन्याचा सेनापति, नि असं असूनहि हीन कृत्य तून घडावं ना ? ”

वणाचा संताप अधिकाधिक अनावर होत चालला होता. त्याच्या डोळ्यात इंगार धगधगत होता. एखाद्या संतप्त सर्पासारखा फुसफुसत तो सीतेकडे जरेनें पाहात होता.


ाचा हा अवतार पाहून त्याची एक पत्नी, धान्यमालिनी त्याच्याजवळ न त्याला बिलगून बसत म्हणाली,

“ नाथ, जी तुमच्याकडे ढुंकुनहि पाहायला तयार नाहीं, अशा या क्षुद्र स्त्रीची मजास तुम्ही कशाला चालवतां ? तुमची पत्नी होण्याचं भाग्य तिच्या ललाटीं ाहीं, त्याला ती तरी काय करणार ? नि तिच्यांत एवढं आहे तरी काय कीं वढं भुलून जावं ? चला, शयनमहालांत चला. आपण तिकडे मनमुराद ा करीत बसू.

तेनें रावणाला जवळ जवळ ओढीतच आपल्याबरोबर नेलें आणि रावणहि हसत तिच्याबरोबर निघून गेला.

दिव्य दृष्टीसाठीं TELIGRAM :—DIVYANETRA

शिसा ऑप्टिशिअन्स (BOM. DADAR)



[ चष्म्यांचे व्यापारी ]

यांच्या येथें तज्ज्ञ डॉक्टरांकडून डोळे मोफत तपासून
उंची व टिकाऊ चष्मे माफक दरानें मिळतील

छबिलदास रोड, दादर (W. R.),

# श्रीराम सर्व बाबतींत आदर्श

## म्हणूनच मर्यादा–पुरुषोत्तम

लेखक : पि. के. छत्रेशास्त्री

### आदर्श पुत्र

सुमंत्र सारथ्याच्या बोलावण्यावरून श्रीराम कैकेयीच्या महालांत प्रवेश क[...] त्यांना आपला पिता दुःखातिशयानें व्याकुळ झालेला आढळला. [...] कारण विचारतां ती म्हणाली, 'पित्याची इच्छा तूं निश्चितपणें पूर्ण करणार [...] तर मी सांगतें हकीकत.' आपल्याबद्दल असा संशय कैकेयीला यावा याचें श्री[...] दुःख होतें व ते म्हणतात—

**अहो धिङ् नार्हसे देवि, वक्तुं मामीदृशं वचः ।**

'माते, माझ्याविषयीं अशी शंका घेणाऱ्या तुला धिक्कार असो[...] '**रामोद्विर्नाभिभाषते**' 'हा राम बोलायचें असेल तें [...] बोलतो व आपलें बोलणें मागाहून न फिरवितां बोलल्याप्रमाणेंच [...] असतो.' भरत वनांत श्रीरामांची भेट घेऊन अयोध्येला येऊन राज्य कर[...] परोपरीनें त्यांची मनधरणी करतो. त्याची समजूत घालतांना श्रीराम म्हणतात—

**लक्ष्मीश्चंद्रादपेयाद्वा हिमवान् वा हिमं त्यजेत् ।**
**अतीयात् सागरो वेलां न प्रतिज्ञामहं पितुः ॥**

'चंद्राला चंद्रिका सोडून जाईल, एक वेळ हिमाचल आपलें शीतल [...] सागर आपली मर्यादा उल्लंघन करील, पण पित्याची प्रतिज्ञा मी कधींहि मो[...] देणार नाहीं.' कैकेयीला त्यांनीं दिलेलें वचन मी पूर्ण करीनच—

**भवानपि तवेत्येव पितरं सत्यवादिनम् ।**
**कर्तुमर्हसि राजेंद्र क्षिप्रमेवाभिषिंचनात् ॥**

'तूंहि स्वतःला राज्याभिषेक करवून घेऊन पित्याला वचनपूर्तीचा [...] द्यावास, हें तुझें कर्तव्य आहे.' कौसल्येचा निरोप घेतांनाहि श्रीराम म्हणा[...] वडिलांची आज्ञा पुत्रानें पाळण्याची आपल्या कुळांतली जुनी परंपराच मी पा[...] आहें. सगरपुत्रांनीं आत्मार्पण केलें, परशुरामानें आपल्या मातेचा वध केला[...]

मी पुढें चालवीत आहें, कारण, 'पितुर्हि वचनं कुर्वन् न कश्चिन्नाम [illegible] ।' पित्याची आज्ञा पाळणाऱ्या पुत्राचें अकल्याण कधींच होत नाहीं!

**[illegible]ो बंधु**

भरताला ठार मारून राज्यावर बसावें, असें सुचविणाऱ्या लक्ष्मणास श्रीराम [illegible]त—

**यद्द्रव्यं बांधवानां वा मित्राणां वा क्षये भवेत्।**
**नाहं तत् प्रतिगृह्णीयां भक्षान् विषकृतानिव ॥**

बांधव वा मित्र यांचा संहार करून मिळणारें वैभव मी कधींहि घेणार नाहीं. विषमिश्रित अन्न जसें सर्वस्वीं त्याज्य तसेंच वैभव होय.

**[illegible]शी मित्र**

निषादांचा राजा गुह श्रीरामांविषयींचें प्रेम व्यक्त करतांना म्हणतो—'**नहि [illegible]त् प्रियतमो ममास्ते भुवि कश्चन्।**'

'या सर्व जगांत मला श्रीरामांपेक्षां अधिक प्रिय कोणीहि नाहीं.' श्रीरामहि [illegible]सांतून परत येतांना गुहाला आधीं वर्दी देण्यासाठीं हनुमंताला पाठवितांना [illegible]तात—

**श्रुत्वा तु मां कुशलिनमरोगं विगतज्वरम्।**
**भविष्यति गुहः प्रीतः सममात्मसमः सखा ॥**

'मी निरामय, सर्व संकटांतून मुक्त होऊन परत अयोध्येस जात आहें, हें [illegible]न गुहाला निःसंशय फार आनंद होईल. कारण स्वतःवर मी जेवढें प्रेम करतों [illegible]ढेंच गुहावरहि करीत आहें.'

सुग्रीवाशीं सख्य जोडल्याबरोबर श्रीराम त्याला म्हणतात—

**हृष्टः कथय विस्रब्धो यावदारोप्यते धनुः।**
**सृष्टश्च हि मया बाणो निरस्तश्च रिपुस्तव ॥**

'मित्रा तुझा वृत्तांत सांग. एकीकडे मी धनुष्याला बाण लावतों. तुझा शत्रु [illegible]ला दाखव. मी त्याला ठार केलाच म्हणून समज!' मित्रकार्य करण्याची किती [illegible]कंठा!

पावसाळा संपला तरी सीताशुद्धीची हालचाल सुग्रीवाकडून न दिसल्यामुळें [illegible]राम संतापले व लक्ष्मणाला त्याचेकडे चौकशीसाठीं पाठविलें, पण लगेच लक्ष्मण[illegible]णाचे भरांत सुग्रीवास कदाचित् ठारहि करील म्हणून त्याला बजावतात—

**सामोपहितया वाचा रूक्षाणि परिवर्जयन्।**
**वक्तुमर्हसि सुग्रीवं व्यतीते कालपर्यये ॥**

'सुग्रीवाचे हातून कर्तव्यास विलंब होत असला तरी तूं त्याच्याशीं कठोर भाषण [illegible]रूं नकोस.'

राम आपल्या गच्चीवरून वानरसेनेचें निरीक्षण करीत असतां सुग्रीवास :
न राहून तो एकदम रावणावर चालून गेला. त्याच्या तावडींतुन कशीतरी सुटका क
घेऊन परत आल्यावर श्रीराम म्हणतात-मित्रा सुग्रीवा—

**इदानीं मा कृथावीर एवंविधमरिंदम ।**
**त्वयि किंचित् समापन्ने किं कार्यं सीतया मम ॥**

मित्रा, असें भलतेंच साहस फिरून करूं नकोस. तुझें जर बरें वाईट झालें सीता, लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न, राज्य अगर माझें शरीर तरी मला कशाला ह तेव्हा सुग्रीवानें उत्तर दिलें. अंगदाला राज्याभिषेक करून सर्व तयारीनेंच मी आ आहें !'

## आदर्श राजा

लोकापवादास्तव सीतेचा त्याग करावयाचें ठरवितांना श्रीराम आपल्या भाव म्हणतात—

**अप्यहं जीवितं जह्यां युष्मान् वा पुरुषर्षभाः ।**
**अपवादभयाद्भीतः किं पुनर्जनकात्मजाम् ॥**

'बंधूंनो, राजाचें शील निष्कलंक असलें पाहिजे म्हणून मी लोकापवादा माझे प्राण, तुम्ही किंवा सीता यांचाहि त्याग करण्यासाठीं कचरणार नाहीं. ' भवभू नेंहि असेंच भाषण श्रीरामाचें तोंडीं घातलें आहे—

**स्नेहं दयां च सौख्यं च यदि वा जानकीमपि ।**
**आराधनाय लोकस्य मुंचतो नास्ति मे व्यथा ॥**

सीतात्यागानंतर दुःखातिरेकानें आपल्याकडून राजाचें कर्तव्य, गेले चार दिव यथोचित पार पडलें नाहीं याचा विषाद वाटून ते लक्ष्मणास म्हणतात—

**चत्वारो दिवसाः सौम्य कार्यं पौरजनस्य च ।**
**अकुर्वाणस्य सौमित्रे तन्मे मर्माणि कृंतति ॥**

'या कर्तव्यच्युतीबद्दल माझें काळीज कोणी कुरतडून खात आहे असेंच म वाटतें. तर आतां—

**आहूयंतां प्रकृतयः पुरोधा मंत्रिणस्तथा ॥**

आतां पुरे झाला हा शोक ! प्रजा पुरोहित व सचिव यांना वर्दी दे कीं मी आज सभेंत येणार आहें.' केवढी ही कर्तव्यपालनाची तळमळ ! दशरथाजवळ प्रजा श्रीरामाविषयीं आपला अभिप्राय व्यक्त करतांना म्हणते—

**पौरान् स्वजनवन्नित्यं कुशलं परिपृच्छति ।**

आपल्या आप्तेष्टांचे कुशल आपण जसे आपुलकीनें नेहमीं विचारतों तसे श्रीराम आमचें प्रजेचें कुशल सुखदुःख जातीनें विचारीत असतात. शिवाय—

**नास्य क्रोधः प्रसादश्च निरर्थोऽस्ति कदाचन ।**

ते कोणावर रागावले तर शासन केल्याशिवाय राहाणार नाहींत व प्रसन्न झाले तर त्याचें कल्याण अवश्य करतील.

**आदर्श शत्रू**

रावणवधानंतर त्याची उत्तरक्रिया तूं केलीच पाहिजे असें सांगतांना श्रीराम म्हणतात '**मरणांतानि वैराणि**' अरे आतां रावणाशीं माझें वैर संपलें आहे. तुझेहि मतभेद तूं बाजूला ठेवले पाहिजेत व आपलें कर्तव्य केलें पाहिजे! किती विशुद्ध व उदार अंतःकरण!

**आदर्श पति**

सीतात्यागाची आज्ञा लक्ष्मणास दिल्यानंतर श्रीराम आपली विकल मनःस्थिति एकांतात व्यक्त करतात. तें भवभूतीच्या शब्दांत पाहूं या—

**शैशवात् प्रभृति पोषितां प्रियां, सौहृदादपृथगाश्रयामिमाम् ।**
**छद्मना परिददामि मृत्यवे, सौनिकोगृहशकुंतिकामिव ॥**

हाय! हाय! लहानपणापासून प्रेमानें पालन–पोषण केलेल्या पक्षिणीला कसायानें न्याहारीसाठीं निर्दयपणें कापावें त्याप्रमाणें अन्य आधार नसलेल्या या माझ्या प्रियेला मी तिचे डोहाळे पुरविण्याच्या निमित्तानें आज जणूं मृत्यूच्या स्वाधीन करीत आहें!

सीतेनें हनुमंताला प्रथमभेटींत पतीची मनःस्थिति विचारली असतां तो म्हणाला—

**अनिद्रः सततं रामः सुप्तोऽपि च नरोत्तमः ।**
**सीतेति मधुरां वाणीं व्याहरन् प्रतिबुध्यते ॥**

श्रीरामांना तुमची रात्रंदिवस आठवण येत असल्यानें स्वस्थ झोंप कशी ती ठाऊक नाहींशी झाली आहे. ते अंथरुणावर रात्रीं तळमळत असतात व जर थोडावेळ डोळा लागलाच तर 'सीते! प्रिय सीते!' अशा तुम्हांला हांका मारीतच जागे होतात!

सीतात्यागानंतर श्रीरामांनीं अश्वमेध यज्ञ केला, तेव्हां दुसरा विवाह न करतां सीतेच्चीच सोन्याची मूर्ति बनवून तिच्या सान्निध्यांत तो यज्ञ पार पाडला. त्यावेळीं अनेक पत्नीत्वाची चाल होती, खुद्द पित्याला तीन स्त्रिया एकाच वेळीं होत्या हें माहित असूनहि श्रीरामांनीं एक पत्नीव्रत पाळलें, यांत त्यांचें सीतेवरील अकृत्रिम प्रेम तर व्यक्त होतेंच पण राजापुढें व प्रजेपुढेंहि एक नवा आदर्श ठेवण्याचें असामान्य धैर्य दिसून येतें.

याप्रमाणें, पुत्र, बंधु, मित्र, राजा, शत्रु व पति व स्वामीहि यांचा एक आदर्श आपल्या अलौकिक आचरणानें दाखविणाऱ्या श्रीरामचंद्रांस लोक मर्यादा–पुरुषोत्तम कां म्हणतात याचें प्रत्यंतर वाचकांस येईल.

# लक्ष्मण, भरत व सीता

*************************

## रामायणांतील महत्त्वाचें स्थान

लेखक : **वि. के. छत्रेशास्त्री**, कल्याण

### जितेंद्रिय लक्ष्मण

लक्ष्मण भावनावश जितक्या लवकर होत असे तितक्याच लवकर समजूत घातली असतां शांतहि होत असे. कैकेयीवरील आसक्तीमुळें दशरथानें रामांना वनांत पाठविण्याचें ठरविलें असें कळतांच तो क्रोधाविष्ट होऊन म्हणतो—

**प्रोत्साहितोऽयं कैकेय्या संतुष्टो यदि नः पिता ।**
**अमित्रभूतो निःसंगं बध्यतां बध्यतामपि ॥**

दादा, या विषयलंपट म्हाताऱ्याची आज्ञा काय म्हणून तुम्ही पाळावी? तुमच्या राज्याभिषेकाची सर्व तयारी करून आयत्यावेळीं यानें हें भलतेंच ठरवून प्रत्यक्ष ज्येष्ठ पुत्राशीं शत्रुत्त्व निर्माण केलें आहे. याला या दुष्कृत्याबद्दल कैदेंत टाकावें, किंवा खुशाल ठारहि करून तुम्हीं राजसिंहासन मिळवावें. जे कोणी आडवे येतील त्यांना कापून काढायलाही मी तयार आहें तुमच्या पाठीशीं! यावर श्रीरामांनीं त्याची समजूत घातली, बाळा लक्ष्मणा—

**संश्रुत्य च पितुर्वाक्यं मातुर्वा ब्राह्मणस्य वा ।**
**न कर्तव्यं वृथा वीर धर्ममाश्रित्य तिष्ठता ॥**
**सोऽहं न शक्ष्यामि पुनर्नियोगमतिवर्तितुम् ।**
**धर्ममाश्रय, मा तैक्ष्णं, मद्बुद्धिरनुगम्यताम् ॥**

वडिलांना एकदां पुत्रानें वचन दिल्यावर तें मोडूं नये. तो अधर्म होईल, म्हणून वडिलांच्या आज्ञेबाहेर मी जाऊं शकत नाहीं. अरे, संताप सोडून दे व मी सांगितलेल्या धर्म्यमार्गाचा आश्रय कर.

सुवर्णमृगरूपी मारीच राक्षसानें रामाच्या बाणानें मरतां मरतां '**हा सीते, हा लक्ष्मणा धांव**' अशी श्रीरामासारखा आवाज काढून हांक मारली ती हांक ऐकूनहि लक्ष्मण रामांच्या साह्याला जाईना. त्यानें परोपरीनें तिची समजूत घातली पण तें न पटून ती—

**सुदुष्टस्त्वं वने राममेकमेकोऽनुगच्छसि ।**
**मम हेतोः प्रतिच्छन्नः प्रयुक्तो भरतेन वा ॥**

दुष्टा, माझ्यावर पापी नजर ठेवून तूं ढोंगीपणानें श्रीरामांसह वनांत आला आहेस, अथवा भरतानेंच तुला गुप्त मंत्र देऊन त्यांचा कांटा परस्पर काढण्यासाठीं

पाठविलें असावें. हीं असलीं दुरुत्तरें लक्ष्मणाला सहन न होऊन त्यानें आश्रमाभोंवतीं धनुष्यानें भूमीवर रेघ ओढली व त्याचे बाहेर न जाण्याबद्दल सीतेस बजावून तो दुःखी अंतःकरणानें श्रीरामांचे साहाय्यास गेला. त्यांची गांठ पडल्यावर लक्ष्मणानें सर्व हकीकत सांगतांच श्रीरामांनीं—

**क्रुद्धायाः पुरुषं श्रुत्वा स्त्रिया यत्त्विहमागतः ।**
**क्रोधस्य वशमागम्य नाकरोः शासनं मम ॥**

'अरे केवळ एका स्त्रीच्या क्रोधयुक्त भाषणानें तूं आपलें कर्तव्य टाकून आलास ! धिःकार असो तुला' अशी निर्भर्त्सना केली ती बिचाऱ्याला ऐकून घ्यावी लागली. ही चूक मात्र फिरून त्यानें कटाक्षानें होऊं दिली नाहीं, ही गोष्ट लक्षांत ठेवण्याजोगी आहे.

श्रीरामांनीं लोकापवादास्तव सीतेला वनांत नेऊन सोडण्याची अवघड व निर्दय कामगिरी लक्ष्मणावर सोंपविली. तेव्हां क्षणभर तो चिंताक्रांत झाला. पण लगेच—

**स शुश्रुवान् मातरि भार्गवेण, पितुर्निदेशात् प्रहृतं द्विषद्वत् ।**
**प्रत्यग्रहीच्छासनमग्र जस्य, ह्याज्ञागुरूणामविचारणीया ॥**

परशुरामांची त्याला आठवण झाली. तो मनांत म्हणाला, 'वडिलांनीं आज्ञा करतांच हातांतील परशूनें परशुरामांनीं मातेचें शिर धडापासून वेगळें केलें ! श्रीरामाची आज्ञा अन्याय्य मला वाटत असली तरी ती पाळलीच पाहिजे. त्यांतच माझें कल्याण आहे. वडिलधाऱ्या माणसांची आज्ञा लहानांनी निमूटपणें पाळणें हा त्यांचा धर्म आहे.' अशी मनाची समजूत घालून त्यानें तें कठोर कर्तव्य पार पाडलें. ऋषिरूपानें काल श्रीरामांसह एकांतांत बोलत असतां लक्ष्मण दारावर पहारा करीत होता. इतक्यांत दुर्वास आले व 'तावडतोब मला आंत सोड नाहींतर तुम्हां सर्वांनाच काय पण या राष्ट्रालाहि शापून भस्म करीन' असें बोलतांच—

**एकस्य मरणं मेऽस्तु मा भूत् सर्वविनाशम् ।**

'सर्वांचा नाश होण्यापेक्षां माझ्या एकट्याचा झालेला परवडला' असें म्हणून दुर्वासांस आंत सोडलें व मरणहि पत्करलें !

लक्ष्मणाचें विशुद्ध शील विशेष वाखाणण्याजोगें होतें. सुग्रीवाची भेट झाल्यावर वानरांना सांपडलेली दागिन्यांची पुरचुंडी श्रीरामांपुढें ओळखण्यासाठीं ठेवण्यांत आली तेव्हां त्यांनीं तें काम लक्ष्मणाकडे सोंपविलें. दागिने पाहून तो म्हणतो—

**नाहं जानामि केयूरे नाहं जानामि कुंडले ।**
**नूपुरे त्वभिजानामि नित्यं पादाभिवंदनात् ॥**

दादा, या दागिन्यांत मला फक्त नूपुरेंच ओळखूं येतात, तींसुद्धां वहिनींना नित्य प्रणाम करितांना नजरेस पडत असत म्हणूनच; बाकींचीं मी पाहिलींच नाहींत कधीं !

पावसाळा संपला तरी राज्य व स्त्री यांच्या उपभोगांत दंग झालेल्या सुग्रीवाकडून कराराप्रमाणें सीतेच्या शोधाची हालचाल होईना तेव्हां पत्नीविरह दुःखामुळें श्रीरामांचे तोंडून संतापाचे उद्‌गार निघाले. त्यांचे सांगण्यावरून लक्ष्मण क्रुद्ध होऊन सुग्रीवाचे भेटीस गेला असतां त्या चतुर वानराधिपतीनें तारेस प्रथम लक्ष्मणांस सामोरें जाण्यास सांगितलें. कारण, **त्वद्दर्शने विशुद्धात्मा न स कोपं करिष्यति** ' 'तुला पाहतांच स्त्रीदाक्षिण्यामुळें त्याचा राग शांत होईल.' व झालेंहि तसेंच. लक्ष्मणांचा क्रोध तारेला पाहतांच जागचे जागींच जिरला !

× × ×

## प्रेममूर्ति भरत

अयोध्येला आजोळहून एकाएकीं बोलावल्यामुळें आल्यावर आपल्या पित्यानें श्रीरामास वनवासास धाडलें हें वृत्त कळतांच प्रथम भरतास शंका आली, श्रीरामाच्या चारित्र्याबद्दल; कारण आपल्या कुलाच्या प्रतिष्ठेबद्दल त्याला मोठाच अभिमान होता. त्या प्रतिष्ठेला धक्का देणारें गैरवर्तन श्रीरामाचे हातून झालें कां, असें त्यानें प्रथम मातेस विचारलें. तो म्हणाला, 'श्रीरामांनीं एकाद्या ब्राह्मणाच्या धनाचा अपहार केला कां ? त्यांनीं एखाद्या निरपराध प्रजाजनाला केवळ लहरीखातर ठार तर केलें नाहीं ? कीं त्यांनीं परस्त्रीचा अभिलाष मनांत आणला ?' 'तसें कांहींच श्रीरामाकडून घडलें नाहीं.' असें कैकेयीनें सांगतांच भरताला हायसें वाटलें. पण आपली माताच श्रीरामांच्या वनवासास कारणीभूत आहे असें तिच्याच तोंडून नंतर कळतांच मात्र त्यानें तिची तीव्र निर्भर्त्सना केली.

कैकेयीच्या दुष्कृत्यांत भरतहि सामील असावा या कल्पनेनें तो दृष्टीस पडतांच कौसल्या त्याला घालून पाडून बोलूं लागली, तेव्हां आपलें निरपराधित्व तिला पटवून देण्यासाठीं त्यानें अनेक शपथा घेतल्या. तेव्हां मात्र तिची खात्री पटून तिला गहिंवर आला. ती म्हणाली—

**मम दुःखमिदं पुत्र भूयः समुपजायते ।**
**शपथैः शपतो हि त्वं प्राणानुपरुणत्सि मे ॥**
**दिष्ट्या न चलितो धर्मदात्मा ते सहलक्ष्मणः ।**
**वत्स सत्यप्रतिज्ञो हि सतां लोकमवाप्स्यसि ॥**

'तुझ्या या वारंवार शपथ घेण्यामुळें माझा आधींच दुःखानें खचलेला जीव गुदमरून जात आहे. धर्ममार्गापासून तूं चळला नाहींस ही मोठ्या भाग्याची गोष्ट आहे. तुला या धर्मनिष्ठेमुळें निःसंशय सद्‌गतीचा अधिकार प्राप्त झाला आहे.'

शत्रुघ्नाजवळ बोलतांना भरत म्हणतो—

**हन्यामिहामिमां पापां कैकेयीं दुष्टचारिणीम् ।**
**यदि मां धार्मिको रामो नासूयेन्मातृघातकम् ॥**
**इमामपि हतां कुब्जां यदि जानाति राघवः ।**
**त्वां च मां चैव धर्मात्मा नाभिभाषिष्यते ध्रुवम् ॥**

'काय करूं रे ! या दुष्ट कैकेयीला व त्या चवचाल मंथरेला ठार मारण्यासाठीं माझे हात कसे शिवशिवताहेत ! पण केवळ श्रीराम त्यामुळें माझ्यावर रुसतील, माझ्याशीं अबोला धरतील म्हणूनच मी त्यांचा वध करीत नाहीं. केवढें श्रीरामांवरील प्रेम !

त्यांना परत अयोध्येस आणण्यासाठीं निघालेला भरत अडाणी गुहकाचे व ज्ञानी भरद्वाजांचेहि टोमणे खात चित्रकूट पर्वतावर पोंचल्यावर दुरून श्रीरामांना पाहतांच प्रेमाचें त्याला इतकें भरतें आलें कीं—

**मन्निमित्तमिदं दुःखं प्राप्तो रामः सुखोचितः ।**
**इत्येवं विलपन् दीनः प्रस्विन्नमुखपंकजः ।**
**पादावप्राप्य रामस्य पपात भरतो रुदन् ॥**

'अरेरे राजवाड्यांत सुखविलासांत राहण्यास योग्य अशा या श्रीरामांवर माझ्यामुळें अरण्यांत असें तापसवेषानें राहावें लागत आहे' असा विलाप करीत असतां अश्रूंनीं मुखकमल ओलेंचिंब झालेलें आहे अशा अवस्थेंत दुःखावेगामुळें श्रीराम चरणापर्यंत पोंचावयाचें आधींच तो धाडकन भूमीवर पडला !

श्रीरामांनीं परत अयोध्येस यावें म्हणून भरतानें पुष्कळ प्रकारें त्यांच्याशीं युक्तिवाद केला. तो म्हणाला, माझ्या आईच्या संतोषासाठीं आपण मला राज्य दिलें. तेंच मी स्वसंतोषानें तुम्हांस परत देत आहें. त्याचा स्वीकार करण्यास काय हरकत आहे ? स्त्रैण पित्यानें केलेली आज्ञा पुत्रानें पाळलीच पाहिजे कां ? यावर श्रीरामांनी त्याची समजूत घातली कीं, 'गुरु, पिता व राजा या तिन्ही नात्यांनीं वडिलांनीं केलेली आज्ञा मला मोडतां येणार नाहीं. व कर्तव्याची अदलाबदलहि धर्माविरुद्ध होईल. तुझें प्रजापालनाचें कर्तव्य तूं कर. वनवासाचें कर्तव्य मी करीन.'

चौदा वर्षे पूर्ण व्हावयाच्या बेतांत आलीं असतां श्रीराम अयोध्येस परत येत असतां मारुतीला पुढें भरताला वर्दी देण्यासाठीं पाठविलें. कारण—

**चतुर्दशे हि संपूर्णे वर्षेऽहनि रघूत्तम ।**
**न द्रक्ष्यामि यदि त्वां तू प्रवेक्ष्यामि हुताशनम् ॥**

'चौदावर्षें पूर्ण झाल्याच्या दुसऱ्याच दिवशीं जर तुम्ही मला परत आलेले दिसलां नाहीं तर मी अग्निप्रवेश करीन' असें भरतानें स्पष्ट श्रीरामांस बजावलेलें होतें; व कदाचित् वेळेवर न पोंचल्यास बोलल्याप्रमाणें तो केल्याशिवाय राहणार नाहीं अशी खात्री होती व भीतीहि वाटत होती.

कबूल केल्याप्रमाणें श्रीराम परत आलेले पाहून त्यांच्या पादुका त्यांच्या स्वाधीनकरून कृतार्थतेचे उद्गार काढतांना भरताला पाहून—

**तथा ब्रुवाणं भरतं दृष्ट्वा तं भ्रातृवत्सलम् ।**
**मुमुचुर्वानरा बाष्पं राक्षसश्च बिभीषणः ॥**

त्या बंधुप्रेमाचे दर्शनानें वानर व बिभीषण यांच्या नेत्रांत अश्रू उभे राहिले.

**सती सीता**

सीता आपल्या स्वयंवराची हकीकत अनसूयेजवळ सांगतांना अभिमानपूर्वक पतीबद्दल म्हणते श्रीरामांनीं शिवधनुष्याला दोरी लावतांना तें तुटून खालीं पडलें. याप्रमाणें त्यांनीं पण जिंकला असें पाहून माझ्या पित्यानें कन्यादानाची तयारी सुरू केली. ती पाहून—

**दीयमानां न तु तदा प्रतिजग्राह राघवः ।**
**अविज्ञाय पितुश्छंदमयोध्याधिपते प्रभोः ॥**

'माझ्या वडिलांची आज्ञा झाल्याशिवाय सीतेचें पाणिग्रहण मी करूं शकत नाहीं' असं श्रीरामांनीं विनयपूर्वक पण स्पष्टपणें सांगून माझें पाणिग्रहण करण्याचें नाकारलें.

विवाहानंतर राम व सीता यांचीं हृदयें इतकीं एकरूप झालीं होतीं कीं सीतेचें सौंदर्य अधिक आकर्षक कीं गुण अधिक आकर्षक याचा भ्रम श्रीरामांस पडत असे. '**अंतर्गतमपि व्यक्तमाख्याति हृदयं हृदा**' पतीच्या हृदयांतील सर्व भाव त्यांना न विचारतांहि केवळ मुखचर्येवरून सीता ओळखूं शकत असे. इतकें पतिपत्नींचें हृदयमीलन क्वचितच आढळतें.

वनवासांतील तिच्या प्रसन्नतेचें वर्णन सुमंत्र कौसल्येजवळ करतांना म्हणतो '**नास्या दैन्यं कृतं किंचित् सुसूक्ष्ममपि लक्ष्यते**' 'सीतादेवीच्या मुद्रेवर दुःखाची छटाहि मला आढळली नाहीं!'

**नगरोपवनं गत्वा यथा स्म रमते पुरा ।**
**तथैव रमते सीता निर्जनेषु वनेष्वपि ॥**

अयोध्येंतील उद्यानांत ती जितक्या आनंदानें रमत असे तितक्याच आनंदानें आतां निर्जन अरण्यांतहि पतीच्या सान्निध्यामुळें रमत आहे.

रावण ज्यावेळीं सीतेला पळवून नेऊं लागला तेव्हां असहाय अवस्थेंतहि ती त्याला बजावते '**अग्निं प्रज्वलितं दृष्ट्वा वस्त्रेणाहर्तुमिच्छसि**' अरे तूं मला बळजबरीनें हरण करून नेतोस, हें तुझें कृत्य, जळते निखारे वस्त्रांत बांधून खांद्यावर टाकून नेण्यासारखें आहे' कारण—

**असुरैर्वा सुरैर्वा त्वं यद्यवध्योऽसि रावण ।**
**स ते जीवितशेषस्य राघवोऽन्तकरो बली ॥**

'तूं देव-दानवांना जरी अजिंक्य असलास तरी रामचंद्र तुला ठार केल्याशिवाय राहणार नाहीं हें पक्कें समजून रहा.' केवढा हा पतीच्या पराक्रमाबद्दल आत्मविश्वास!

अशोकवनांत सीतेला मारुतीनें ओळख दिल्यावर तो आपल्या खांद्यावर बसून

श्रीरामांकडे चलण्याबद्दल तिला आग्रह करूं लागला, तेव्हां त्याची परोपरीनें समजूत घालून सीता म्हणाली—

**भर्तृभक्तिं पुरस्कृत्य रामादन्यस्य वानर।**
**नाहं स्प्रष्टुं स्वतो गात्रमिच्छेयं वानरोत्तम ॥**

एका श्रीरामाशिवाय कोणाहि पुरुषाचा स्पर्श माझ्या शरीरास मी स्वेच्छेनें होऊं देणार नाहीं. रावणाचा स्पर्श माझ्या शरीरास झाला तो माझ्या इच्छेविरुद्ध बळजबरीचा होता.

लक्ष्मणानें श्रीरामांच्या आज्ञेनें सीतेला वनांत सोडल्यावर ती शोक आवरून लक्ष्मणास सांगते—

**यथा भ्रातृषु वर्तेथास्तथा पौरेषु नित्यदा।**
**परमो ह्येष धर्मस्ते तस्मात् कीर्तिरनुत्तमा ॥**
**अहं तु नानुशोचामि स्वशरीरं नरर्षभ ॥**

भावोजी, राजा रामचंद्रांना सांगा कीं, सख्ख्या भावांवर प्रेम करतां तसेंच आपल्या प्रजाजनांवर करीत राहून उत्तम कीर्तीचे धनी व्हा! माझ्या शरीराची मी पर्वा करीत नाहीं.'

महर्षि वाल्मीकींनीं केलेलें सीतेचें हें चित्रण पाहिल्यावर आपण कालिदासानें केलेलें चित्रण पाहूं या. श्रीरामांच्या आज्ञेनें लक्ष्मणानें तिला वनांत नेऊन, 'लोकापवादास्तव दादांनीं तुमचा त्याग केला आहे' असें सांगितल्यावर ती उलट श्रीरामांस निरोप देतांना म्हणते, '**वाच्यस्त्वया मद्वचनात् स राजा**' पत्नीविषयींचे स्वकर्तव्यापेक्षां प्रजानुरंजन अधिक महत्त्वाचें श्रीरामांना वाटत असल्यामुळें मीहि आतां त्यांना अयोध्येचा राजा म्हणूनच ओळखतें. त्या राजाला सांगा कीं, अग्नीनें माझ्या निष्कलंक वानरराक्षसांसमक्ष साक्ष दिली असतांहि माझा तूं त्याग केलास ही गोष्ट रघुकुलाला अगर तुझ्या विद्वत्तेला शोभण्यासारखी नाहीं. मी देहत्याग केला असता पण रघुकुलाचा अंश माझे उदरांत आहे. त्याचें संरक्षण प्रसूतीपर्यंत तरी मला करणें भाग आहे. माझें तें कर्तव्य मी करणार आहें. पति म्हणून माझ्याविषयींचें कर्तव्य तूं सोडलें असलें तरी एक सामान्य प्रजाजन म्हणून माझें पालन-पोषण करणें तुला चुकत नाहीं!

**नृपस्य वर्णाश्रमपालनं यत् स एव धर्मो मनुना प्रणीतः।**
**निर्वासिताप्येवमतस्त्वयाहं तपस्विसामान्यमवेक्षणीया ॥**

सीतादेवीचा हा निरोप श्रीरामास निरुत्तर करणारा असून तिच्या चातुर्याची व धैर्याची साक्ष देत आहे.




## ( फेब्रुवारी १९६७ )

या महिन्यांत शिर्डी येथें भक्तांची गर्दी नेहमींप्रमाणें होती; पण थोडी कमी प्रमाणांत होती. कांहीं कलाकारानी श्रीपुढें हजेरी दिली ती खालीलप्रमाणें—

**कीर्तन—**

संस्थानगवई विठ्ठलराव मराठे यांची कीर्तनें नेहमींप्रमाणें झाली.

**गायन**

श्री. गोपाळ कृष्णस्वामी सिकंदराबाद, श्री. सखाराम काळूराम पाटील मु. भिवंडी जि. ठाणें.

श्री. मिराबाई कृष्ण भागवत.

श्री. साईलीला भजन मंडळ, खडकी पुणें.

**नृत्य व गायन**

श्री. जयश्री गडकर, मुंबई.

**संस्थान भजन**

श्रीसाईबाबासंस्थान नोकर भजन मंडळाचा कार्यक्रम ( एक दिवस ) मे. माननीय कोर्ट रिसीव्हर भा. ग. पोतनीस साहेब यांचे देखरेखीखाली झाला स्वतः साहेबानीं सुंदर भजनें गाईली. इतर नोकरानीं भजनें सुंदर गाईली.

**संस्मरणीय भेटी**

( १ ) मे. चॅरिटी कमिशनर साहेब महाराष्ट्र राज्य मुंबई.

( २ ) मे. कलेक्टर साहेब अहमदनगर.

**शिर्डी हवापाणी**

शिर्डी येथील हवापाणी चांगली असून रोगराई नाहीं.